रयत शिक्षण संस्थेचे,

**स्वामी सहजानंद भारती कॉलेज ऑफ एज्युकेशन,**
**श्रीरामपूर, जि.अहमदनगर**




# सहजानंद

२०२१-२२

**चला वाचूया... लिहूया...!**

Scanned with CamScanner



कर्मवीर जयंती प्रतिमा पूजन प्रसंगी स्वा.रा.ती.म.विद्यापीठ नांदेड माजी कुलगुरु प्रा.डॉ.पंडित विद्यासागर ,रयत शिक्षण संस्थेचे सचिव प्रिं.डॉ.विठ्ठल शिवणकर, सहसचिव प्रिं.डॉ.शिवलिंग मेनकुदळे,मा.मीनाताई जगधने व इतर



कर्मवीर जयंती कार्यक्रम प्रमुख पाहुणे प्रा.डॉ.पंडित विद्यासागर यांचे स्वागत करतांना प्रिं.डॉ.सुहास निंबाळकर

Scanned with CamScanner

# सहजानंद
**२०२१-२२**

**चला वाचूया ...**
**लिहूया...**



## संपादन समिती

- **अध्यक्ष :**
प्राचार्य डॉ. एम.एस.पोंधे

- **संपादक :**
डॉ. भागवत शिंदे

- **सदस्य :**
प्रा.डॉ.आर.के.नान्नर
डॉ.ए.के.करवर
डॉ.एस.बी.इंगवले
श्री.व्ही.एस.पाटोळे
श्री.सी.एम.भोये
श्री.एन.एच.मेंगाळ

- **विद्यार्थी संपादक :**
वेदिका गागरे, आशा सिनारे

- **मुद्रक :**
श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, श्रीरामपूर

- **छाया चित्रण सहकार्य :**
ग्रंथपाल,एन.एच.मेंगाळ

- **संकल्पना व मांडणी :**
ग्रंथपाल,एन.एच.मेंगाळ
डॉ.भागवत शिंदे

- **वितरण व्यवस्था :**
श्री.एन.एच.मेंगाळ (ग्रंथपाल)

Rayat Shikshan Sanstha's SWAMI SAHAJANAND BHARATI COLLEGE OF EDUCATION SHRIRAMPUR 50 1970-2020 SAHAJANAND

रयत शिक्षण संस्थेचे,
**स्वामी सहजानंद भारती कॉलेज ऑफ एज्युकेशन,श्रीरामपूर**
**जि.अहमदनगर-४१३ ७०९**
आय.डी.नं. : पी.यू./ ए.एन./ ई. डी. एन. / ०१३ (१९७०)
एन. सी. टी. ई. कोड नं. : १ | १ | ३ | ० | ९ | ८
**Website: www.ssbcollege.com**
**e-mail: ssbcollege@yahoo.com**

Scanned with CamScanner

रयत शिक्षण संस्थेचे,

**स्वामी सहजानंद भारती कॉलेज ऑफ एज्युकेशन,श्रीरामपूर**

**महाविद्यालय विकास समिती**

**चेअरमन**

श्रीमती मीनाताई माणिकराव जगधने
सदस्या, मॅनेजिंग कौन्सिल,रयत शिक्षण संस्था,सातारा

**सभासद**

मा. सचिव,रयत शिक्षण संस्था,सातारा
मा. प्रकाश निकम पाटील साहेब
मा. बापुसाहेब बाळाजी पटारे
मा. प्रा.डॉ. रामदास नान्नर
मा. डॉ.अनिल करवर
मा. विजय पाटोळे
मा. नारायण मेंगाळ
मा. चंद्रकांत भोये
मा. एन.बी.चव्हाण
मा. शंकर अनारसे
मा. सौ.मंजिरी सोमाणी
मा. अध्यक्ष, महाविद्यालय विद्यार्थी परिषद
मा. सचिव, महाविद्यालय विद्यार्थी परिषद

**सेक्रेटरी, मा. प्राचार्य**
स्वामी सहजानंद भारती कॉलेज ऑफ एज्युकेशन, श्रीरामपूर

दि प्रेस ॲण्ड रजिस्ट्रेशन ऑफ बुक ॲक्ट ;
नियम ०८ फॉर्म ०४ प्रमाणपत्र निवेदन

**प्रकाशनस्थळ** : स्वामी सहजानंद भारती कॉलेज ऑफ एज्युकेशन, श्रीरामपूर – ४१३ ७०९
(०२४२२) २२२४८७

**प्रकाशकाचे नाव** : प्राचार्य डॉ. एम.एस.पोंधे
**राष्ट्रीयत्व** : भारतीय
**पत्ता** : प्राचार्य निवास
स्वामी सहजानंद भारती कॉलेज
ऑफ एज्युकेशन
श्रीरामपूर – ४१३ ७०९

**संपादकाचे नांव** : डॉ.भागवत शिंदे
**राष्ट्रीयत्व** : भारतीय
**पत्ता** : स्वामी सहजानंद भारती कॉलेज ऑफ एज्युकेशन, श्रीरामपूर – ४१३ ७०९
भ्रमणध्वनी : ९७६५११९६५५७

**मुद्रकाचे नाव** : अभय पवार
**राष्ट्रीयत्व** : भारतीय
**पत्ता** : श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स
वत्सला कॉम्प्लेक्स एस.टी. स्टॅण्ड जवळ, श्रीरामपूर, जि. अ.नगर
भ्रमणध्वनी : ९८२२२४१६११

मी, प्राचार्य, डॉ. मुकुंद पोंधे असे जाहीर करतो की, वर दिलेला तपशील माझ्या माहितीप्रमाणे व समजूतीप्रमाणे खरा आहे.

डॉ. मुकुंद पोंधे
प्राचार्य

(खाजगी वितरणाकरिता)

---

(सहजानंद या नियतकालिकामधील साहित्यात व्यक्त केलेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.)

Scanned with CamScanner



**मा. पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील**

डी. लिट.

संस्थापकः रयत शिक्षण संस्था, सातारा

२२ सप्टेंबर १८८७ - ९ मे १९५९

Scanned with CamScanner

## संस्था पदाधिकारी




**मा. पद्मविभूषण शरदचंद्रजी पवार साहेब**

अध्यक्ष, रयत शिक्षण संस्था, सातारा

## उपाध्यक्ष



मा. प्रा. डॉ. एन. डी. पाटील
(१७.१.२०२२ पर्यंत)



मा. गणपतराव देशमुख
(३०.७.२०२१ पर्यंत)



मा. सौ. जयश्री अनंतराव चौगुले



मा. अरुण पुंजाजी कड्डू-पाटील




मा. पी. जे. पाटील



मा. आ. चेतन विठ्ठलराव तुपे

Scanned with CamScanner

## संस्था पदाधिकारी



मा. डॉ. अनिल पाटील
चेअरमन



मा. ॲड. भगीरथ शिंदे
व्हा. चेअरमन



मा. प्रिं. डॉ. विठ्ठल शिवणकर
सचिव



मा. प्रिं. डॉ. शिवलिंग मेनकुदळे
सहसचिव (उच्च शिक्षण)



मा. संजय नागपुरे
सहसचिव (मा. शिक्षण)



मा.शहाजी डोंगरे
स्पेशल ड्युटी ऑफिसर

**मा. मीनाताई जगधने**
सदस्या, मॅनेजिंग कौन्सिल,
रयत शिक्षण संस्था, सातारा





महाविद्यालयाचे गतिशील नेतृत्व
**मा. प्राचार्य डॉ. एम. एस. पोंधे**

**अभिनंदन!**
प्राचार्यपदी पुनर्नियुक्ती
दि.१६.९.२०२१ पासून

Scanned with CamScanner

## आम्ही सहकारी

### संपादक मंडळ सहजानंद: २०२१-२२


प्राचार्य डॉ. मुकुंद पोंधे
अध्यक्ष


प्रा. डॉ. भागवत शिंदे
संपादक


प्रा. डॉ. रामदास नान्नर
सदस्य


प्रा. डॉ. अनिल करवर
सदस्य


प्रा. डॉ. शरद इंगवले
सदस्य


प्रा. विजय पाटोळे
सदस्य


ग्रंथपाल नारायण मेंगाळ
सदस्य


प्रा. चंद्रकांत भोये
सदस्य

### प्रशासकीय सेवक


भरत देवकर
मुख्य लिपिक


किरण भाकरे
वरिष्ठ लिपिक


नामदेव चव्हाण
कनिष्ठ लिपिक


बाबा काळे
ग्रंथालय परिचर


दादाभाई पठाण
शिपाई


प्रभाकर जगधने
शिपाई


सुर्यकांत मंचरे
शिपाई


रविंद्र वाजे
शिपाई

### २०२१-२२ बी.एड. विद्यापीठ परिक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन!

**प्रथम वर्ष**


सोनाली मिसाळ
प्रथम क्रमांक ८०.५०%


श्वेता शिंदे
व्दितीय क्रमांक ८०.२०%


वैशाली राहिंज
तृतीय क्रमांक ७९.२०%

**व्दितीय वर्ष**


सोनाली बर्डे
प्रथम क्रमांक ८३.२५%


वेदिका गागरे
व्दितीय क्रमांक ८१.२५%


आशा सिन्नारे
तृतीय क्रमांक ८०.५०%

हार्दिक अभिनंदन !



## मान्यवर भेटी



कर्मवीर जयंती प्रमुख पाहुणे प्रा.डॉ.पंडीत विद्यासागर
व इतर मान्यवर



पुणे विभाग उच्च शिक्षण सहसंचालक
मा.विजय नारखेडे व इतर




रयत शिक्षण संस्था, सचिव प्रिं.डॉ.विठ्ठल शिवणकर,
सहसचिव प्रिं.डॉ.शिवलिंग मेनकुदळे व इतर



आरोग्य मित्र मा.सुभाष गायकवाड यांच्यासोबत
शिबिरार्थी स्वयंसेविका व इतर




महाराष्ट्र शासन नाहरकत समिती अध्यक्ष व इतर




निमगाव खैरी सरपंच मा.उज्वलाताई शेजुळ
यांच्या समवेत स्वयंसेविका

Scanned with CamScanner

## विविध उपक्रम



नाऊर स्वामी सहजानंद आश्रम सदिच्छा भेट
प्रसंगी प्रिं.डॉ.मुकुंद पोंधे व इतर



छात्राध्यापक युगल वळवीस वाढदिवसाच्या शुभेच्छा
प्रसंगी प्रिं.डॉ.मुकुंद पोंधे




सहजानंद सुवर्णमहोत्सवी विशेषांक प्रकाशन सोहळा



निर्भय कन्या अभियान कराटे प्रशिक्षण देताना संदिप नलगे



१५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिन प्रसंगी मार्गदर्शन करतांना
प्रिं.डॉ.मुकुंद पोंधे



प्रोफेसर पदी निवड झाल्याबद्दल
प्रो.डॉ.आर.के.नान्नर सत्कार प्रसंगी




छात्रसेवाकालीन शाळेत वृक्षारोपन प्रसंगी
छात्राध्यापक व विद्यार्थी



शिक्षणशास्त्र एम.फिल.पदवी प्राप्त केल्याबद्दल प्रा.चंद्रकांत
भोये यांच्या सत्कार करतांना मा.सचिव व इतर

## एन.एस.एस. उपक्रम



एन.एस.एस.शिबीर समारोप समारंभ प्रसंगी प्रिं.डॉ.मुकुंद पोंधे




एन.एस.एस.शिबीर समारोप समारंभ प्रसंगी प्रमुख पाहुणे मा.अनिल पवार



समाज सेवा अंतर्गत बाग स्वच्छता करताना छात्रध्यापिका



विशेष श्रमसंस्कार शिबीरात प्राथमिक आरोग्य केंद्र, निमगाव खैरी येथे शिबीरार्थी विद्यार्थी व प्राध्यापक



छात्रसेवाकालीन शाळेत विद्यार्थिनींना प-पाळीचा कार्यशाळा प्रसंगी छात्राध्यापक व इतर



एन.एस.एस.अंतर्गत छात्रसेवाकालीन शाळेत वृक्षारोपन प्रसंगी छात्राध्यापक व विद्यार्थी



एन.एस.एस.शिबीर समारोप प्रसंगी कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.भागवत शिंदे व छात्राध्यापिका



विशेष श्रमसंस्कार शिबीरात प्राथमिक आरोग्य केंद्र परिसर स्वच्छता प्रसंगी स्वयंसेवक

Scanned with CamScanner

## दिव्यत्वाची जिथे प्रचिती...



स्वामी सहजानंद भारती जयंती प्रसंगी
मा.प्राचार्यां समवेत इतर



छात्रसेवाकालीन शाळेत आण्णाभाऊ साठे जयंती प्रसंगी
शिक्षक, छात्राध्यापक व विद्यार्थी



महात्मा गांधी व लालबहादुर शास्त्री जयंती प्रतिमा पूजन



माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम जयंती प्रसंगी



सरदार वल्लभभाई पटेल राष्ट्रीय एकता दिन अभिवादन प्रसंगी



सावित्रीबाई फुले जयंती प्रसंगी मा.प्राचार्यांसोबत इतर



रयत माऊली लक्ष्मी वहिनी पुण्यतिथी प्रसंगी
शिक्षक व छात्राध्यापक




लोकमान्य टिळक जयंती प्रसंगी प्रसंगी
शिक्षक,छात्राध्यापक व विद्यार्थी

# विद्यार्थी विकास मंडळ उपक्रम



जागतिक महिला दिन मार्गदर्शन प्रसंगी
प्रिं.डॉ.मुकुंद पोंधे व इतर



रक्तदान प्रसंगी प्राध्यापक व छात्राध्यापक



शिवराज्य दिन मनोगत: छात्राध्यापिका सारीका पागी



कौन्सेलर डे मार्गदर्शन प्रा.डॉ.ए.के.करवर



रक्तदान करतांना छात्राध्यापक पुनाजी मुंढे व इतर



रक्तदान करतांना छात्राध्यापिका अश्विनी झोडगे व इतर



रक्तदान करतांना छात्राध्यापक रोहित वाघमोडे व इतर



कमवा व शिका योजने अंतर्गत श्रमदान करतांना
छात्राध्यापक व प्राध्यापक

Scanned with CamScanner

## लघुनाटिका, कार्यशाळा व इतर



महिला सबलीकरण लघुनाटीका सादर करतांना छात्राध्यापक




कोरोना जनजागृती लघुनाटीका सादर करतांना छात्राध्यापक



मानसिक आरोग्याधारीत लघुनाटीका सादर करतांना छात्राध्यापक



शिक्षक समृध्दी कार्यशाळेतील सहभागी शिक्षक, प्राध्यापक व मान्यवर



स्टार्ट अप कार्यशाळा प्रसंगी मा.प्राचार्य व इतर



स्टार्ट अप कार्यशाळेतील सहभागी विद्यार्थी



पारंपारिक वेशभूषेत छात्रसेवाकालीन शाळेतील विद्यार्थी व छात्राध्यापक



राष्ट्रीय एकात्मता प्रसंगी छात्रसेवाकालीन शाळेतील विद्यार्थी व छात्राध्यापक

Scanned with CamScanner

# वार्षिक क्रीडा स्पर्धा



वार्षिक क्रीडा स्पर्धा उद्‌घाटन प्रसंगी
मा.प्राचार्य डॉ.मुकुंद पोंधे व इतर



२०० मी धावणे स्पर्धा प्रसंगी छात्राध्यापिका



लांब उडी प्रसंगी छात्राध्यापिका



गोळाफेक प्रसंगी छात्राध्यापिका व इतर



२०० मी धावणे स्पर्धा प्रसंगी छात्राध्यापक



लिंबू चमचा स्पर्धेतील छात्राध्यापिका



संगीत खुर्ची स्पर्धेतील चुरस



वार्षिक क्रीडा स्पर्धा प्रसंगी छात्राध्यापिका
व शिक्षक

Scanned with CamScanner

# प्रकाशकीय मनोगत...

सहजानंद : २०२१-२२ आपणा सर्व सुज्ञ वाचक, रसिकांच्या हाती देतांना विशेष आनंद होतोय. १९७० साली पुणे विद्यापीठ कार्यक्षेत्रात स्वामी सहजानंद भारती शिक्षणशास्त्र महाविद्यालयाची स्थापना झाली. स्थापनेपासून ते आजतागायत या महाविद्यालयाने महाराष्ट्राला कित्येक नामवंत शिक्षक, प्राध्यापक, प्रशासक व लेखक पुरविण्याचे काम निरंतरपणे केले आहे.या गुणवत्तापूर्ण परंपरेच्या बळावर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठांतर्गत नॅक मूल्यांकन व पुनर्मुल्यांकनात अ श्रेणी मिळविणारे हे एकमेव शिक्षक शिक्षण महाविद्यालय ठरले आहे.

नॅक कडून दोन वेळा मिळालेल्या अ श्रेणी सोबतच या महाविद्यालयाने विविध क्षेत्रातील आपली गुणवत्तेची उज्वल परंपरा आजपर्यंत कायम राखली आहे. याचा आम्हा सर्वांना कायमच विशेष अभिमान वाटत आलेला आहे. या गौरवशाली उज्वल वारशाच्या बळावरच आजही आमच्या महाविद्यालयातील छात्राध्यापकांना जिल्ह्यातील विविध शिक्षण संस्था, शाळा महाविद्यालयांकडून नोकरीच्या संधी मिळताहेत, ही आम्हा सर्वांसाठी विशेष आनंदाची बाब आहे. या दृष्टिने महाविद्यालयातील प्लेसमेंट सेल विभागाचे कार्य कौतुकास्पद ठरले आहे.

गुणवत्तापूर्ण शिक्षक घडविण्याच्या दृष्टिने महाविद्यालयात विद्यार्थी विकास मंडळ, राष्ट्रीय सेवा योजना, कमवा व शिका योजना, संशोधन कक्ष, अंतर्गत गुणवत्ता नियमन समिती, परीक्षा विभाग, ग्रंथालय, सांस्कृतिक विभाग, हे सर्वच विभाग उत्तमरित्या कार्यरत आहेत. या विविध विभागांतर्गत समाविष्ट कार्यांच्या प्रभावी अंमलबजावणीमध्ये आमचे प्राध्यापक, विभाग प्रमुख, ग्रंथपाल, प्रशासकीय सेवक वर्ग, छात्राध्यापक या सर्वांचा मोलाचा वाटा राहिलेला आहे. त्यामुळे तर शिक्षक घडणीची ही सर्व कामे आम्ही आम्ही उत्तमरित्या पूर्णत्वस नेत आहोत.

आपल्या वैशिष्टपूर्ण आशा आगळ्यावेगळ्या निर्मितीक्षम, प्रेरणादायी लेखनाच्या बळावर आमच्या महाविद्यालयाच्या सहजानंद : २०१८ या वार्षिक अंकास सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, विद्यार्थी विकास मंडळाकडून अहमदनगर जिल्ह्यातील व्यावसायिक गटातील व्दितीय क्रमांकाचे पारितोषिके प्राप्त झाले आहे. ही आम्हा सर्वांसाठी विशेष गौरवास्पद बाब आहे.विशेष बाब म्हणजे सहजानंदच्या यशस्वी वाटचालीची ही हॅटट्रीक ठरली आहे.यापूर्वीही दोन वेळा आम्ही जिल्हा स्तरीय व्यवसायिक गटातील तृतीय क्रमांकाची पारितोषिके मिळवली आहेत.या पार्श्वभूमीवर प्रस्तुत **सहजानंद २०२१-२२** कडून आम्हाला खूप आपेक्षा आहेत.

या महाविद्यालयाच्या सर्वांगीण विकासामध्ये रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन डॉ.अनिल पाटील, मा.सचिव प्रिं.डॉ.विठ्ठल शिवणकर, मा. सहसचिव प्रिं.डॉ.शिवलिंग मेनकुदळे, रयत शिक्षण संकुल, श्रीरामपूर चेअरमन तथा रयत शिक्षण संस्थेच्या व्यवस्थापन समिती सदस्या मा.मीनाताई जगधने या सर्वांचा नेहमीच मोलाचा वाटा राहिला आहे. या सर्वांविषयी मन:पूर्वक ऋण व्यक्त करतो.

**प्राचार्य डॉ. एम.एस पोंधे**

Scanned with CamScanner

# संपादकीय मनोगत...

सहजानंद : २०२१-२२ संपादकीयच्या निमित्ताने आपणा सर्व रसिकांशी संवाद साधताना मनस्वी आनंद होतोय. या वार्षिक अंकातून आपणास आमच्या महाविद्यालयातील छात्राध्यापकांच्या सन २०२१ - २२ या शैक्षणिक वर्षातील साहित्यिक, सामाजिक, सांस्कृतिक,शैक्षणिक, क्रीडा, विज्ञान या क्षेत्रांतील प्रगतीच्या विविधांगी पाऊलखुणा प्रत्यक्ष, अप्रत्यक्षरीत्या पाहवयास मिळतील.

वर्तमानकालीन शिक्षक शिक्षणाची वाटचाल अनेक आव्हानांना सामोरे जात सुरू आहे. त्यामुळे शिक्षक शिक्षण महाविद्यालयांचा भूतकाळ, वर्तमानकाळ, या विषयी काही ना काही भाष्य करता येते; परंतु भविष्यकाळा विषयी मात्र आजही ठामपणे भाष्य करणे अवघड झाले आहे. अशा या गोंधळलेल्या अवस्थेत बी.एड्. अभ्यासक्रम पारंपारिक पद्धतीनुसार दोन वर्षांचा राहणार की नव्या रूपात प्रचलित वरिष्ठ महाविद्यालयातील पारंपारिक पदवी अभ्यासक्रमांशी जोडून एकात्मिक रूपात चार वर्षाचा होणार? चार वर्षांचा झालाच तर त्याचे स्वरूप कसे असणार? शिक्षक वर्ग कसा,व किती असणार? हा अभ्यासक्रम नक्की कधी पासून लागू होणार? हा अभ्यासक्रम अनुदानित असणार की विनाअनुदानित? या खूप साऱ्या प्रश्नांची उत्तरे अजूनही गुलदस्त्यात आहेत.यातील काही मुलभूत प्रश्नांची उत्तरे राष्टीय शैक्षणिक धोरण२०२०मधुन स्पष्ट झाली आहेत. अशा संक्रमणकाळात बी.एड्. महाविद्यालयांची अवस्था अत्यंत नाजूक झाली आहे. मात्र अशा या खडतर काळातही आमच्या महाविद्यालयाने गुणवत्तेच्या बाबतीत कसलीही तडजोड न करता आपली यशस्वी वाटचाल सुरू ठेवली आहे. याचा आम्हाला विशेष आनंद वाटतो.

यावर्षी सहजानंद : २०२१ -२२ साठी चला वाचूया... लिहुया... ! ही मुख्य संकल्पना घेतली. काय वाचायचे?कसे लिहायचे? हे विद्यार्थ्यांचे प्रश्न असणार याची संपादक मंडळाला खात्री होती. त्यामुळे या प्रश्नावर आमचे उत्तर तयारच होते:पुस्तके वाचायची व त्यावर लेख लिहायचा ! यामागे आमचे दोन हेतू होते. एक विद्यार्थ्यांच्या अंगी वाचनसंस्कार रूजवणे. दोन वाचनातून विद्यार्थ्यांना आदर्शवत, मार्गदर्शक, प्रेरणादायी ठरतील अशी व्यक्तिमत्वे अभ्यासण्याची संधी देणे, त्यांच्या जीवन व कार्यावर लेख लिहण्यास प्रवृत्त करणे. अंक पूर्णत्वास नेत असतांना हे दोन्ही हेतू समाधानकारक रित्या साध्य झाल्याचा आनंद वाटतो. या आनंदाची प्रचिती अंक वाचनातून आपणालाही मिळेल याची खात्री वाटते.

अंकाची मुख्य संकल्पना व त्यावर आधारीत लेख यांचे संदर्भ घेऊन मुखपृष्ठ व मलपृष्ठाची योजना केली आहे. त्यादृष्टीने मुखपृष्ठावर अग्नीपंख,इकिगाई,शामची आई,फिटे आंधाराचे जाळे,मृत्युंजय,फकिरा,बटाट्याची चाळ,कोसला व छावणी या पुस्तकांच्या मुखपृष्ठांची मांडणी केली आहे. जानेवारी २०२२ मध्ये रयत शिक्षण संस्थेचे माजी चेअरमन प्रा.डॉ.एन.डी.पाटील सरांचे निधन झाले. त्यांच्या व्यक्तीमत्वाला व ध्येयवादी भूमिकेला स्मरुन मलपृष्ठावर डॉ.कृष्णा पाटील यांच्या कवितेची योजना केली आहे. आपणा सर्वांना ती निश्चितच आवडेल असा आशावाद वाटतो.

याशिवाय या अंकातील आमच्या विद्यार्थी शिक्षकांच्या विविध लेख, निबंध, इत्यादीतून आपणास त्यांच्यातील प्रगल्भ जाणिवा, जीवनानुभूतीचे दर्शन अनुभवायास मिळेल. त्यातून त्यांच्यातील साहित्यिक कलाविष्कार, भावनाभिव्यक्ती, वैचारिक आंदोलने, मानसिक अस्वस्थता इत्यादींचा प्रत्यय येईल. या सर्वांचा आपण जाणकार वाचक निश्चितच आस्वाद घ्याल नि आपली शाबासकीची थापही द्याल याची आम्हा सर्वांना खात्री वाटते.

'सहजानंद' या वार्षिक अंकाला अधिक गुणवत्तापूर्ण, समृद्ध व संपन्न करण्यात मा. प्राचार्य डॉ.एम. एस. पोंधे यांचे अत्यंत मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले. त्याबद्दल त्यांचा मी मनःपूर्वक ऋणी आहे. या ऋणासह सहसंपादक मंडळ, कार्यालयीन सेवक व श्री स्वामी समर्थ प्रिंटर्सचे संचालक अभय पवार या सर्वांविषयी मनःपूर्वक कृतज्ञता व्यक्त करतो.

**प्रा. डॉ. भागवत शिंदे**

Scanned with CamScanner

## || अनुक्रमणिका ||


| अ.क्र. | लेख शीर्षक | लेखक / लेखिका | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १. | प्रयत्नाअंती मिसाईल मॅन | माधुरी जेजुरकर | ०१ |
| २. | आनंदी जीवनाचे रहस्य | सोनाली थोरात | ०४ |
| ३. | डॉ.बाबा आमटे यांचे पुण्यलीला नर्मदेशी हितगुज | सोनाली बर्डे | ०७ |
| ४. | हे भारत ! उठ ! जागा हो ! | आशा सिन्नारे | १० |
| ५ | थर्ड अँगल | वेदिका गागरे | १३ |
| ६. | अपयश ही यशाची पहिली पायरी असते... | ऋतुजा गायकवाड | १५ |
| ७. | श्यामची आई -एक संस्काराची शिदोरी | स्नेहल पाटील | १७ |
| ८. | महाराष्ट्राचे शिल्पकार -साने गुरुजी | पंकज माळी | १९ |
| ९. | सगळच कधी नसतं संपत... | ओंकार घाडगे | २२ |
| १०. | फकिरा : एक शौर्य गाथा | शायदा बागवान | २५ |
| ११. | सुजाण पालकत्वासाठी | श्रध्दा तांबे | २७ |
| १२. | मुंबईच्या चाळीतील लोकजीवन | कौसर पिंजारी | ३० |
| १३. | मोठा परिणाम करणाऱ्या छोट्या गोष्टी | अविनाश जावळे | ३२ |
| १४. | कोसला | अजय बरे | ३५ |
| १५. | अवयवदान विषयक माझे विचार | अतुल गायकवाड | ३७ |
| १६. | छावणी : जीवनातील ग्रामवास्तवाचे भान | निवृत्ती धिंदळे | ४१ |
| १७. | महारथी कर्णाची शौर्य गाथा | देवराम दिनकर भांगरे | ४४ |



Scanned with CamScanner

## || अनुक्रमणिका ||


| अ.क्र. | लेख शीर्षक | लेखक / लेखिका | पृष्ठ.क्र |
|---|---|---|---|
| १८. | महाश्वेता : सुंदर,धैर्यशील अनुभवाची कहाणी | निकिता झरेकर | ४८ |
| १९. | निळ्या नभाच्या पलिकडे... | प्रतिभा तागड | ५३ |
| २०. | एक उत्तम व्यावसायिकाचा प्रवास | कविता गाडेकर | ५७ |
| २१. | वार्षिक अहवाल : शैक्षणिक वर्ष २०२१-२२ | डॉ.भागवत शिंदे | ६० |
| २२. | सन २०२१-२२ प्रथम वर्ष बी.एड. छात्राध्यापक | डॉ.भागवत शिंदे | ६४ |
| २३. | सन २०२१-२२ व्दितीय वर्ष बी.एड. छात्राध्यापक | डॉ.भागवत शिंदे | ६६ |


Scanned with CamScanner

## प्रयत्नाअंती मिसाईलमॅन माधुरी जेजुरकर




एकमेकांची उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी आणि स्वप्नांना वास्तवात साकारण्यासाठी कुटुंब, सहकारी,मित्र यांचे जीवनातील महत्व यावर कथेत जोर देण्यात आला आहे.अग्नीपंख हे पुस्तक आपल्याला वैमानिक,अंतराळ आणि रॉकेट तंत्रज्ञानामध्ये श्रेष्ठत्व मिळविण्याच्या वैज्ञानिकांच्या असंख्य प्रयत्नांची जाणीव करुन देते.

पुस्तकाचे सुरुवातीचे अध्याय म्हणजेच कलाम यांचे बालपण आणि शालेय जीवन अगदी सोप्या भाषेत मांडले आहे. तर नंतरच्या अध्यायांमध्ये त्यांच्या व्यावसायिक आयुष्यातील संदर्भाचा समावेश आहे.

कलाम यांचा जन्म एका नावाड्याच्या पोटी तमिळनाडू मधल्या रामेश्वरम या प्रसिद्ध हिंदू देवस्थानाच्या कुशीत झाला. रामेश्वरमचे मुख्य पुजारी हे कलाम यांच्या वडिलांचे खास मित्र होते. तर कलाम यांचे वडील मशिदीमधील खास लोकांमधील एक होते. त्यामुळे कुराणामधील प्रार्थनेबरोबरच हिंदू धर्मातील श्लोक आणि त्यांचे अर्थही त्यांना तोंडपाठ होते. त्यांचे मित्रही भिन्नधर्मीय होते. त्युाळे धर्मभेद,वर्णभेद किंवा लहान–मोठ्यांमधला भेद त्यांना आयुष्यात कधीही जाणवला नाही.

अब्दुल आपल्या भावाला मदत करण्यासाठी वर्तमानपत्रे विकत असत. त्यांचे मेव्हण्याबरोबर म्हणजेच जलालउद्दीन बरोबर चांगले संबंध होते. जलालउद्दीनशी ते तासनतास विविध विषयांवर चर्चा करत असत. अब्दुल कलाम आपल्या शाळेच्या दिवसांविषयी आणि त्यांच्या शिक्षकांच्या त्यांच्यावरील प्रभावाबद्दल लिहीतात. शिक्षण घेत असतांना त्यांना आलेल्या आर्थिक आणि सामाजिक आव्हांनाबद्दलही ते लिहीतात.

सर्वधर्म समभावाचे संस्कार त्यांच्यावर कसे घडले ह्या बाबत यांनी एक किस्सा सांगितला आहे. पाचवीत असताना शाळेमध्ये कलाम त्यांच्या हिंदू मित्राच्या बाजूला बसले होते, जो रामेश्वरमचे मुख्य पुजारी लक्ष्मण शास्त्री यांचा मुलगा होता. हिंदू पुजाऱ्याचा मुलगा एका मुस्लीम मुलाच्या बाजूला बसलेला त्यांच्या शिक्षकाला आवडले नाही. त्यांनी कलाम यांना मागच्या बाकावर जाऊन बसायला सांगितले. हे जेव्हा ल क्ष्मण शास्त्री यांना समजलं तेव्हा त्यांनी शिक्षकांना बोलावून घेतलं आणि त्यांच्या या कृत्याबद्दल त्यांना चांगलाच दम भरला. धर्माबद्दलच्या अशा शिकवणीमुळे पुढे त्यांनी विकसित केलेल्या क्षेपनास्त्राला त्रिशुल हे नाव देताना त्यांना धर्म आडवा आला नाही.

आपलं आकाश उड्डाणाचं स्वप्न पुर्ण करण्यासाठी कलाम यांनी एमआयटी म्हणजे मद्रास

इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी मध्ये प्रवेश घेतला. हिंदुस्तान एरोनॉटिकल मधून ऍरोनॉटीक अभियंता म्हणून बाहेर पडल्यावर कलाम यांना दोन ठिकाणांहून विचारणा झाली.एक वैमानिक पदासाठी आणि दुसरं संरक्षण खात्यात. परंतु हवाई दलाने त्यांना वैमानिक म्हणून नाकारलं. त्या नकाराने खचलेले कलाम, स्वामी शिवानंद यांना जावून भेटले. स्वामी शिवानंदानी त्यांना सांगितलं की **तुझा जन्म काहीतरी वेगळं करण्यासाठी झाला आहे. त्यामुळे नियतीचा स्विकार कर आणि आयुष्यात पुढे जा.** त्या क्षणापासून कलामांनी स्वामी शिवानंद यांना आपला गुरु मानले आणि त्यांनी संरक्षण खात्यात सिविल एविएशनमध्ये नोकरी पत्करली.

संरक्षण खात्यात त्यांची सुरुवात काही खास अशी नाही झाली. त्यांनी दोन वर्ष लागून बनवलेल्या ओव्हरक्राफ्टला भंगारात टाकावं लागलं पण त्यांनी हिम्मत हरली नाही. संरक्षण खात्यात त्यांनी स्वदेशी बनावटीच्या पृथ्वी, नाग, अग्नी अशा क्षेपनास्त्रांच्या निर्मिती आणि त्यांच्या अदययावनामध्ये सिंहाचा वाटा उचलला. त्याचबरोबर SLV3, PSLV यांसारखे पुर्णपणे भारतीय बनावटीचे क्षेपनास्त्र बनवले.

कलाम आपल्या टिममध्ये नव्या दमाच्या लोकांना घेऊन त्यांना जबाबदारीची कामे देत असत. आणि अनुभवी लोकांना सल्लागार पदी नेमत असत. जेणेकरुन संस्थेमध्ये क्रयशक्ती वाढत असे आणि नविन तरुण आव्हाने पेलायला सक्षम होत. त्यामुळे कधी कधी त्यांना वरिष्ठांच्या रागाला सामोरे जावे लागत असे. त्याचं समर्पण, निश्चय आणि नेतृत्वगुण बघून, त्यांना ISRO (Indian Space Research Organisation) चं अध्यक्षपद देण्यात आलं होतं.

आपल्या सर्व यशाचं श्रेय ते आई-वडिल, नातेवाईक, मित्र, सहकारी, कंपनीमधील श्रेष्ठ अधिकारी,भारताचे विभिन्न खात्याचे मांत्री, प्रधानमंत्री आणि भारतीय अवकाश तंत्रज्ञानाचे जनक विक्रम साराभाई यांना देतात. पुढे त्यांच्या मार्गदर्शनाखाली त्रिशूल, पृथ्वी, अग्नी, आकाश, नाग ही क्षेपनास्त्रांची मालिका भारतात बनवली. एवढचं नाही त्यांच्या मार्गदर्शनाखाली पोखरणमध्ये यशस्वी अनुचाचणी केली.

डॉ. कलामांना पद्म्भूषण, पद्मविभूषण आणि भारतरत्न देऊन गौरविण्यात आलं आणि एका शास्त्रज्ञाला त्यांच्या सर्वांगीण गुणवत्तेमुळे देशाचे आदर्श राष्ट्रपती बनवले. आपल्या यशाचे श्रेय ते ईश्वराला देतात. अशा ऋषितुल्य ज्ञानयोगी, शास्त्रज्ञाने समाजाला अंतर्बाह्य निर्मळ बनवून ही पृथ्वी देवाची आहे हे आपले विधान सत्य करुन दाखवले.

आज डॉ. कलामांच्या योगदानामुळे भारत अवकाश,विज्ञान,क्षेपनास्त्र आणि अणु उर्जा क्षेत्रांत महासत्तांच्या पंक्तीत आहे. भारत अनेक उपगृह एकावेळी अवकाशात सोडण्यात यशस्वी झाला ते कलामांमुळेच...

आधुनिक जग हे विज्ञान आणि अध्यात्मिक गोष्टी यांना एकमेकांच्या विरुद्ध असणाऱ्या गोष्टी म्हणून बघतं. त्यातही एखादा वैज्ञानिक असेल किंवा विज्ञानवादी असेल तर सहसा त्याने देवाच्या अस्तीत्वावर त्याच्या महानतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करणे ही तर आजची फॅशन होऊन बसली आहे. विज्ञानाची दोन-तीन पुस्तके वाचून बरीच मंडळी आपण कसे जगावेगळे आहोत हे ठसवण्यासाठी या धार्मिकतेला अध्यात्माला विरोध करतांना आढळतात.

मात्र कलाम यांची कहाणी थोडी निराळीच आहे. त्यांच्या या जीवनकथेत अध्यात्मच अध्यात्म भरलेले आहे. एका वैज्ञानिकांचा असल्या गुढ गोष्टींवर विश्वास होता. हे पाहतांना आपल्याला थोडे वेगळे वाटेल पण तेच सत्य आहे. मात्र त्यांची देवावर असणारी श्रद्धा ही अंधश्रद्धा नव्हती. ती अगदी सहज आणि डोळस अशी श्रद्धा आहे.

त्यांच्या देवावर असणाऱ्या या श्रद्धेमुळेच त्यांना जीवनभर अगदी साधेपणाने जगत आले. कुठलाही



Scanned with CamScanner

गर्व,ईर्ष्या त्यांच्या मनात कधीच निर्माण झाली नाही. जे काही माझ्या हाताने घडले, माझ्या हाताने देशाची जी सेवा झाली, ते सगळं त्या वरच्या करुणाकाराच्या योजनेचा भाग आहे. त्यात माझं अस स्वत:चं काहीच नाही. या प्रकारचा नम्रभाव हा त्यांच्या अध्यात्मिकतेचाच परिणाम होय.

पुस्तकाची सुरुवातच अथर्ववेदातील ओळींनी होते. बऱ्याच ठिकाणी पवित्र कुराण मधील बरीच उदाहरणे आली आहेत. सोबतच डॉ. अब्दुल कलाम यांचे त्यांच्या वडीलांशी,स्वामी शिवानंदांशी, जलालुद्दीन सोबत होणारे संभाषण हे सारे या अध्यात्मिक वृत्तीबद्दलच निर्देश करतात.

**येणाऱ्या सर्व दिवसांसाठी तयारीत रहा**
**त्यांना सारखेच सामोरे जा**
**जेव्हा ऐरण होशील तेव्हा  घाव सोस,**
**अन हातोडा होशील तेंव्हा धाव घाल**

अनेक प्रकल्पाचे प्रकल्पाधिकारी म्हणून भूमिका निभावत असताना त्यांना आलेले अनुभव हे आपल्या आयुष्यातही आपल्याला व्यवस्थापनाचे धडे देऊन जातात. संस्थाध्यक्ष म्हणून वेगवेगळ्या प्रकल्पांची बांधणी करताना, अधिकाऱ्यांची नेमणूक करताना त्यांनी त्यांच्यातल्या गुणांचा अचूक वापर करवून घेतला हे शिकण्या योग्य आहे. कोणतीही गोष्ट मिळवताना चुका होणे साहजिकच असते पण त्या चुकांमधून आपण काय बोध घेतो हे जास्त महत्वाचे असते. अपयशामध्येच उदयाच्या संशोधनाची बीजे रोवलेली असतात. हे डॉ. कलाम ठामपणे सांगतात. त्यांना लाभलेल्या अनेक वरिष्ठांनी त्यांच्या व्यक्तिमत्वाला दिलेल्या पैलुंचे दर्शन आपल्याला घडते. भारताची तंत्रज्ञान क्षेत्रातली भरारी स्वदेशी यंत्रणा उभी करुन देश स्वयंपूर्ण बनण्यासाठी त्यांनी केलेले प्रयत्न, त्यात आलेले यश,अपयश व अंतत: साकारलेले स्वप्न हा प्रवास थक्क करुन जाणारा आहे.

तरुणांना आयुष्यात नक्की काय मिळवायचे त्यासाठी आपण काय करायला हवे, प्रतिकूल परिस्थितीतही खचून न जाता आपल्यातल्या अग्नीला पंख देण्यासाठी डॉ. कलामांचे चरित्र नक्तीच प्रेरणादायी ठरते. नियोजन,व्यवस्थापन,मूल्यमापन अशा कित्येक रोज उपयोगी पडणाऱ्या गोष्टी आपल्याला यातून शिकायला मिळतात. जीवनाबद्दल सांगताना ते म्हणतात, ''जीवन हा एक कठीण संग्राम आहे. आपल्या स्वत्वाची जाणीव ठेवल्याशिवाय तो जिंकणे शक्य नाही.''


एकंदरीत ध्येयवेड्या मनुष्याची ही गाथा आहे. जी आपल्याला युगानुयुगे प्रेरीत करत राहील. त्यांना लाभलेल्या ८३ वर्षातील केवळ ६० वर्षातीलच गोष्टी त्यांनी त्यात सांगितलेल्या आहेत. प्रेरणादायी असंख्य पुस्तकांपैकीच हे पुस्तक एक आदर्श पुस्तकांच्या पंक्तीतील एक आहे.



Scanned with CamScanner

# आनंदी जीवनाचे रहस्य

**सोनाली थोरात**




आपण या जगात का बरे आलो असेल? आपल्या जगण्याचा हेतू नक्की काय आहे? असा प्रश्न तुम्ही कधी स्वत:ला विचारला आहे का? नाही ना? तर आज विचारा! दररोजच्या कंटाळवाण्या जीवनाला वैतागून कितीतरी वेळा आपण असा विचार करतो. कि, कुठेतरी एकांतात निघून जावे निसर्गरम्य ठिकाणी जाऊन आयुष्याचा आनंद घ्यावा. पण हा आनंद निरोगी जीवन आपण एकांतात न जाता घेऊ शकत नाही का? तर नक्कीच घेऊ शकतो, त्याचे उत्तर आहे इकीगाई. इकीगाई म्हणजेच निरोगी, अर्थपूर्ण आणि दर्जेदार जीवनाचा मूलमंत्र. इकीगाई म्हणेच जपानी भाषेत स्वत:च्या अस्तित्वामागील कारण शोधणे होय.

इकीगाई हे पुस्तक हेक्टर गार्सिया, फ्रान्सिस मिरलेस यांनी लिहिलेले असून या पुस्तकाची मराठी अनुवाद प्रसाद ढापरे यांनी अतिशय सोप्या आणि सरळ भाषेत मराठी वाचकांसाठी उपलब्ध करुन दिला आहे.

या पुस्तकात केवळ दीर्घ जीवन जगण्याचा हव्यास नाही तर अर्थपूर्ण जीवन! आनंदी जीवन ! सुखी जीवन जगण्याची कला सांगितली आहे प्रत्येकाने स्वत:चा इकीगाई शोधून जीवनात सतत कार्यरत राहल तर आयुष्य जगताना एक वेगळाच आनंद प्राप्त होतो. जीवनाला एक वळण प्राप्त होते म्हणजे त्यांनी निवडलेले काम तो तल्लीन होऊन पूर्ण करतो पण इथे आपण म्हणाल इकीगाई म्हणजे नेमकं काय तर इकीगाई या जपानी शब्दाचा मूळ अर्थ स्वत:च्या अस्तित्वामागील कारण'' इकीगाई म्हणजेच नेमक्या कोणत्या गोष्टीसाठी आपण जन्माला आलो आहोत हे शोधणे होय.

आपल्याकडे निवृत्ती किंवा सेवा निवृत्ती हा शब्द खूप प्रचलीत आहे एका ठराविक काळा नंतर आपण आरामदायी जीवन जगण्याच्या विचारात असतो पण ओकिनावा बेटावरील या माणसांना आराम आणि निवृत्ती या संकल्पनाच माहित नसाव्यात का? या बेटावरील सुमारे २५-१ लोक हे शतकवीर आहेत हे पाहून आश्चर्य वाटल्याशिवाय राहणार नाही, पण हे खरं आहे. यामागील रसस्य लेखकाने खालील मुद्द्यांच्या आधारे सांगितले आहे.

- ✻ इकीगाई
- ✻ वय न वाढण्याचे रहस्य
- ✻ लोगोथेरपी ते इकीगाई
- ✻ प्रवाहाचा शोध
- ✻ दीर्घायुषी मास्टर्स
- ✻ जपानमधील शतायुषी लोकांची शिकवण
- ✻ इकीगाई खादयसंस्कृती
- ✻ लयबद्ध व्यायाम
- ✻ दृढता

इकीगाई म्हणजेच स्वत: च्या जीवनाचा हेतू आपण सगळ्यांनी फुलपाखरु बधितले असेल, मोगरा



Scanned with CamScanner

बघितला असेल किती क्षणभंगुश्र असते आयुष्य तयंचे पण म्हणून काही ते इतरांना नेत्रसुख आणि सुगंध देण्याचे थांबवतात का? तर नाही कारण त्यांना त्यांच्या जीवनाचा हेतू म्हणजेच इकीगाई माहित असतो हेच रहस्य आपल्याला या पुस्तकात बघायला मिळते प्रत्येकाने आपला इकीगाई शोधायला हवा. त्यासाठी काही मुद्दे आपण विचारात घेऊ शकतो. जसे की, असा हेतू आपला निखळ आणि निर्मळ आनंद देतो का? आपण ते कार्य उत्तममरित्या करु शकतो? आपल्या हेतूने समाजाचे काही भले होऊ शकते का? अशा आणखी ही काही मुद्यांना विचारात घेऊन आपण आपला इकीगाई ठरवायला हवा.

एकदा का आपल्याला आपला इकीगाई सापडला की, मग त्यासाठी आपण आपले आयुष्य वेधायला हवे जपानी लोकांना आराम वा निवृत्ती माहिती नसते त्यामुळेच ही माणसे अविरत काम करताना दिसतात जपानमध्ये म्हणच आहे की, फक्त कार्यरत राहिलात तरी शतायुषी व्हाल. ओकिनावा बेटावरील माणसे फक्त जास्त  जगत नाही तर दर्जेदार आयुष्य जगतात. त्यात मोठा वाटा असतो तो त्यांच्या आहाराचा. हारा हाची बु म्हणजेच तुमचे पोट फक्त ८०% भरा. अन्न सुद्धा लहान लहान प्लेटस मध्ये वाढले जाते जेणेकरुन कमी खाल्ले जाईल. मासे,रताळी,पालेभाज्या यांचा प्रामुख्याने आहारात समावेश असतो. याशिवाय समूह बनवून एक मेकांना मदत करण्याची प्रवृत्ती सुद्धा या प्रामुख्याने दिसून येते.

त्यांच्या आनंदी आणि दीर्घ आयुष्यात मोालची भर टाकणारा आणखी एक घटक म्हणजे चिरतारुण्य. या प्रकरणात ताण–तणाव,मानसिक स्वास्थ यांवर प्रकाश टाकला आहे. यासाठी जपानी लोक चिंता सोडून देणे चिंता आयुष्य कमी करते. रात्री लवकर झोपून सकाळी लवकर उठणे, स्वतःला सतत व्यस्त ठेवणे. रिकामे बसू नये. सकस व मोजका आहार घेणे, वर्तमानात जगणे या गोष्टी करतात.

लोगोथेरपी या प्रकरणात आपल्या जीवनाचे उद्दिष्ट कसे निर्धारित करावे यावर लेखक एक छान संकल्पना सांगतो. ती म्हणजे लोगोथेरपी ही संकल्पना व्हिक्टर फ्रँक्लर यांनी मांडली आहे. यात व्यक्तीला तो ऐकू शकणार नाही, किंवा ऐकायला जड जातील अशा गोष्टी ऐकवल्या जातात यामुळे व्यक्तीला त्याच्या जगण्यासाठी एक महान उद्दिष्ट मिळते असे म्हणतात जगण्याचा हेतू असेल तर मग प्रेरणा आपोआपच मिळत जाते. लेखकाने स्वतःच्या अस्त्विाचा शोध घेण्याच्या या प्रक्रियेत ५ टप्पे सुचविले आहेत ते म्हणजे व्यक्ती निराश होते. काळजीत पडते, बैचेन होते तेव्हा थेरपी करणारा माणूस त्याला समजावतो की ही काळजीची अवस्था तुझ्यासाठी चांगली आहे. यामुळे तुला तुझ्या जगण्याचा हेतू समजायला मदत होईल. या दरम्यान व्यक्ती आपला जीवन हेतू समजून जाते. हा हेतू ती व्यक्ती स्वीकारु शकते किंवा नाकारु शकते. जेव्हा या थेरपीद्वारे व्यक्तीला आपला जीवन हेतू गवसतो तेव्हा ती पूर्ण ताकदीनिशी आपल्या ध्येयाच्या पाठीमागे लागते.

पुढे शोमा मोरीटी यांनी सांगितलेल्या या थेरपीमध्ये आपल्या भावनांवर नियंत्रण न ठेवता त्यांचे बारकाईने डोळस आणि हळुवार निरीक्षण करण्यावर भर दिला आहे. या थेरपीमधील महत्वाच्या गोष्टी म्हणजे आपल्या भावना स्वीकारणे, अंतिम साध्य काय असेल यावर लक्ष न देता, आपल्या कृतीवर भर  देणे, आपल्या भावनांवर नियंत्रण ठेवू शकत नसलो तरी कृती आपल्या हातात असते.

जेव्हा आपल्याला एखादे काम मनापासून आवडते. तेव्हा ते करणाऱ्या आपल्याला कंटाळा येत नाही. त्या कामात वेळ कसा निघून गेला याचे भान सुद्धा राहत नाही. याउलट न आवडणारे काम मात्रः जीवावर येते. फक्त करायचं म्हणून आपण काम करत असतो पण हेच काम आपल्याला समृद्धीत कसे बदलायचे यासाठी



Scanned with CamScanner

**प्रवाहाचा शोध** या प्रकरणात प्रवाहाचे महत्व सांगितले आहे. आव्हानात्मक ध्येय ठेवावे. ध्येय स्पष्ट असले पाहिजे. एखादे काम हाती घेतल्यानंतर कामातून पुरेपूर आनंद घेतला पाहिजे.

दीर्घायुष्याचे रहस्य यात लेखकाने वयाची १०० वर्षे ओलांडलेल्या माणसाची कथा सांगितलेली आहे. इतरांपेक्षा जास्त काळ पृथ्वीवर घालवलेली ही माणसे या माणसांनी सांगितलेल्या शतायुषी जीवनाची काही कारणे सतत नवीन गोष्टी शिकत राहणे निवांत राहणे,योग्य आहार व निद्रा शाकाहार सर्व काही मजेत चालले आहे असे समजणे मन आणि शरीर सतत व्यस्त ठेवणे.

आयुष्यातील प्रत्येक क्षणांचा आनंद कसा घ्यावा हे खरंच जपानी लोकांपासून शिकण्यासारखे आहे. ओगिमी या गावातील आपले अनुभव नोंदवताना म्हणतात की, चांगल्या खाण्यापिण्याबरोबरच जर कोणती गोष्ट असेल ती सदा हसत खेळत राहणे.

ही माणसे इतकी वर्षे जगतात, म्हणजे ती काय खात असतील हा प्रश्न आपल्याला पडला असेलच. या प्रकरणात लेखक इकीगाई जेवणाच्या सवयीबद्दल सांगायला विसरला नाही. रो १० ग्रॅमपेक्षा कमी मीठ खाणारी ही माणसे आपला सगळा प्रवास पायी किंवा सायकलने करतात. विविध प्रकारची फळे, भाज्या, कडधान्ये, भात यांनी त्यांचा आहार परिपूर्ण असतो.

लेखक जेव्हा ओगिमी या गावात पोहोचतात तेव्हा तेथील ८० वर्षावरील लोकांची तंदुरुस्ती,उत्साह बघून भारावून जातात. एखाद्या लहानग्या पोराप्रमाणे ही लोक सतत हालचाल करत असतात एका जागेवर अर्धा तास बसून राहिलो तर आपली पचनसंस्था कमकुवत व्हायला सुरुवात होते. इथे आपल्याला भारताने जगाला दिलेला योगा, सूर्यनमस्कार बघायला भेटतात जसे की, ज्ञान योग, कर्मयोग भक्ति योग, राजयोग, कुंडलिनी योग, हठ योग इ. याशिवाय ताईची मार्शल आर्टस्, किंगोगं शियात्सू आणि प्रसाचे विविध व्यायाम प्रकार यांची सविस्तर चर्चा या प्रकरणात केली आहे.


असं म्हणतात कि चिंता ही मेलेल्या माणसाला मारते परंतु चिंता ही जिवंत माणसाला मारते. कसली ही चिंता  न करता धैर्याने आयुष्यातील आव्हानांना कसे सामोरे जायचे याची चर्चा इथे लेखकाने केली आहे. इकीगाई लोक कधीही हार मानत नाहीत परिस्थितीत कशी ही येऊ दे तिला तोंड देण्याची क्षमता, लवचिकपणा आणि बुद्धांचे ध्वान त्यांना भावनिक दृष्टया कणखर होण्यास मदत करतात

जपानमध्ये वावी साबी अशी एक संकल्पना आहे म्हणजे ह्या जगात परिपूर्ण असे काहीही नाही आणि अपूर्णतेतच खरे सौंदर्य दडलेले आहे. यालाच समांतर अशी दुसरी संकल्पना म्हणजे इची गो इची ई सध्याच्या क्षण फक्त सध्या पुरताच आहे, तो कधीही परत येणार नाही'' म्हणजे प्रत्येक क्षण जगाला पाहिजे प्रत्येक क्षणांचा आनंद घेतला पाहिजे.

आपल्या प्रत्येकाचे इकीगाई हे वेगवेगळे असले तरी आपण सर्वजण त्याच्या शोधात आहोत आणि प्रत्येकाने कसून आपल्या जीवनाचा हेतू शोधला पाहिजे. सदा आनंदी,हसत खेळत जगले पाहिजे. दीर्घायुषी,निरोगी आणि आनंदपूर्ण जीवनाचा मूलभूत आपल्याला या जपानी लोकांच्या जीवनशैलीतून अनुभवायला मिळतो.



Scanned with CamScanner



# डॉ. बाबा आमटे यांचे पुण्यलीला नर्मदेशी हितगुज

सोनाली बर्डे

डॉ. बाबा आमटे यांचे नर्मदातीरावर प्रदीर्घ काळापर्यंत वास्तव्य असताना पुस्तकाचे लेखक डॉ. धैर्यशील बाबुराव शिरोळे यांचा त्यांच्याशी संपर्क आला. ह्या भेटीच्या वेळी नर्मदेच्या विशाल आणि सुंदर पात्राच्या काठावर आणि तेथील शिवमंदिराच्या सान्निध्यात बाबांनी त्यांच्या विविध प्रकारच्या अनुभवांचे कथन केले. पहाटे फिरायला जाताना, सूर्योदय पाहताना ते सायंकाळी सूर्यास्त होईपर्यंत बाबांनी अनेक प्रसंग, आत्मीयतेने सांगितले. हेच अनुभव लेखकाने बाबांच्या व नर्मदा नदीच्या हितगुजांच्या माध्यमातून वर्णन केले आहेत.

डॉ. बाबा आमटे जवळजवळ दहा वर्षे कसरावद येथे नमृदा तीरावर वास्तव्य करुन होते. सातत्याने नर्मदातीरी राहिल्याने नर्मदेचे आणि बाबांचे मैत्र प्रस्थापित झाले आहे. त्यांच्यात एक अलौकिक सुसंवाद चालत असे. त्यांच्या भेटीस येणारे अतिथी सांगत

सुरुवातीच्या दिवसात अशाच एका पहाटे बाबा मावळतीकडे वळलेल्या चंद्राच्या स्निग्ध प्रकाशात उभे राहिले असता बाबांचे हृदय अनेक प्रकारच्या भावनांनी भरुन आले. बाबांनी नर्मदेचे ते अपूर्व लोभस सौंदर्य सृष्टीत साठवत नदीच्या पात्राकडे प्रयाण केले. नर्मदेच्या पवित्र पाण्याला पदस्पर्श न करता बाबांनी तिला त्रिवार वंदन केले आणि म्हणाले,''रेवामैय्या,तुझी संमती असेल तर तुझ्या या नयनमनोहर किनाऱ्यावर मी सपत्निक स्थायिक होण्याची मनीषा बाळगून आहे'' नर्मदामैय्याने बाबांचे हे हृदयापासूनचे निवेदन ऐकले. तिच्या लाटांनी किनाऱ्याकडे धाव घेऊन बाबांचे स्वागत केले. बाबा कृतकृत्य झाले. हर हर नर्मदे, नर्मदे हर असा शब्दोच्चार करुन बाबांनी नर्मदाजलाला आपल्या ओंजळीत घेऊन भक्तीने अर्ध्य दिले आणि म्हणाले, ''नर्मदामाई मला तुझ्याविषयी सर्व कथन कर.''

''बाबा'' नर्मदा म्हणाली, माझा जन्म विंध्य पर्वतश्रेणीतील मैकल पर्वतात अमरकंटक येथे झाला म्हणून मला मैकलकन्या म्हणतात. माझा प्रथम उल्लेख ऋग्वेदातील खिलसूत्रात आला आहे. वाल्मिकींनी रामायणात माझे वर्णन केले आहे. पुराणकारांनी माझ्यावर नर्मदा पुराण लिहिले आणि कविराज रवींनी नर्मदालहरी नामक काव्य रचले. माझ्या पात्रातील पाषाणखंडाला शिवलिंगाची प्रतिष्ठा प्राप्त होईल असा वर शिवाने दिला.

बाबा नर्मदेला म्हणाले, एका छपराखाली फार वेळ मला राहता येत नाही. आता मी वानप्रस्थाश्रमात प्रवेश करीत आहे. ते म्हणतात,''वानप्रस्थाश्रम, ही एक संधिरेषा आहे. अवखळ बालपणाची आणि परिपक्व वार्धक्याची''

एकदा सूर्यास्त झाल्यावर बाबा म्हणाले,'' नर्मदे,



Scanned with CamScanner

मी खूप स्वप्ने पाहिली, माझे भाग्य थोर की, मी माझ्या स्वप्नांचा वाटाड्या होऊ शकलो. माझ्या मते समाजसेवक हा समाजाभिमुख असावा. कर्तव्यात तो विवेकी असावा. शब्दात निर्णायक आणि दैनंदिन सामाजिक परिस्थितीकडे जागरुक नजरेने पाहणारा असावा. समाजसेवकाचे कोठलेही काम गुणवत्तापूर्ण असावे, प्रवाही असावे, नर्मदे, मला तुझ्या किनारी देवाचा सृजनशील शब्द लाभला. पन्नास वर्षांपूर्वी मी आनंदवनाची स्थापना केली. आनंदवन ही माझी निवड आणि मला आनंद देणं ही आनंदवनाची निवड असे म्हणत बाबा स्वत:ला कृतार्थ संबोधतात.

नर्मदा नदी बाबांचे कौतुक करत त्यांना म्हणते, ''बाबा तुमचा प्रत्येक शब्द एखाद्या सुंदर चित्रासारखा आहे. जगात तीन मोठ्या गोष्टी आहेत त्या म्हणजे पर्वत, समुद्र आणि सतप्रवृत्त माणूस. ह्या तिघांच्या कर्तृत्वाला सीमा नसतात बाबा तुमच्याकडे तुमच्या कार्याकडे पाहिले की, हे तंतोतंत पटत`आणि असंही वाटते की, आयुष्य ही देऊन घेऊन वाटून घेण्याची गोष्ट आहे.''

बाबांना त्यांच्या आनंदवनातील कुष्ठरोग्यांचे सहजीवन पाहिले की असे वाटते, ज्यांना आयुष्याची घृणा आली होती ते आयुष्याच्या प्रेमात पडले. आपली बोटे कुष्ठरोगाने नाहीशी झाली याचा विचार करण्यापेक्षा राहिलेली बोटे आपण कशी कामी लावू ह्याचा विचार ते कुष्ठरोगी करु लागले. बाबा म्हणतात, ''माझ्या आनंदवनातील कुष्ठरोग्यांचे सहजीवन पाहिले की वाटते सगळे मिळून सगळ्यांसाठी मरण्यात आनंद आहे. सगळे मिळून सगळ्यांसाठी जगण्यात ब्रम्हानंद आहे. फुलाच फळ होण्यासाठी फुलाला सुकावं लागतं, हा निसर्गाचा नियमच आहे. माझ्या आयुष्याच्या पाकळ्याही हळूहळू गळून पडत आहेत याची मला जाणीव आहे.

बाबा नर्मदेला म्हणतात,''मैय्ये, सध्याच्या काळात कुशल हातांची कमतरता नाही, कमतरता आहे ती कुशल समजदार हृदयाची संवेदनशीलतेची''

डॉ. बाबा आमटे म. गांधीजी यांच्या सहवासात असताना आलेले अनुभव सांगतात. बाबा सेवाग्रामच्या आश्रमात स्वयंसेवक म्हणून काम करीत होते. अनेक प्रकारची कामे त्यांनी केली. एकदा रसोड्यामध्ये जमिनीवर मांडी घालून बसून भाजी चिरत होते, भाजी चिरुन झाल्याावर ती भाजी त्यांनी स्वयंपाक्याच्या ताब्यात दिली. तेवढ्यात बापूजी तेथे आले. बापूजींच्या तीक्ष्ण दृष्टीला चिरलेल्या भाजीचे काही अंश जमिनीवर पडलेले दिसले. त्यांनी लगेच पुढे येऊन उचलले, पाण्याखाली धुतले आणि शिजण्यासाठी टाकले. तेव्हा बापूजी बाबांना म्हणाले, आपला आश्रम जनतेच्या मदतीवर चालतो आणि कोठल्याही प्रकारचा अपव्यय आपल्या हातून होता कामा नये. ही शिकवण बाबांना बापूजींकडून मिळाली.

पुढे नर्मदा नदीला बाबा म्हणतात, ''नर्मदे परमेश्वराने मानवाला ज्या गोष्टी दिल्या आहेत त्यामध्ये स्पर्श ही फार मोठी गोष्ट आहे'' ते म्हणतात, कुष्ठरोग्यांचे स्पर्शज्ञान कमी होते. त्यांचे स्पर्शाचे सुख दुरावते. त्यांना स्पर्श हवाहवासा वाटतो. बाबांच्या मते, स्पर्श हा पावसाच्या हलक्या सरीसारखा असावा. सोनेरी किरणासारखा असावा. स्पर्श हा भ्रष्ट,नष्ट करण्यासाठी नव्हे तर कोठलीही भावना फुलविण्यासाठी असावा. स्पर्श म्हणजे प्रत्यक्ष परमेश्वराचा कृपाप्रसादच!

नर्मदा बाबांशी संवाद असतांना त्यांना म्हणते, तुमच्यासारख्या सामर्थ्यवान समजाप्रेरकाच्या साथीत अपंगसुद्धा आपल्या स्वत:च्या कर्तबगारीच्या जोरावर यश गाठू शकतात. बाबांचे आनंदवनातील कार्य बघून समाजाच्या ध्यानात एक गोष्ट आली ती म्हणजे अपंगांना संधी द्या. भीक देऊ नका.

बाबा नर्मदेला म्हणतात, माझ्या अंधशाळेतील अंध मुले गावातील विवाह समारंभात गायनवादनाचे श्रवणीय कार्यक्रम करतात. टेपरेकॉर्डरच्या संगीतावर ही अंध मुले सुंदर नृत्य करतात आणि टेपरेकॉर्डर



Scanned with CamScanner

चालविणारा पण अंधच असतो. मुक–बधिर मुले उत्कृष्ट विणकाम, शिवणकाम भरतकाम करतात. यंत्रे चालवितात. अपंगांची काम करण्याची शक्ती अचाट असते. त्यांच्या बुद्ध्याकांऐवजी त्यांचा कर्तृत्वांक पहायला हवा.

नर्मदा नदी त्यांच्या या कार्याचे तोंडभरुन कौतुक करते. त्यांच्यापुढे नतमस्तक होते. तेव्हा बाबा तिला म्हणतात, खरे पाहिले तर हे माझे श्रेय नाही. बाबा आपल्या कार्याचे सर्व श्रेय त्यांना सुदैवाने लाभलेले गुरु,लोकोत्तर लोकांशी झालेला सहप्रवास यांना देतात. तसेच ते म्हणतात मी केलेल्या कार्यात एका व्यक्तीचा फार मोठा सहभाग आहे. ती म्हणजे त्यांची पत्नी सौ. साधना आमटे बाबा म्हणतात, साधना माझी पाऊलवाट आहे.

बाबा पुढे सांगतात की त्यांच्या विवाहानंतर त्यांच्या आयुष्याची दिशा निश्चित करताना समाजाचा, कुटुंबियांचा फार मोठा विरोध सहन करावा लागला. तेव्हा त्यांच्या पत्नीने त्यांना साथ दिली. बाबा म्हणतात, तिच्या या सहकार्याबद्दली माझी नि:शब्द कृतज्ञता तिच्या ठायी चिरकाल आहे.

पुढे बाबा नर्मदेला म्हणतात, ''माते नर्मदे! गेली अनेक वर्षे तुझ्या प्रचंड प्रवाहाला बांध घालण्याचा विचार अनेक राजकारण्यांच्या मनात होता. तो विचार त्यांनी प्रत्यक्षात आणण्याची सुरुवात केली आहे. तुझे पाणी अडवून ते पश्चिमेकडील भूप्रदेशाला देण्याचे अंतिम लक्ष्य आहे. ''बाबा पुढे म्हणतात, पाण्यामुळे लोकांचे कल्याण होत असेल तर काही समस्या नाही. परंतु नदीच्या काठावर शेकडो वर्षांपासून आदिवासी वास्तव्य करुन आहेत. पण नर्मदेला धरण घालून बंदिस्त कले तर येणाऱ्या पाण्याच्या फुगवट्याखाली फार मोठा विनाश होईल. आदिवासींचे संपूर्ण जनजीवन उद्ध्वस्त होईल. हे आदिवासी उपजिवीकेसाठी या नदीवर, नदीच्या पाण्यावर अवलंबून आहेत.

नर्मदा नदी बाबांना महणते,'' बाबा, हा सर्व होणारा विनाश मला माझ्या डोळ्यांनी पाहावा लागणार आहे.माझ्या काठी राहणाऱ्या मानवांवर, प्राण्यांवर, वृक्षवल्लींवर मी अतोनात प्रेम केले, त्यांच्या जीवनातला एक अविभाज्य भाग झाडे, या माझ्या सर्व सदोहरांचा विनाश झाल्याचे पाहणे माझ्या वाट्याला आले आहे.''

यावर उपाय म्हणून बाबा नर्मदेला म्हणतात, यासाठी माझं एक स्वप्न आहे. आपल्या राष्ट्राला सद्यस्थितीतून बाहेर काढण्यासाठी आपल्याला सर्वच क्षेत्रातध्येयनिष्ठ,कर्तव्यनिष्ठ,प्रामाणिक,शीलसंपन्न,मातेपेक्षाही मातीवर प्रेम करणारे राष्ट्रभक्त युवक पाहिजेत. असे तरुण श्रमस्वी हवेत की जे वादळवाऱ्यात, रखरखाटात, टोळधाडीत धरित्रीचा पान्हा बेभान भोगू शकतील, अशी सर्जनशील साहसे हवी आहेत की, जी भान ठेवून योजना आखतील आणि बेभान होऊन त्या अमलात आणतील.

बाबा देवी नर्मदेकडे असे तरुण राष्ट्रोदधरासाठी मिळावेत असा हट्ट करतात आपली इच्छा व्यक्त करुन कृतार्थ करण्याची मागणी करतात.

तेव्हा पुण्यसलीला नर्मदा बाबांच्या हृदयापासून आलेली ती मागणी ऐकून सजल नेत्रांनी, उत्कट प्रेमाने आणि सद्गदित अंतर्यामीच्या स्वरांनी म्हणते, ''तथास्तु, अमर्याद, पुरुषोत्तमा, तथास्तु''.



Scanned with CamScanner



# हे भारता ! उठ ! जागा हो !

आशा सिन्नारे

एक तरुण तपस्वी म्हणून स्वामी विवेकानंद हे साहित्य, तंत्रज्ञान आणि इतिहासाचे उत्तम तत्वज्ञ होते. ज्यांनी परदेशात भारतीय संस्कृतीचा सुगंध पसरविला ज्या स्वामी विवेकांनद यांनी युवा पिढीला योग, राज, योग आणि ज्ञान योग अशी पुस्तके लिहून नवीन मार्ग दाखविला आहे. कन्याकुमारीतील त्यांचे स्मारक अजुनही त्यांच्या महानतेची कहानी सांगते अशा विविध पुस्तकातून स्वत:चे विचारातून युवा पिढीला संजीवनी देण्याचे कार्य स्वामी विवेकानंद यांनी केले आहे. त्यांच हे भारता ! उठ ! जागा हो ! या पुस्तकातून त्यांनी केले आहे . पुस्तकातून त्यांचे कर्तृत्व खरंच ऐवढे मोठे होते हे लक्षात येते

स्वामी विवेकानंद यांचा जन्म १२ जानेवारी १८६३ रोजी कोलव येथे झाला होता. त्यांचे खरे नाव नरेंद्रनाथ दत्त होते. ते त्यावेळी कोलकत्ता उच्च न्यायालयाचे प्रतिष्ठित व यशस्वी वकील होते त्यावेळी त्यांचे नाव विश्वनाथ दत्त होते. स्वामी विवेकानंद यांना बालपणात प्रेमाने नरेंद्र म्हटले जात असे. स्वामी विवेकांनद यांच्या वडीलांचे इंग्रजी, पर्शियन भाषेवर ही प्रभुत्व होते आणि ते उत्तम इंग्रजी आणि पार्शियन बोलत विवेकानंदच्या आईचे नाव भुवनेश्वरी देवी होते. ज्या धार्मिक विचाराच्या एक स्त्री होत्या. ती रामायण आणि महाभारत असे धार्मिक ग्रंथाचेही उत्तम ज्ञान असलेली अतिशय प्रतिभावान स्त्री होती. त्यांना इंग्रजी भाषेचीही चांगली जाण होती.

स्वामी विवेकानंदाच्या आई आणि वडीलांच्या चांगल्या मूल्यांमुळे आणि त्यांच्या पालनपोषणामुळे स्वामीजींच्या जीवनाला चांगला आकार मिळाला आणि ते उच्च गुणवत्तेचे धनी झाले. हे पुस्तकाचे वाचन करताना प्रकर्षाने जाणवले.

''स्वामी विवेकानंद यांना तरुणपणापासूनच अध्यात्माच्या क्षेतात रस होता, ते नेहमी शिव राम आणि देवाच्या चित्रासमोर ध्यान करीत. असे संत आणि तपस्वी यांच्या बोलणे नेहमीच त्यांना प्रेरणा देत असे आणि हेच नरेंद्रनाथ पुढे जाऊन जगभरातील ध्यान, अध्यात्म, राष्ट्रवाद, हिंदुत्व आणि संस्कृतीचे वाहक बनले आणि देशातील व आजच्या तरुण पिढीपुढे एक आदर्श बनविणारे तरुण म्हणजे असे स्वामी विवेकानंदाचे योगदान अमूल्य आहे.

स्वामी विवेकांनद १८७१ मध्ये नरेंद्रनाथ यांचा ईश्वर चंद्र विद्यासागर यांचा मेट्रोपालेटन संस्थान मध्ये एडमिशन करण्यात आले. १८७७ मध्ये जेव्हा मुलगा नरेंद्र तिसरी च्या वर्गात होते तेव्हा त्यांच्या कुटुंबाला काही कारणास्तव अचानक रायपूरला जावे लागले त्यामुळे त्यांचा अभ्यास खंडीत झाला होता. त्यानंतर



Scanned with CamScanner

त्यांनी आपले पुढचे शिक्षण १८७९ मध्ये त्यांचे कुटुंब कलकत्यात परतल्यानंतर प्रेसिडेन्सी कॉलेजच्या प्रवेश परिक्षेत प्रथम क्रमांक घेणारे ते पहिले विद्यार्थी ठरले.

ते तत्वज्ञान धर्म, इतिहास, सामाजिक विज्ञान कला आणि साहित्य अशा विविध विषयाचे उत्साही वाचक होते. वेद, उपनिषद, भगदगीता, रामायण, महाभारत आणि पुराण अशा हिंदू धर्मग्रंथामध्येही त्यांना खूप रस होता आणि त्यांच्या या विचाराची देवाण घेवाण आपल्याला या पुस्तकाच्या वाचनातून असे अमूल्य विचार हे केवळ वाचनातून मिळते म्हणून या आमृतचरित्रांचे वाचन करताना आणखी एक त्यांच्या जीवनातील गूढ रहस्य ज्ञात झाले की स्वामी विवेकानंद हे पारंपारिक संगीतात अतिशय पारंगत होते. आणि शारिरीक योग क्रीडा आणि सर्व कामामध्ये ते नेहमी सहभागी होते म्हणजेच त्यांचे हे जीवन कर्तृत्व आजच्या पिढीला एक प्रेरणा देणारे ठरले की आजच्या आधुनिक काळात मोबाईलवर आपल्या अमूल्य वेळेचा दुरुपयोग करतात. परंतु या उठ भारता! जाग हो या पुस्तकाचे वाचन केल्यानंतर आज प्रत्येक क्षेत्रात आपण परफेक्ट म्हणजे कलागुणवान होण्यासाठी प्रोत्साहीत होण्यासाठी मार्गदर्शक ठरते, १८८१ मध्ये त्यांनी ललित कला परीक्षा उत्तीर्ण केली तर १८८४ मध्ये त्यांनी कला विषयाचे शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर त्यांनी १८८४ मध्ये बी.ए.ची परीक्षा चांगल्या पात्रतेसह उत्तीर्ण केली आणि त्यानंतरच त्यांनी अभ्यास देखील केला.

१८८४ चे वर्ष स्वामी विवेकानंदासाठी फारच वाईट वर्ष होते. यावर्षी त्यांनी आपल्या वडिलांना गमावले वडीलांच्या मृत्यूनंतर त्यांच्यावर त्यांच्या नऊ भावंडाची जबाबदारी आली. पण घाबरुन न जाता त्यांनी ही जबाबदारी खूप चांगल्या रितीने पार पाडली.

स्वामी विवेकांनदाना तत्वज्ञान, धर्म,इतिहास आणि सामाजिक विज्ञान या विषयामध्ये खूप रस होता. त्यांनी वेद उपनिषद,रामायण,गीता,हिंदू,धर्मग्रंथ मोठ्या उत्साहाने वाचले म्हणूनच त्यांना ग्रंथ आणि शास्त्राचे पूर्ण ज्ञान होते.

स्वामी विवेकानंद यांनी जनरल असलेल्या संस्थेत युरोपियन इतिहासाचा अभ्यास केला होता. स्वामी विवेकानंद यांनी केवळ अभ्यासातच प्रथम स्थान मिळवले नाही तर शारिरीक,व्यायाम आणि खेळातही भाग घेतला.

वाचनाने माणसाचे आयुष्य बदलून जाते हे आपणाला स्वामी विवेकांनदच्या जीवन कर्तृत्वा वरुन कळते म्हणूनच यातील एक विशेष बाब म्हणजे मी तुम्हाला सांगू इच्छते, की हर्बर स्पेनसरच्या पुस्तकाचा त्यांच्यावर खूप प्रभाव होता. पाश्चात्त तत्वज्ञांचा अभ्यास करत असताना त्यांनी संस्कृत ग्रंथ आणि गबाची साहित्यही वाचले

लहानपणापासूनच स्वामी विवेकानंदाच्या प्रतिभेची चर्चा होती, लहानपणापासूनच त्यांचे गुरुजी त्यांचे कौतुक करत. म्हणूनच त्यांना श्रृतीधर असे ही म्हणतात.

''स्वामी विवेकानंद आपल्या विद्यार्थी जीवनात बालक, नरेंद्र यांच्यावर जॉन रुद्रअर्ट हर्बर्ट स्पेसर आणि ह्युम याच्या विचाराचा खूप प्रभाव होता. त्यांनी त्यांच्या विचारावर खोलवर अभ्यास केला. याच काळात विवेकानंदानी ब्राम्हो समजाकडे झुकले सत्य जाणून घेण्याच्या उत्सकतेमुळे ते ब्राम्हो समाजाचे नेते महर्षि देवेंद्रनाथ ठाकूर त्यांच्या संपर्कातही आले.

उठा जागे व्हा,आणि उद्दिष्ट साध्य होईपर्यंत थांबू नको हे प्रेरणादायी सुविचार आपल्याला ध्येयप्राप्तीसाठी मार्गदर्शक ठरतात रामकृष्ण परमहंस हे स्वामी विवेकानंद यांचे गुरु होते. स्वामी विवेकानंद लहानपणापासूनच जिज्ञासू वृत्तीचे होते म्हणूनच त्यांनी एकदा महर्षी देवेंद्रनाथ यांना विचारले की, तुम्ही भगवान पाहिले आहे का? बालक नरेंद्र यांच्या या प्रश्नाने महर्षि आश्चर्यचकीत झाले, नरेंद्राची उत्सुकता शांत



Scanned with CamScanner

करण्यासाठी त्यांनी त्याला रामकृष्ण परमहंसाकडे जाण्याचा सल्ला दिला. त्यानंतर त्यांनी त्यांना आपले गुरु स्वीकारले आणि सांगितलेल्या मार्गावर मार्गक्रमण करीत राहीले. स्वामी विवेकानंद रामकृष्ण परमहंसामुळे खूप प्रभावित झाले. १८८५ मध्ये रामकृष्ण परमहंस कर्क रोगाने ग्रस्त होते तेव्हा विवेकानंद जीनी आपल्या गुरुची खूप सेवा केली. अशा प्रकारे गुरु आणि शिष्य यांच्यातील संबंध दृढ झाले गुरु ब्रम्हा गुरु विष्णु गुरु देवो महेश्वरा या विचारसरणीप्रमाणे आजच्या आधुनिक काळात गुरुचे महत्व पटवून देताना हे विवेकानंदाचे जीवन कर्तृत्व वाचताना प्रेरणा देतात.

यानंतर रामकृष्ण परमहंस यांचे निधन झाले यानंतर नरेंद्र यांनी वराहानगरात रामकृष्ण सहारा स्थापन केला तथापि नंतर त्यांचे नाव रामकृष्ण मट असे ठेवले गेले.

रामकृष्ण मठ स्थापनेनंतर नरेंद्र नाथांनी ब्राम्होचा संन्यास घेण्याचे व्रत घेतले आणि ते नरेंद्रचे स्वामी विवेकानंद झाले स्वामी विवेकानंद यांचे वयाच्या २५ व्या वर्षी त्यांनी स्वामी विवेकानंदानी गेरु वस्त्र परिधान केले आणि त्यानंतर ते संपूर्ण भारत पायी निघाले. त्यांच्या पैदाल यात्रे दरम्यान त्यांनी अयोध्या, वाराणसी, आग्रा, वृंदावन यासह अनेक ठिकाणी भेटी दिल्या. १८९३ मध्ये स्वामी विवेकानंद शिकागो येथे दाखल झाले आणि तेथे त्यांनी जागतिक धर्म परिषदेत भाग घेतला, यावेळी अनेक धर्मगुरुंनी त्यांचे पुस्तक एकाच ठिकाणी ठेवले

२३ डिसेंबर १८९२ रोजी विवेकानंद कन्याकुमारीला पोहचले. तेथे ३ दिवस ते गंभीर समाधीत राहीले यामध्ये त्यांनी आपल्या भारत भेटी दरम्यान दारिद्रय, दुःख त्यांची त्यांना माहिती दिली.यानंतर त्यापासून मुक्तीसाठी त्यांनी अमेरिकेत जाण्याचे ठरविले. स्वामी विवेकानंद चे कार्य आजच्या परिस्थितीला एक आधारस्तंभ आहे की, यावेळी भारताला एक नवीन प्रतिमा निर्माण करण्यासाठी उपयोगी ठरले.

स्वामी विवेकानंद यांनी रामकृष्ण मिशनची स्थापना मे १८९७ रोजी कोलकत्ता येथे केली. ज्याचे मुख्य उद्दिष्ट रुग्णालय, शाळा, महाविद्यालये आणि नवीन भारत घडविण्यासाठी स्वच्छता क्षेत्रात प्रवेश करणे हे होते.

साहीत्य,तत्रज्ञान व इतिहासाचे अभ्यासक असलेले स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिभेमुळे लोक प्रेरित होते आणि आता ते तरुणासाठी एक आदर्श बनले होते उठा जागे व्हा आणि आपले ध्येय प्राप्त होईपर्यंत थांबू नका, असे म्हणणारे भारताचे नवीन भारत निर्माण (स्वप्नातील भारत) निर्माण करण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले.

अखेर १९०१ मध्ये त्यांनी बोधगया व वाराणसीची यात्रा केली यावेळी त्यांची तब्येत सातत्याने खालावत होती. वयाच्या ३९ त्या वर्षी ४ जुलै १९०२ रोजी त्यांचे निधन झाले. ४० वर्षापेक्षा जास्त काळ जगणार नाही.ही असा त्याच्या भविष्यवाणी त्यांनी खरी केली.

स्वामी विवेकानंदाच्या बुद्धीने सारे जग आश्चर्यचकीत झाले. त्यांच्याजवळील तपस्वितेतून समाजमनावर आदर्शाचे प्रतिबिंब उमटले. त्यांच्या महान तेजाने सारे जगच दिपून गेले. आपल्या महान विचारांनी दशदिशाही प्रकाशमान असणाऱ्या या युगपुरुषाला अभिवादन !



Scanned with CamScanner

# थर्ड अँगल

**वेदिका गागरे**

लेखक विनोद शिरसाठ यांनी 'थर्ड अँगल' मध्ये १६ लेख प्रसिद्ध केले आहे. त्यातील ११ लेखांची एक पुस्तिका केली आहे. या 'थर्ड अँगल' मध्ये थिअरॉटिकल मित्राने प्रॅक्टिकल क्लबमध्ये केलेली भाषणे दिलेली आहेत. या पुस्तकात ९८% कसं लढायचं, वास्तवाच्या जवळ जाण्यासाठी, सापेक्षतावाद समजायलाच हवा!, गोमाशी आणि संशयात्मा, गांधीविषयी इतके गैरसमज का आहेत, वाचनाविषयी तीन गैरसमज, संदर्भासह आणि उदाहरणाशिवाय, सर्वांत मोठी देणगी, स्वार्थी व्हा श्रीमंत व्हा, तारेवरची कसरत, हा प्रयोग करुन पाहाच! असे ११ लेख आहेत

लेखकांने या ११ लेखांकडे 'थर्ड अँगल' मधून कसे पाहावे हे सांगण्याचा प्रयत्न केला आहे. खरे तर पुस्तकाला 'थर्ड अँगल' असे शीर्षक का बरं दिले असेल अशी उत्सुकता मनामध्ये होती. जेव्हा हे पुस्तक वाचले तेव्हा 'थर्ड अँगल' म्हणजे काय असते ते समजले.

भूमितीतील सर्वांत महत्वाची आकृती कोणती असा प्रश्न कोणी विचारला तर तुम्ही काय उत्तर दयाल? खोलवर विचार केला तर उत्तर येईल काटकोन त्रिकोण या काटकोन त्रिकोणातले दोन कोन लघु ८० अंशापेक्षा लहान असतात. एक काटकोन बरोबर ९० अंशाचा असतो. काटकोनापेक्षा मोठा असलेल्या कोनाला विशाल कोन म्हणतात.

लेखकांचा असा अनुभव आहे की आपल्या सभोवतालची बहुतांश माणसं सभोवतालच्या जगाकडे आणि एकूणच जीवनाकडे लघु कोनातून पाहतात. अगदी थोडी माणसं काटकोनातून पाहतात. आणि फार म्हणजे फारच थोडी माणसं विशाल कोनातून पाहतात. जर ॲटिट्युड किंवा दृष्टिकोन शब्द वापरुन बोलायचं ठरलं तर लघुकोन म्हणजे संकुचित दृष्टिकोन. विशाल कोन म्हणजे व्यापक दृष्टिकोन आणि काटकोनाला व्यावहारिक दृष्टिकोन महणता येईल. या पेक्षाही अधिक सोपे करुन सांगायचे तर विशालकोनातून पाहणारे ते असमान्य, काटकोनातून पाहणारे ते सामान्य आणि लघुकोनातून पाहतात ते अति सामान्य. जर अँगलची परिभाषा वापरली तर असमान्यांचा तो फर्स्ट अँगल, अतिसामान्यांचा तो सेकंड अँगल आणि सामान्यांचा तो थर्ड अँगल.

लेखक म्हणतात की, लघुकोनातुनच पहायची सवय असणाऱ्यांना काटकोनातून पाहायला लावणे हे आपल्या समारेचे सर्वात मोठे आव्हान आहे. कारण थर्ड अँगलमधून सभोवतालाकडे पाहणाऱ्यांचे त्यातून झालेल्या आकलनाप्रमाणे जगणारांचे जीवन कमीत कमी दोषपूर्ण असते.

सर्वसामान्य माणसे आपल्या दैनंदिन जीवनात सुसंगत विचार करतात. आपल्याला अचुक काम कराचंय यासाठी किती साधनं लागतील, किती कालावधी लागेल. हे नाही झालं तर असं होईल. असं घडलं नाही तर तसं होईल असा हिशोब ते क्षणाक्षणाला मांडत असतात. तो कशाच्या आधारावर तर तर्काच्या आधारावरच. याचाच अर्थ आपण व्यवहारिक जगात वावरताना गणिती (तार्किक) पद्धतीनेच विचार करतो. पण तार्किक पद्धतीने आपण सर्वच बाबतीत विचार करत नाही. अनेक समस्यांना, प्रश्नांना सामोरे जाताना आपण विस्कळीत स्वरुपात विचार करतो.

ते कसे तर काही सोपी गणिते आपण सोडवतो कारण त्यातील बारकावे माहित असतात, त्यासाठीची सूत्रे व नियमांचेही आकलन आपल्याला झालेले असते. पण काही अवघड गणिते सोडवता येत नाही, कारण ते सोडवण्यासाठी आवश्यक ती सूत्रे, तत्वे आपल्याला माहित नसतात. मग आपण ती गणिते सोडवत तरी नाही किंवा कसं तरी उत्तर आणण्याचा प्रयत्न करतो. काही

चलाख माणसे उत्तर पाहतात व त्यानुसार गणिताची मांडणी करतात. तर काहीजण काहीतरी वेगळंच उत्तर काढून तेच कसे बरोबर आहे हे पटवण्याचा प्रयत्न करतात. खरे तर अशा गणितांना सामोरे जाताना शिस्तबद्ध विचार केला पाहिजे पायऱ्या पायऱ्याने पुढे गेले पाहिजे. पुन्हा नव्याने अभ्यास करुन कामाला लागले पाहिजे.

विज्ञानाचा गाभा म्हणजे प्रयोग (प्रॅक्टिकल) आणि गणिताचा गाभा आहे तर्कशास्त्र (लॉजिक). गणित व विज्ञान यांचा संबंध तर जगजाहीर आहे. परस्परांपासून त्यांना अलग करताच येणार नाही. प्रॅक्टिकलला लॉजिकची जोड द्यायलाच हवी. कोणतीही व्यक्तिगत वा सामाजिक कृती करण्यापूर्वी त्यामागे सुसंगत विचार असला पाहिजे. त्या शिवाय केलेले विचार पांगळे असतात हे आपण मोठ्या आवेशाने सांगत असतो, पण विचारशिवाय केलेली कृती आंधळी असते हा त्या सुविचाराचा पूर्वार्ध आपली लाइन ऑफ ॲक्शन ठरवताना विसरायला नको !

एक थिअरॉटिकल मित्र प्रॅक्टिकल मित्रांशी बोलतोय अशी या सदराची मध्यवर्ती कल्पना होती. त्यामुळे अनेक लेखकांचे,पुस्तकांचे संदर्भ यामध्ये आहेत. भाषा,विचार आणि चिकित्सा या तीन संकल्पनांवर या सदरात जास्तच भर दिला गेला. असे हे तीनही गुणविशेष तरुणाईचे आहेत.


तरुणाईला थर्ड अँगल मधून पाहायला लावण्याचा प्रयत्न लेखकांने या पुस्तकातून केलेला आहे.



Scanned with CamScanner

# अपयश ही यशाची पहिली पायरी असते...

ऋतुजा गायकवाड




विद्यार्थी मित्र मैत्रिणींनो जर एखादी गोष्ट करण्याची इच्छा असेल तर मार्ग नक्कीच सापडतो. सातत्य व कठोर परिश्रमाच्या बळावर सर्वसाधारण माणसा मध्ये अशक्य गोष्टी शक्य करुन दाखवण्याची ताकद असते. आपण नेहमी म्हणतो की, अपयश ही यशाची पहिली पायरी आसते. परंतु सिन्नरच्या भरत आंधळे यांच्या आयुष्यामध्ये मात्र ही म्हण खोटी ठरली. ''अपयशाचा अख्खा डोंगर चढल्यावर त्यांनी आयुष्यामध्ये यशाच उंच शिखर गाठलं.'' भरत आंधळे यांचा प्रेरणादायी प्रवास अत्यंत संघर्षमय ठरला आहे. आणि आजच्या लेखामध्ये आपण भारत आंधळे यांची आपल्यासारख्या तरुणांना प्रेरणा देणारी जीवन कथा जाणून घेणार आहोत.

१ सप्टेंबर १९७७ रोजी भरत आंधळे यांचा जन्म नाशिक मधील सिन्नर तालुक्यातील ठाणगाव या गावात झाला. भरत आंधळे यांचे कुटूंब गरीब होते. घरामध्ये अठराविश्व दारिद्र्य होतं. शिवाय शिक्षण घेणारे भरत आंधळे हे त्यांच्या घरातील एकमेव व्यक्ती होते. त्यांच्या वडिलाचं दुसरी इयत्ते पर्यंतच शिक्षण झालं होतं. छोट्याशा जमिनीच्या तुकडयावर शेती करुन भरत आंधळे यांच्या कुटूंबाचा उदरनिर्वाह चालू होता.

भरत आंधळे यांचे प्राथमिक शिक्षण ते राहत असलेल्या गावातील शाळेतूनच झालं. परंतु ते अशा शाळेतून शिक्षण घेत होते. जिथे वर्ग शिक्षिका फक्त हजेरी लावायची. त्यामुळे भरत आंधळे यांना शिक्षणाची फारशी आवड नव्हती. भरत आंधळे यांच पुढील शिक्षण रयत शिक्षण संस्थेच्या या शाळेमधून पूर्ण झालं. १० वी मध्ये भरत आंधळे यांना ५४.४०% गुण मिळाले आणि ते दहावीची परीक्षा पास झाले.हे टक्के भरत आंधळे यांच्या आयुष्यातील सर्वाधिक गुण होते. भरत आंधळे हे त्यांच्या कुटूंबातील एकमेव शिक्षित व्यक्ती होते. त्यामुळे दहावीनंतर पुढे त्यांनी घरच्यांना आर्थिक दृष्ट्या मदत व्हावी म्हणून नाशिक मधून आयटीआयचा कोर्स केला आणि बारावीपर्यंतची परीक्षा एक्सटर्नल म्हणून दिली. या मधल्या काळामध्ये त्यांनी नाशिक येथील हिंदुस्तान फास्टनर या कंपनी मध्ये कामगार म्हणून नोकरी केली. इ.स. १९९९ मध्ये त्यांनी बी.ए.च.शिक्षण पुर्ण केलं.

❋ आयआरएस (IRS)भरत आंधळे सर :–

१९९९ मध्ये ५०.८३ टक्क्यांनी बी.ए.पदवी मिळवली. भरत आंधळे यांनी त्यांच ग्रॅज्युशन पर्यंतचे शिक्षण स्वत:च्या पायावर केलं. ते नाशिकच्या कंपनीमध्ये कामगार म्हणून काम करत होते. ग्रॅज्युएशन झाल्यावर काय करायचं याचा विचार त्यांनी कधीच केला नव्हता. परंतु कंपनीत काम करणाऱ्या मित्राच्या भावाकडून भरत आंधळे यांना PSI परीक्षेबद्दल माहिती मिळाली .

हे पद खूप मोठं असतं हे भरत आंधळे यांच्या लक्षात आलं आणि त्यांनी मनात ठरवलं की त्यांना पीएसआय बनायचं. प्रशासकीय परीक्षांचा अभ्यास करण्यासाठी नाशिकची नोकरी सोडून भरत आंधळे



Scanned with CamScanner

यांनी पुणे गाठलं. भरत आंधळे हे छोट्याशा गावातील ग्रामीण भागातील एक सर्वसामान्य तरुण होते. त्यांच्या घरच्यांना प्रशासकीय परीक्षा काय असतात याची कल्पना देखील नव्हती.

त्यांच्या तालुक्यातील प्रशासकीय परीक्षांची तयारी करणारे साधारणता ते पहिले होते. घरच्यांना जेव्हा त्यांनी ते प्रशासकीय परीक्षेची तयारी करत आहेत याची कल्पना दिली तेव्हा घरच्यांनी त्यांना स्पष्ट शब्दात सांगितले की तू कुठेही जा काहीही कर, पण आमच्याकडे काही पैसे मागू नकोस!

परंतु भरत आंधळे यांनी ठरवलं होतं की ते पुर्ण वेळ विद्यापीठात जाऊन आयपीएसची तयारी करणार. ४ ऑगस्ट २००० रोजी त्यांनी पुण्याची गाडी पकडली. ते त्यांच्या ध्येयावर ठाम होते. पुन्हा काहीतरी मोठं बनवून दाखवायचं होतं. पुणे विद्यापीठात गेल्यावर त्यांनी एम.ए.च्या पदवीसाठी अर्ज भरला. परंतु त्यावेळी त्यांना लक्षात आलं की  पुणे विद्यापीठामध्ये होस्टेलमध्ये राहायचं असेल तर त्यासाठी डिस्टिंक्शन लागतं. आणि ते त्यांच्याकडे नव्हतं, भरत आंधळे एक सर्वसाधारण विद्यार्थी होते. त्यांना शाळेमध्ये असताना देखील दोन–तीन विषयांत ATKT देखील लागली होती. अशामध्ये डिस्टीक्शन तर खूपच लांब राहिलं त्यामुळे त्यांच्या राहण्याचा प्रश्न निर्माण झाला सुरुवातीला ते दिवसभर युनिव्हर्सिटीमध्ये अभ्यास करायचे आणि नंतर संध्याकाळ झाली की पुण्याच्या शिवाजी बस स्थानकावर झोपी जायचे.

सुरुवातीचा काळ त्यांनी बसस्थानकावर झोपूनच घालवला. नंतर विद्यापीठातील त्यांच्या एका गावाकडच्या मित्राने त्यांना वसतिगृहात राहण्यास परवानगी दिली. आणि त्या वस्तीगृहातल्या खोलीतून भरत आंधळे यांच्या जीवनाचा खडतर प्रवास सुरु झाला. भरत आंधळे यांनी मनात ठरवलं होतं की त्यांना आयपीएस बनायचं आहे कारण त्यांच्यासाठी ती पोस्ट खूप मोठी होती.


अशाप्रकारे, त्यांच्या अथांग परिश्रमाने शेवटी ते आयपीएस झाले.



Scanned with CamScanner

## श्यामची आई -एक संस्काराची शिदोरी

स्नेहल पाटील




देवालाही मागून न मिळणारे दान म्हणजे आई. देवाच्या अस्तित्वाची जाणीव म्हणजे आई. बालपणातील विश्व म्हणजे आई, वासराची गाय म्हणजे आई, दुधावरची साय म्हणजे आई, आई म्हणजे सर्वस्व असे सांगणारी व तिचा मातृत्वाचा गौरव करणारी अनेक काव्य, महाकाव्ये लिहिली गेली आहेत. यातीलच निस्वार्थ व निर्मळ भावनेने प्रेम करणारी व तितक्याच कठोरपणे शिस्त लावणाऱ्यसा आईची हृदयस्पर्शी कथा म्हणजे साने गुरुजींनी साकारलेले 'श्यामची आई' हे पुस्तक होय.

थोर क्रांतिकारक पांडुरंग सदाशिव साने उर्फ साने गुरुजी लिखित श्यामची आई ही कादंबरी त्यांनी नाशिक येथील कारागृहात अवघ्या पाच दिवसातत लिहून काढली या पुस्तकाची प्रस्तावना वाचल्यानंतर हे पुस्तक वाचण्याचा मोह आवरता येत नाही.

साने गुरुजींनी या पुस्तकात एकूण ४२ आठवणी लिहिल्या आहेत. आणि त्यांनी प्रत्येक आठवणीला पहिली रात्र, दुसरी रात्र ते बेचाळीसवी रात्र असं संबोधलं आहे. त्याचबरोबर त्यांनी प्रत्येक रात्रीला साजेस अस नाव दिल आहे. सावित्री व्रत, मुकी फुले, थोर अश्रू, पत्रावळ,भूतदया,श्यामचे पोहणे,स्वावलंबनाच शिकवण, दुर्वांची आजी, देवाला सारी प्रिय, उदार पितृदय, लाडघरचे तामसतीर्थ या काही निवडक रात्री संस्कार आणि उत्कट प्रेमाने काटेकाट भरलेल्या. या रात्री बालमुलांचे आयुष्य समृद्धी संस्कार आणि भरलेलय या रात्री बालमुलांचे आयुष्य समृद्ध संस्कारांने आणि विकास या आशेच्या किरणांनी अंतर्बाह्य उजळून टाकतील.

यातील प्रत्येक रात्र वाचताना साने गुरुजींच्या अफाट शब्दसामर्थ्याचे व वाचकांना व श्रोत्यांना खिळवून ठेवण्याच्या अगम्य लेखनशैलीचे दर्शन घडते यातील  प्रत्येक रात्रीच्या कथेत आईची विविध स्वभाव वैशिष्ट्ये उलगडतात. तसेच मुलांची जडणघडन करताना तिच्या प्रेमळ पण तितक्याच कणखर कठोर व परोपकारी स्वभावाचे दर्शन घडून येते. एखाद्या कसलेल्या कुंभाराप्रमाणे ती आपल्या मुलांना नैतिकदृष्ट्या घडविण्याचा प्रयत्न करताना दिसते. गुरुजींनी मुलांना नैतिकदृष्ट्या घडविण्याचा प्रयत्न करत यातल्या प्रत्येक गोष्टीमधून मोठा व मोलाचा उपदेश देण्याचा व तो तितक्याच सोप्या भाषेत पटवून देण्याचा प्रयत्न केला आहे.

श्यामची आई पुस्तक वाचतांना कोकणातील सुंसंस्कृत व साध्या कुटुंबाचे व तेथील सुसंस्कृतीचे वर्णन डोळ्यासमोर उभे राहते. हे पुस्तक वाचतांना



Scanned with CamScanner

आपण त्यामध्ये आपली आई शोधण्याचा प्रयत्न करतो व यातील श्यामची आई आपलीशी कधी होऊन जाते हे आपल्यालाच कळत नाही. यातील कथा जरी लहानग्या श्यामभोवती फिरत असल्या तरीही प्रत्येक गोष्टींत आई हीच मुख्य नायिका आहे.

'थोर अश्रू' या आठवणतील श्याम व आईचा एक उत्कट व प्रेमळ प्रसंग. आई आली व तिने माझे अंग पुसले व म्हणाली ''देवाची फुले काढ'' मी म्हटले ''माझे तळवे ओले आहेत, त्यांना माती लागेल, माझे खालचे तघळवे पुस'' ''तळवे रे ओले असले म्हणून काय झाले? कश्याने पुसू ते?'' आई म्हणाली ''तुझे ओचे धोंडीवर पसर, त्यावर मी पाय ठेवीन. पाय टिपून घेईन व मग उडी मारीन. मला नाही आवडत ओल्या पायाला माती लागलेली पसर तुझा ओचा'' मी घट्ट धरुन म्हणालो.

''हट्टी आहेस हो श्याम. अगदी एकेक खूळ कुठून शिकून येतोस कोणास ठाऊ! हं ठेव पाय'' आईने आपले ओचे धोंडीवर पसरले, मी माझे पाय त्यावर ठेविले. नीट टिपून घेतले व उडी मारली. आईचे लुगडे ओले झाले. त्याची मला पर्वा नव्हती परंतु मुलाच्या पायाला माती लागू नये. त्याची हौस पुरवावी म्हणून तिने आपले लुगडे ओले करुन घेतले. मी घरात गेलो व देवाची फुले काढू लागलो. आई निरांजन घेऊन आली व म्हणाली, श्याम! पायाला घाण लागू नये म्हणून जपतोस ! तसाच मनाला घाण लागू नये म्हणून जप हो.

गड्यांनो! किती गोड शब्द. आपली शरीरे व आपले कपडे यांना स्वच्छ राखण्यासाठी आपण किती धडपडतो, किती काळजी घेतो. परंतु मनाला स्वच्छ राखण्याबद्दल आपण किती जपतो? मन मळले तर कधी रडतो का? आपले मन निर्मळ नाही म्हणून रडणारा भाग्यवान विरळा ते थोर अश्रू या जगात दिसत नाही.

आपली मुले निर्भय,न लाजणारी चांगुलपणाने वागणारी हवीत यासाठी श्यामची आई खूप धडपडत असे. आईच्या या संस्कारामुळे श्याम धीट बनला. स्वातंत्र्यासाठी गांधीजींनी सत्याग्रहाचे रणशिंग फुंकले. गांधीजींच्या सत्याग्रह चळवळीचा संदेश सांगत निर्भय बनलेला श्याम वाऱ्यासारखा फिरु लागला. नाशिक धुळ्याच्या तुरुंगात त्याला डांबण्यात आले. तुरुंगात विनोबा भावे यांनी गीतेवर दिलेली प्रवचेन श्यामने जशीच्या तशी टिपून घेतली तुरुंगात त्यांच्या हातून एक महान कविता कागदावर उमटली

'खरा तो एकचि धर्म
जगाला प्रेम अर्पावे ।


हळुवार भावनांचे मनोहर काव्य आईने श्यामच्या हृदयात ओतले त्याचाच हा परिणाम!

श्यामच्या जीवनावर आईचा कमालीचा प्रभाव होता ती त्यांच्यासाठी केवळ प्राकृतिक आई नव्हती, तर ती संस्काराची जननी होती. सानेगुरुजींची आई भारतमातेच्या रुपात त्यांच्या अखेरच्या जीवनात उरली होती. आईचे निधन झाले तेव्हा गुरुजी म्हणाले, ''देवाने थोर माता आम्हांस दिली. जगाच्या बाजारात अशी आई मोठ्या भाग्याने मिळते. माझी आई गेली परंतु भारतमातेच्या देशसेवेसाठी मला तयार करुन गेली.''

देशप्रेम व मानवतेचा केवढा अत्युच्च विचार श्यामच्या आईने त्याला दिला होता. नवे चैतन्य आणि सामर्थ्य निर्माण करण्याची शक्ती सानेगुरुजींच्या आईच्या संस्कारात आहे. पुढच्या अनेक पिढ्यांची जीवने विशुध्द व विशाल बनवण्याची विलक्षण संजीवनी श्यामच्या आईमध्ये आहे.'मातृप्रेमाचे महन्मंगल स्त्रोत' म्हणून गौरविल्या गेलेल्या श्यामच्या आईला त्रिवार अभिवादन !



Scanned with CamScanner



# महाराष्ट्राचे शिल्पकार-साने गुरुजी

पंकज माळी

साने यांचे घराणे मुळचे देवरुखचे. पण पुढे कालांतराने त्यातील काही शाखा रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली तालुक्यातील पालगड या गावी स्थायिक झाल्या. या पालगड गावीच श्री सदाशिव उर्फ भाऊराव आणि सौ. यशोदाबाई उर्फ बयो या दापंत्याच्या पोटी २४ डिसेंबर १८९९ रोजी साने गुरुजींचा जन्म झाला. बारशाच्या दिवशी नाव ठेवले होते पंढरीनाथ पुढे शाळेत नाव घालवण्याच्या वेळी तो झाला पांडुरंग सदाशिव साने व पुढे महाराष्ट्राचे साने गुरुजी म्हणून तो प्रसिद्ध झाला.

परंतु घरात आणि गावात मात्र त्यांना पंढरी म्हणूनच हाक मारत असत. परंतु पंढरीला मात्र राम हे नाव फार प्रिय होते पुढे दोपालीच्या शाळेत शिकायला गेल्यानंतर त्याला तिथे राम नावाचा मित्रच भेटला या रामची आणि त्यांची मैत्री जूळली, ती अखेरपर्यंत कायम होती. दोघांची जिवाभावाची मैत्री जुळली आणि पंढरीचा राम भेटल्यामुळे तो मग आपल्या वाड्मय सृष्टीत स्वत: श्याम बनला. श्यामच्या जीवनाला आकार देण्यात त्याच्या आईचा हातभार मोठा होता. श्याम कसा घडला कसा वाढला त्याची स्मृती व हकिगत श्यामनेच शब्दबद्ध केली आहे.

जन्माला घालणारी तीच व ज्ञान देणारी तीच श्यामला त्याच्या भाग्याने थोर माता मिळाली. माझ्यात जे काही चांगले आहे. ते माझ्या आईचे, आई माझा गुरु आहे कल्पतरु! तिने मला काय दिले ! तिने मला काय दिले नाही. सारे काही दिले. प्रेमळपणे बघायला, प्रेमळपणे बोलायला तिने मला शिकवले .माझ्या आईनेच माझ्या जीवनात अत्तर ओंतले. मी मनात म्हणत असतो.

मदंतरंगी करुनी निवास
सुवास देई मम जीवनास

तीच वास देणारी,रंग देणारी. मी खरोखर कोणी नाही, सारे तिचे त्या थोर माऊलीचे, सारी माझी आई! आई! श्यामच्या बालमनावर दुखित दलित तांबद्दल अपार सहानुभूती बाळगावी अशी थोर शिकवण कोरली गेली. श्यामच्या आईने श्यामवर चांगले संस्कार केल्याचे या पुस्तकात दिसून आले.

पालगड या गावात माध्यमिक शिक्षणाची काहीही सोय नव्हती. श्यामची एक आत्या दापोलीत राहत होती. दापोलीत इंग्रजी शाळा होती. श्यामच्या वडिलांनी श्यामला त्यांच्या बहीनीकडे ठेवण्याचे ठरविले. त्यावेळी श्यामची आई म्हणाली, श्याम नीट रहा हो. मन लावून शीक. या विधानावरुन श्यामच्या आईला शिक्षणाचे असलेले महत्व दिसून येते. श्याम दापोलीत शिकायला आला. १० जून १९१२ रोजी दापोलीच्या या शाळेत चारवर्षे पूर्ण झाली. तेथे श्यामला खूप फायदा झाला वेळ फूकट न दवडण्यास ते शिकले. आजसारखी प्रवासाची वाहने त्या काळी उपलब्ध नव्हती. रस्ते नव्हते प्रवासही,



Scanned with CamScanner

खडतर असायचा. श्याम पालगडहून निघाला तो हर्णे बंदरापर्यंत बैलगाडीने आला. तिथून बोटीने मुंबई, मुंबईहून पुढे पुणे पुण्याहून रहिमतपूर. औंध हे संस्थान राहिमतपूर पासून चौदा मैलावर आहे. तिथे रेल्वे स्टेशन नाही त्यामुळे श्यामला बैलगाडीने रहिमतपूर पासून औंधला यावे लागले. असा खडतर प्रवास श्यामने विदयेसाठी केला. यावरुन साने गुरुजींचा शिक्षणाचा ध्यास दिसून येतो.

पुण्यात आल्यावर श्यामचे नूतन मराठी विद्यालयात ६ वी च्या वर्गात नाव घातले. तो रामकडे राहू लागला. वार्षिक परिक्षा झाली. श्यामने चांगला अभ्यास केला तो पास झाला. श्यामचे पुण्यात शिक्षण चालू होते. त्याच वेळी त्याची आई आजारी पडली श्यामची शाळा, अभ्यास बुडेल म्हणून त्याला कळवले नव्हते. दिवाळीची सुट्टी सुरु झाली म्हणून श्याम मुंबईला आला. त्याला आईच्या निधनाची बातमी कळाली. श्यामवर वज्राघातच झाला. श्याम म्हणतो माझ्या जीवनातील आशा गेली, प्रकाश गेला, माझ्या जीवनाचे सुत्र तुटले, श्यामच्या आईच्या आठवणीचे श्यामची आई नावाचे अत्यंत सुंदर पुस्तक पुढे लिहिले. मराठी भाषेचे ते भूषणच आहे. पुस्तकाच्या अखेरीस श्यामने म्हटले आहे, मित्रांनो, अशी आई मोठ्या भाग्याने मिळते. माझी आई गेली परंतू भारतमातेच्या सेवेसाठी मला तयार करुन गेली.

याच थोर व पवित्र भावनेने पुढल्या आयुष्यात देशसेवेचे व समाजसेवेचे कार्य केले. जड दु:खी अंतकरणाने श्याम परत पुण्यात आला. अभ्यासाला लागला मॅट्रीकची परीक्षा उत्तीर्ण झाला. ते १९१८ साल होते. पुढे त्याला महाविद्यालयीन शिक्षणाची ओढ लागली अनेक अडचणी पुढे होत्या, पण त्या सहन करायच्या त्यांच्याशी दोन हात करायचे, झगडायचे पण शिकायचे असा निर्धार त्याने केला. यावरुन श्यामचा शिक्षणाचा ध्यास खूप प्रबळ असल्याचे दिसून येते. १९१८ ते १९२२ अशी चार वर्षे त्याने महाविद्यालयीन शिक्षण घेतले. शिक्षणाबरोबरच श्यामला अन्य सामाजिक कार्यातही भाग घेण्याची संधी लाभली. एक स्वयंसेवक म्हणून त्याने काम केले. गांधीजींच्या सभेचे श्यामच्या जीवनावर झालेला प्रथम संस्कार पुढे तो अधिक दृढ होत गेला. कॉलेज चालू असताना त्यांनी इतर वाचन सुरु केले त्यावेळी जणू त्यांना इंग्रजी वाड्मयाचे जणू वेडच लागले होते. वाचनालयात बसून त्याने कितीतरी उत्तमोत्तम इंग्रजी ग्रंथ वाचले प्रो.द.वा. पोतदार यांचे श्यामवर खूप प्रेम होते. त्यांच्यासाठी श्यामने मराठी गदयाचा इंग्रजी अवतार नावाचे पुस्तक लिहिले .श्यामची एम.ए.ची.मराठीची उत्तरपत्रिका वाचून ते इतके प्रभावित झाले होते. की त्यांनी उत्तरपत्रिकेत लिहून ठेवले की हा मुलगा पुढे मोठा लेखक होईल ! त्यांचे हे विधान पुढे एखाद्या भविष्यासारखे तंतोतंत खरे ठरेल.

अनेक तऱ्हेच्या अडचणी,संकटे पार करुन श्याम १९२२ साली संस्कृत ऑनर्स व मराठी हे विषय घेऊन बी.ए. झाला. १९२३ साली जुलै महिन्यात तत्वज्ञानाचा विदयार्थी म्हणून अंमळनेर येथे तत्वज्ञान मंदिरात दाखल आता त्यांना साने गुरुजी म्हणून प्रचिती मिळाली. तत्वज्ञान मंदिरात असताना त्यांचे वडील वारले. १९२४ साली.अंमळनेर येथील खानदेश एज्युकेशन सोसायटी मध्ये ते पी.एस. साने सर म्हणून दाखल झाले.

काळी टोपी, ओठांवर ठसठशीत मिशा, गळ्याभोवती उपरणे गुंडाळलेले, काळा गळाबंद कोट,पायघोळ धोतर पायात कणेरी जोडा आणि हातात एखादे पुस्तक अशी त्या वेळी साने गुरुजीची मुर्ती होती. ते सहावीला मराठी आणि मॅट्रिकला इतिहास व मराठी हे विषय शिकवत. अध्ययनापूर्वी अध्ययन करणारे हे खरेखुरे निष्ठावंत गुरुजी होते. अशा निष्ठेमुळेच त्यांना गुरुजी हे पद सार्थ केले.

शिक्षणाकडे पाहण्याचा गुरुजींचा दृष्टिकोन परमपवित्र उदात्त मंगल होता. यालाच वेगळ शब्दरुप



Scanned with CamScanner

देतांना त्यांनी म्हटले

करी मनोरंजन जो मुलांचे
जडेलनाते प्रभूशी तयाचे

या पदयपंक्तीत गुरुजींचा शैक्षणिक दृष्टिकोन आणि मुलांविषयीची श्रद्धामय थोर भावना दोन्ही व्यक्त झालेली आहे.

पुढे जाऊन त्यांनी स्वातंत्र्य लढ्यात भाग घेतला २६ जानेवारी या निमित्ताने

अजि घुमघुमली स्वातंत्र्यतेची भेरी
दुमदुमली दुनिया सारी
अजि राष्ट्राने स्वतंत्रतेची केली घोषणा

या काळी असे एक गीत लिहिले.

२९ एप्रिल १९३० रोजी गुरुजींनी शाळेचा निरोप घेतला. गुरुजी स्वातंत्र्य लढ्यात सामील झाले.

साने गुरुजींनी पुढे स्वातंत्र्यलढ्यासाठी अनेक लेख कविता लिहून त्यातून सत्याग्रही, स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्यांना प्रवृत्त केले.

गुरुजींना स्वातंत्र्यलढ्यासाठी अंमळनेरला वाळवंटात सभा घेतली. परंतु पोलिसानी फारच सावध राहून त्याना अटक केली. १७ जानेवारी १९३२ रोजी गुरुजींना दोन वर्षाची सक्तमजूरीची शिक्षा ठोठावण्यात आली. पुढे १९३२ सालच्या ऑगस्ट महिन्यात धुळे तुरुंगातील काही सत्याग्रही नाशिकच्या जेलमध्ये पाठवण्यात आले. त्यात गुरुजींचा समावेश होता. जेलमध्ये असताना गुरुजींनी अनेक कविता, लेख लिहिले. त्यानंतर नाशिकच्या कारागृहातून १९३३ सालच्या ऑक्टोबर महिन्यात सुटल्यानंतर ते अंमळनेर या आपल्या कार्यभूमीत आले.

महाराष्ट्राच्या राजकीय सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, आर्थिक व वैचारिक जजडणघडणीत साने गुरुजी या दिवंगत व्यक्तिचा महत्वपूर्ण सहभाग आहे या चरित्र ग्रंथात लेखक श्री. राजा मंगळवेढेकर यांनी आपल्या या ग्रंथात गुरुजींच्या व्यक्तिमत्वाची एका सर्वस्वी समर्पणाची भावना ज्वलंतपणे वास करीत होती. म्हणूनच गिरणी कामगारांचा प्रश्न असो स्त्री कामगारांचा लढा असो काँग्रेसची निवडणूक असो वा बेचाळीसच्या चळवळीसारखा स्वातंत्र्याचा लढा गुरुजी हे वीर पुरुषांप्रमाणे स्वत: उठले देशातल्या तरुणांना उठवले स्वत: पेटले आणि देशातल्या असंख्य तरुणांनाही पेटवले आयुष्यभर लढले. झुंजले आणि महाराष्ट्रातल्या तरुणांचे सेनानी बनले साने गुरुजींच्या या क्रांतीकारी व्यक्तिमत्वावर श्री. राजा मंगळवेढेकर यांनी या जीवन कहाणीत विशेष भर दिला आहे.

साने गुरुजी हे खरे महाराष्ट्राचे शिल्पकार होते. अशा या महान पुरुषाचा मृत्यु ११ जून १९५० रोजी झाला अशा या वीर पुरुषास शत: शत: प्रणाम !



Scanned with CamScanner

# सगळच कधी नसतं संपत

ओमकार गाडगे

बी.एड. द्वितीय वर्षामध्ये कोर्स क्र. २०८ अंतर्गत एका पुस्तकाचे वाचन करुन त्यावर लेख लिहायचा होता. त्यासाठी मी फिटे अंधाराचे जाळे हे पुस्तक निवडलेहोते. कारणं सांगणारी लोकं यशस्वी होत नाहीत आणि यशस्वी होणारी लोकं कारणं सांगत नाहीत ही गोष्ट देशातील पहिले प्रज्ञाचक्षू IAS Officer कृष्ण गोपाल तिवारी यांची थक्क करणारी यशोगाथा वाचल्यानंतर आपल्यालाही पटते. परिस्थितीने आयुष्याच्या झोळीत टाकलेल्या अडथळ्यांचं दान हसत हसत स्वीकारणारे कृष्ण गोपाल तिवारी यांच्याविषयी पुस्तक वाचल्यानंतर माहिती झाली.

डोळे असलेले आपण सहज विचार करुन जातो. 'अंध व्यक्ती IAS कशी होणार? पण एकदा कतृत्व सिद्ध झालं की संशयाने बघणाऱ्या नजरा आपोआपच आदरानं झुकतात. निसर्गाने डोळ्यांचा प्रकाश हिरावून घेतल्यावरही IAS Officer होण्यापर्यंतचा कृष्ण गोपाल तिवारी यांचा संघर्ष व त्यानंतरचे त्यांचे जीवन **फिटे अंधाराचे जाळे** या पुस्तकात वाचायला मिळते.

उत्तर प्रदेशातल्या आंबेडकर नगर जिल्ह्यातील दशवनपूर नावाच्या एका लहानश्या खेड्यात कृष्ण गोपाल तिवारी यांचा जन्म झाला. त्यांचे वडील एक अल्पभूधारक शेतकरी होते. लहानपणीच त्यांना दृष्टीदोष होता. शाळेत फळ्यावर लिहिलेले त्यांना नीट दिसत नव्हते. पण त्यांनी व कुटुंबियांनीही त्याकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे शाळेत त्यांची प्रतिमा अत्यंत 'ढ' विद्यार्थी अशी झाली होते. एकदा त्यांच्या मामांकडे गेलेले असताना ते भिंतीला धडकले 'एवढी मोठी भिंत तुला कशी दिसली नाही? मामींच्या या प्रश्नावर त्यांच्याकडे काहीच उत्तर नव्हते.

मामींना संशय आला व कृष्ण गोपाल तिवारी यांच्या डोळ्यांविषयी त्यांच्या आईला सांगितले. आईने हट्ट केल्यामुळे त्यांच्या वडिलांनी त्यांना सुलतानपूर जिल्ह्यातील एका डोळ्यांच्या दवाखान्यात नेले. त्यावेळी लक्षात आले की त्यांच्या डोळ्यात काहीतरी समस्या होती. त्यामुळे त्यांनी या गोष्टीकडे चांगलं लक्ष देण्याचं ठरवलं. पुढे अहमदाबादला त्यांच्या डोळ्यांवर उपचार सुरु झाले. नवीन शाळेत नवीन मित्रांमुळे आता एक हुशार विद्यार्थी म्हणून त्यांची ओळख झाली होती.

परंतू पुढे जे घडले त्यांने ते आणि त्यांचे वडील दोघेही अक्षरश: हादरले. अहमदाबादच्या रेघटीना तज्ञ डॉक्टरांनी त्यांना रेघटीनायटीस पिग्मंटोझा हा आजार असल्याचे सांगितले. हा आजार कधीही बरा होत नाही उलट दिवसेंदिवस याची तीव्रता वाढतच जाते असे त्यांनी सांगितले. डॉक्टरांनी त्यांना डोळ्याची शक्य तेवढी काळज़ी घेण्यास सांगितले व नंतर चष्माही वापरु लागले. भविष्यात माझं काय होईल?' ही भिती आता त्यांना जाणवू लागली होती.

इयत्ता आठवीतील एका प्रसंगाचा उल्लेख या पुस्तकात त्यांनी केलेला आहे. नुकतेच नवीन कपडे मिळाल्यामुळे ते मोठ्या थाटात नवीन कपडे घालून शाळेत गेले होते. त्या दिवशी पाऊस सुरु झाल्याने सर्वजण व्हारांड्यात बसून पाऊस थांबण्याची वाट बघत होते. तेव्हा एक शिक्षक त्यांचे कपडे बघून त्यांना म्हणाले काय कृष्णगोपाल, आज तर तू एकदम कलेक्टर सारखा दिसतोय. त्यामुळे इतर मुले त्यांना पाहून हसायला लागली. त्यांना वाईट वाटलं. त्यांच्या मनात प्रश्न आला. कलेक्टर काय भानगड असावी? कलेक्टर म्हणजे नक्की काय? या प्रश्नाचं उत्तर शोधलं पाहिजे असे त्यांना वाटू लागले. एका व्यक्तीने त्यांना या प्रश्नाचे उत्तर दिले. कलेक्टर म्हणजे जिल्ह्याचा जणू राजाच. असे ते बोलले. त्याचबरोबर कलेक्टर होण्यासाठी काय करावे लागते हे सविस्तरपणे सांगितले. पुढे जाऊन मी कलेक्टर



Scanned with CamScanner

होणार असे म्हटल्यानंतर काही जणांनी त्यांची खिल्ली उडवली तर काहींनी प्रोत्साहन दिले.

दहावीत असताना फर्स्ट क्लास मिळवण्याची त्यांची इच्छा होती. परंतु ती पूर्ण झाली नाही. त्यांना ५६ टक्के मिळाले. अकरावी आर्टसला प्रवेश घेतल्यानंतर आता फर्स्ट क्लास मिळवायचाच असे त्यांनी ठरवले. त्यासाठी अकरावीतच अकरावी व बारावी या दोन्ही वर्षांचा अभ्यास करण्याचे त्यांनी ठरवले. ते शिकवणीही घेऊ लागले. त्यामुळे त्यांच्या शिकवणीसाठी लागणारे पैसे ते स्वत:च कमवू लागले. त्यांच्या मेहनतीचे फळ त्यांना मिळाले व बारावीत ६२ टक्के गुणांनी ते उत्तीर्ण झाले.

पुढे मोठ्या भावालाही डोळ्यांचा त्रास जाणवू लागल्याने त्यांना डॉक्टरांकडे घेऊन गेल्यानंतर कळाले की मोठ्या भावालाही त्यांच्यासारखाच डोळ्यांचा आजार होता. लहान भावाच्याही डोळ्यात त्याच आजाराची लक्षणे दिसली. साहजिकच हा धक्का त्यांच्या परिवाराला सहन होण्यापलीकडला होता. वडील अचानक रडायला लागत होते. कृष्ण गोपाल तिवारी यांच्या डोळ्याचा त्रास वाढत होता. दिसणे हळूहळू कमी होत होते. डोळ्यांचे ऑपरेशन करुनही दिसण्याची खात्री नव्हती ऑपरेशनसाठी खर्चही बराच होता. यामुळे नैराश्य येत होते. एकांतात ते रडत होते.

पदवीच्या परीक्षा देतानाही डोळ्यामुळे खूप अडचणींना त्यांना सामोरे जावे लागले. प्रश्न वाचण्यातच खूप वेळ निघून जात असल्याने पदवीला त्यांना पंचावन्न टक्के मिळाले. परंतु त्यांनी हार मानली नाही व स्पर्धा परिक्षेच्या तयारीसाठी ते अलाहबादला गेले. तिथे रुम घेऊन ते राहू लागले. अपंगत्वाचे प्रमाणपत्र त्यांनी मिळवले. त्यात ही त्यांना बऱ्याच अडचणी आल्या. एम.ए.च्या परिक्षेच्या तयारीसाठी त्यांनी बेल लिपी शिकण्याचे ठरविले. डोळ्याची परिस्थिती बिकट होत चालली होती. एक पान वाचण्यास त्यांना अर्धा तास वेळ लागत होता. परिक्षेसाठी लेखनिक शोधण्यासाठी त्यांना फार अडचणी जाणवल्यास. पदव्युत्तर शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांनी नेट साठी अर्ज केला. रिजर्व बँक ऑफ इंडियाच्या परिक्षेचीही ते तयारी करत होते. बी.एड.च्या परिक्षेचीही तयारी सुरु होती. त्यांचा जास्तीत जास्त वेळ विविध परिक्षांची तयारी करण्यात आणि देण्यात गेला होता.

कृष्ण गोपाल तिवारी बी.एड., नेट, रिजर्व बँकेची परिक्षा, सिविल सार्विसेसची पूर्व परिक्षा पास झाले. परंतु अजूनही मुख्य परिक्षा व मुलाखत बाकी होती. दिसणं कमी आल्यामुळे ते मित्रांकडून नोट्स वाचून घेऊन रेकॉर्ड करत होते. २००६ मध्ये मुख्य परिक्षेत त्यांना यश मिळाले नाही. परंतू हार न मानता २००७ मध्ये ते मुख्य परिक्षेत पास झाले. मुलाखतीमध्ये अपयश मिळाले. २००८ मध्ये ते परत मुलाखती पर्यंत पोहोचले व पासही झाले. त्यांना त्यांच्या कानावर विश्वास बसत नव्हता. त्यांची रँक १४२ होती. त्यांच्या मते **यश मिळवण्यासाठी दृष्टी नव्हे तर दृष्टीकोन असावा लागतो.**

परंतु परत एक समस्या निर्माण झाली. पास झालेल्या इतर विद्यार्थ्यांना सर्विस अलॉट झाली होती. परंतू कृष्ण गोपाल तिवारी यांच्या अलॉटमेंटचा विषय लांबणीवर टाकला गेला होता. हे ऐकून ते अस्वस्थ झाले. अचानक तोंडातला घास हिरावला जातो की काय असं त्यांना वाटत होतं. दिल्लीला जाऊन चौकशी केल्यानंतर त्यांना समजले की शारिरीक व्यंगामुळे सर्विस अलॉट करायला अडचण येत होती. डिओपीटी विभागाला या आधी अशा समस्येला सामोरे जावे लागले नव्हते. कृष्ण गोपाल तिवारी यांना न बघता वाचणे, लिहिणे व मदतीशिवाय चालणे या गोष्टी सिद्ध करायच्या होत्या. संगणकाच्या सहाय्याने त्यांनी डॉक्टरांनी सांगितलेले टाईप केले. ते ही कुणाच्याही मदतीशिवाय तसेच पेननेही त्यांनी



Scanned with CamScanner

सांगितलेली माहिती लिहून दाखवली. कुणाच्याही मदतीशिवाय चालूनही दाखवलं. त्यानंतर बऱ्याच प्रयत्नानंतर त्यांना नियुक्तीपत्र मिळाले.

त्यानंतर प्रशिक्षण सुरु झाले. कृष्ण गोपाल तिवारी प्रत्येक उपक्रमात मोठ्या हिरारीने भाग घेत होते. त्यांच्या मते **आपण जेव्हा स्वत:ची कीव करणं सोडतो तेव्हा आपल्या आयुष्यात प्रचंड मोठे बदल व्हायला लागतात.** पुढे त्यांनी नोकरी करताना अनेक समाजोपयोगी कार्य केली. स्वत:मधील क्षमतांचा, बुद्धीमत्तेचा आणि घेतलेल्या शिक्षणाचा पुरेपूर उपयोग अधिकारी म्हणून सामान्यातल्या सामान्य व्यक्तीला झाला तरच आपल्या अस्तित्वाला अर्थ आहे. असे ते स्वत:ला सांगत असतात.

स्पर्धा परिक्षेत यश मिळवण्यासाठी पी-३ आणि डी-५ या विषयी पुस्तकात ते सांगतात. पी-३ म्हणजे प्लॅनिंग प्रॅक्टिस आणि परफार्मन्स. डी-५ म्हणजे, ड्रीम डिझायर, डीटरमिनेशन, डेडिकेशन, डिसिप्लिन, पी-३ आणि डी-५ चा जीवनात अंगिकार केला की कितीही कठीण लक्ष्य गाळुले जाऊ शकते असे ते म्हणतात.

कृष्ण गोपाल तिवारी यांच्या यशोगाथेमधून जीवन जगण्याची नवी दिशा मिळते. आपल्याकडे काय नाही याचा विचार आपण बऱ्याचदा करत असतो व त्यातच वेळ वाया घालवतो. कारणं सांगतो. आपली परिस्थिती खूप बिकट आहे, आपल्यावरच अनेक संकटे येतात असे आपल्याला वाटत असते परंतु आपल्यापैकी बऱ्याच जणांची संकटे कृष्ण गोपाल तिवारी यांच्या जीवनात आलेल्या संकटासमोर खूप छोटी असतील. परंतु ते परिस्थितीला दोष देत बसले नाहीत तर स्वत: मेहनत करुन आपले यश गाठले.

दृष्टी गमावल्यानंतर कदाचित आपल्यातील बऱ्याच जणांना आता सर्व सपलं, असे वाटेल. खरंतर सगळ कधीच नसतं संपत जिद्द असेल, मेहनत करण्याची तयारी असेल तर काहीही होऊ शकते व ते कृष्ण गोपाल तिवारी यांनी सिद्ध करुन दाखवले त्यांच्या या यशोगाथेमधून प्रेरणा घेऊन आपणही आपल्या जीवनात यश गाठू शकतो का हा प्रश्न आपल्यातील सर्वांनी स्वत:ला विचारायला हवा. मुलाखतीमध्ये त्यांनी खूप सुंदर कविता सादर केली होती. शेवटी त्याचा उल्लेखही महत्वाचा वाटतो.

मैने पुछा ऐ वक्त
जोडता हूं टुटे जाते है वह
सजाता हूं नित्य नए सपने
पर चूर हो जाते है वह
लडाता हूं भानु (सुरज) को निशासे
पर हार जाता है वह निशा अब तू ही बता
तेरा हरण कैसे करु? बता दे वक्त तु ही मुझे
तेरा सामना कैसे करु
बता दे वक्त तु ही मुझे तेरा सामना कैसे करु?
वक्त ने कहा-
क्या तेरी यह भावनाएँ आत्मसमर्पण की नही है?
जिनपर तू विजय चाहता है
उनपर ही अर्पण की नही है?
धैर्यवान तू बन, साहसी तू बन
सफल होंगे वही साहसी जिनके मन
आती है क्षणिक बाधाएॅ मन मे निराशाएँ
पर वक्त से पहले तू न डर
सिर्फ लक्ष्य पर तू ध्यान कर
बिना खूब परखे तुझे
स्पर्श मै कैसे करु?
बता ऐ मनुष्य तु ही मुझे
तुझे जल्दी सफल कैसे करु?



Scanned with CamScanner

# फकिरा:शौर्य गाथा

शायदा बागवान

फकिरा ही अण्णाभाऊ साठे यांनी लिहिलेली मराठी भाषेतील कादंबरी आहे. ही कादंबरी इ.स.१९५९ साली प्रकाशित झाली. इ.स.१९६१ मध्ये महाराष्ट्र सरकारचा उत्कृष्ट कादंबरीचा पुरस्कार या कादंबरीला मिळाला. या कादंबरीत फकिरा नावाच्या तरुणाचे कथानक मांडले आहे. ब्रिटिश सत्तेला आव्हान देणारा फकिरा आणि त्याची शौर्य गाथा सांगणारी कलादृष्ट्या उत्तम अशी ही कादंबरी आहे.

आजपर्यंत आपण भरपूर चित्रपट किंवा नाटके पाहिली असतील, त्यापैकी बरेचसे चित्रपट किंवा नाटके आपल्याला खूप आवडलीही असतील. अभिनयाच्या जोरावर त्या चित्रपटातील किंवा नाटकातील एखादं पात्र कायमस्वरुपी आपल्या लक्षात राहून जाते. ते पात्र तितके प्रभावी सादर होण्यासाठी अभिनेत्याच्या अभिनयाचा कस तर लागतोच, पण त्याचबरोबर दिग्दर्शक, लेखक, फोटोग्राफर यांची सुद्धा भरपूर मेहनत असतेच. पण जेव्हा असाच अनुभव एखाद्या पुस्तकाच्या बाबतीत येत असतो, त्यातील प्रसंग आपल्या समोर घडत असल्याचा भास होतो, त्यातील घटना आपण पडद्या शिवाय पाहत असतो, तेवढ्या वेळासाठी का होईना त्या पुस्तकातील एखाद पात्र आपण जगत असतो, आणि पुस्तक वाचून झाल्यावरही काही वेळासाठी त्या पात्राचा हँगओव्हर आपल्या डोक्यात राहतो, हे सर्व त्याच पुस्तका सोबत घडत असते ज्यात लेखकाने आपली विचारशक्ती, आपलं सार लेखन कौशल्य पणाला लावून ते पुस्तक लिहिलेलं असते असा अनुभव फार कमी पुस्तकासोबत येत असते. त्यापैकीच एक म्हणजे मराठी साहित्यात मानाचे पान लाभलेली लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची फकिरा ही कादंबरी! अण्णाभाऊ साठे यांच्या सिध्द हस्त लेखणीने साकार झालेली आणि वि.स.खांडेकर यांची प्रस्तावना लाभलेली ही कादंबरी कधीही हार न मानणाऱ्या फकिरा या वीराची ही कहाणी अण्णाभाऊ साठे यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या झुंजार लेखणीला अर्पण केली आहे. वारणेच्या खोऱ्यातील बोलीभाषा, उत्कृष्ट वर्णनशैली, अप्रतिम कथाकथन, साहासप्रधान प्रसंग,काही ठिकाणी कथेला लागलेले काव्यात्मक वळण आणि कथेत माडलेले खरे खुरे सामाजिक वास्तव आणि कथेत यांच्या जोरावर ती कलादृष्ट्या श्रेष्ठ ठरली आहे.

भारतीय भाषांबरोबर रशियन,पॉलीश,सेक,जर्मन यासारख्या आंतरराष्ट्रीय भाषांमध्ये देखील या कादंबरीचे अनुवाद झाले आहेत.

ही शौर्यकथा आहे वारणेच्या खोऱ्यातील आणि आसपासच्या परिसरातील अन्याया विरुद्ध चीड असलेल्या फकिरा या वीराची. प्रसंगी अन्यायाविरुद्ध बंड पुकारण्याची कुवत बाळगणारा फकिरा हाच या कथेचा नायक आहे. वाटेगावच्या राणोजी मांगाच्या मनात शेजारील शिगावातील जोगणी आपल्या गावात आणण्याची इच्छा होती. दुसऱ्या दिवशी शिवागात जोगणीची जत्रा भरलेली असते. त्या दिवशी हा योध्दा एकटा जाऊन शिगावकरांसोबत झगडा करुन ती जोगणी पळवतो आणि जत्रेमधून परत येताना आपल्या दोन लहान मुलांसाठी म्हणजेच फकिरा आणि सहदेवसाठी पेढा आणायला तो विसरत नाही. पण जोगणी घेऊन परत येताना शिगावची वेस ओलांडून वाटगावच्या वेसेच्या आत आल्यावर देखील राणु मांग विरोधकांकडून म्हणजेच शिगावच्या खोतांकडून अन्यायाने मारला जातो. गावात जोगणी आणून गावाची प्रतिष्ठा वाढल्यामुळे सारा गाव राणोजीच्या कुटूंबाप्रती आदर आणि राणोजीसाठी हळहळ व्यक्तत करीत असतो. गावातील प्रतिष्ठीत व्यक्ती, पाटील, विष्णूपंत कुलकर्णी, यांच्याकडून राणोजीच्या परिवाराला सहानुभूती मिळत असते. आपल्या पित्याची शौर्यगाथा मनात ठेवून फकिरा हा लहानाचा मोठा होत असतो, आपल्या वडिलांने गावासाठी जिवाचे बलिदान दिले आणि अशा या थोर पित्याचे नाव राखण्याचे काम आपल्याला बजावायचं आहे.



Scanned with CamScanner

असं लहानपणापासूनच फकिराच्या मनात बिंबलेलं असते.

पुढे विविध घटना घडत असतात. शिगाव आणि वाटेगाव या दोन गावात जोगणीमुळे आलेल्या शत्रुत्वामध्ये इंग्रज सरकार हस्तक्षेप करते आणि मग हे वैमनस्य इंग्रज सरकार मांग,महार यांच्यात सुरु होत आणि पुढे ते वाढत जाते. गावात साथीचा आजार येतो आणि तो कमी की काय म्हणून त्याच वर्षी गावात दुष्काळ पडतो. पुढे आड मागे विहीर अशी परिस्थिती निर्माण झाल्यामुळे मांगवाड्यातील लोकांना मरण्याखेरीज दुसरा पर्याय दिसत नाही. महामारी आणि दुष्काळामुळे भरडून निघालेल्या मांगवाड्याचे दु:ख फकिराला पाहवत नाही. त्यामुळे फकिरा त्याच्या काही साथीदारांना सोबत घेऊन शेजारच्या गावातील धान्य लुटून आणून मांगवाड्यात वाटतो. नंतर याच कारणामुळे पाटील आणि फकिरा यामध्ये वाद निर्माण होतो. लुटीच्या बदल्यात शिक्षा म्हणून फकिराला आणि त्याच्या साथीदाराला पाटलाकडे हजरी द्यावी लागायची. काहीही चूक नसताना मिळणारी ती अत्यंत अपमानकारक वागणूक फकिराला सहन होत नाही. त्याच काळात फकिरा आणि त्याचे सहकारी सरकारी खजिना लुटतात. आता मात्र इंग्रज सरकार फकिराला पकडण्यासाठी आकाश पाताळ एक करते.

एवढे सारे शर्थीचे प्रयत्न करुन देखील फकिरा इंग्रजांच्या हाती लागत नाही. म्हणून इंग्रज सरकार मांगवाड्यातील बाया लेकरा सहीत साऱ्यांना माळावरील छावणीत ओलीस ठेवतात. गावात जोगणीची जत्रा भरावी म्हणून गावच्या प्रतिष्ठेसाठी जीवाचे बलिदान देणाऱ्या राणोजी मांगाचा हा वीर पुत्र फकिरा आठ जणांचा जीव वाचवण्यासाठी दोनशे बाया लेकरांचे होणारे हाल बरोबर नाही म्हणून मांगवाड्यात संरक्षणासाठी आलेला हा पराभव मोठ्या दिलदारपणे स्वीकार करुन स्वत:च इंग्रज सरकारपुढे हसत मुखाने हजर होतो. फकिराचा हा पराभव इंग्रजांच्या विजयापेक्षा वाचकाला अधिक सुंदर आणि आदरणीय वाटतो. यातूनच अण्णाभाऊ साठे यांच्या लेखणीची जादू दिसून येते.

कथेतील बरेच प्रसंग चित्तथरारक आहेत. सरकारी खजिन्यावर दरोडा टाकताना पळ काढणाऱ्या साथीदारांना उद्देशून फकिराच्या तोंडून निघालेले हे उद्‌गार **पळताना येनारं मरान वंगाळ, असं नरकात जातं मानूस, मरान साऱ्यांनीच येणार, सारंच मरनार पर मरनात बी डाव उजवं असत.** फकिराच्या तोंडून निघालेले हे बोल आगीच्या रखरखत्या निखाऱ्यापेक्षा काही कमी नाहीत. पुस्तक वाचून झाल्यावर मरणात ही डाव उजवं पाहणारा फकिरा खरचं ग्रेट वाटायला लागतो.

एकीकडे सर्व शक्तिशाली इंग्रजी शासन आणि विरोधात दोन वेळच्या भाकरीसाठी आयुष्याशी झगडा करणाऱ्या मांग महाराचं नेतृत्व करणारा फकीरा मुळात यांची ही लढाईच विषमतेवर आधारित आहे, त्यामुळे या लढतीत फकिराचा पराभव होईल हे आपल्याला आधीच कळून चुकते पण गावच्या प्रतिष्ठेसाठी जीवाची पर्वा न करणारा राणोजी मांग, पोटेच्या पोराचं मरण पाहून आता नेहमी नातवाच्या काळजीत राहणारी राहीबाई, फकिराची आई असून देखील फकीराला घाबरणारी राधा, मांगाच्या घरांना काटेरी झुडूप लावणारा कथेचा खलनायक रावसाहेब पाटील, पांढरीच आदेश पाळला पाहिजे म्हणून मरणाला सामोरे जाणारा साावळा मांग आणि काय बी करुन तुम्ही जगलं पाहिजे म्हणणारे विष्णुपंत ही पात्रे पुस्तक पुर्ण करायला परावृत्त करीत असतात.

शेवटी मला आवडलेले पुस्तकातील एक वाक्य,**हेही दिवस जातील दिवस घर बांधून राहात नाही!** दुष्काळ आणि तापसरी च्या महामारी मुळे हतबल झालेल्या फकिराला आणि महारवाड्याला निराशेच्या गर्दीतून बाहेर काढून आशेचा नविन किरण दाखवणारे विष्णुपंतांचे हे लाखमोलाचं वाक्य आजच्या परिस्थितीतही तंतोतंत लागू पडते.



Scanned with CamScanner

# सुजान पालकत्वासाठी...

श्रध्दा तांबे

मनुष्य हा एकच प्राणी असा आहे,ज्याला जीवनातील काही सहज प्रक्रियासुद्‌धा मुद्दाम शिकून घ्याव्या लागतात.भावनिक क्षितीजे रुंदावत असल्याने असेलही कदाचित.आजच्या धकाधकीच्या जीवनात तर याची गरज फारच जाणवत आहे.

दैनंदिन रहाट गाडग्याला बांधलेल्या अन् छोट्याछोट्या कुटुंबात राहणाऱ्या आजच्या माता-पित्यांना आपली मुले अपेक्षेप्रमाणे वाढवणे सुकर राहिलेले नाही असेच दिसून येत आहे.त्यामुळे वाढती स्पर्धा,मानसिक ताणतणाव, होमवर्क चा दबाव, अपुरा खेळ, टीव्हीचे आक्रमण, मोबाईल, खचणारा सांस्कृतिक पाया अशा सर्व अडथळ्यांतून मुलांचे व्यक्तिमत्त्व कसे जोपासावे अन् पालकत्वाची जबाबदारी यशस्वीपणे पार कशी पाडावी, याचाच साध्या सोप्या भाषेतील मूलमंत्र लेखिका डॉ. रमा मराठे यांनी आपल्या 'असे घडवा मुलांचे व्यक्तिमत्त्व' या पुस्तकातून दिला आहे. मुले आणि पालक यांच्यातील संवाद साधण्यासाठी व मुलांशी वागताना वारंवार वाचावे असे या पुस्तकात खूप काही आहे.

आपण सुजाण पालक आहोत आपल्या मुलांच्या भविष्याबाबत जागरूक आहोत. 'सुजाण पालकत्व' ही मुलांच्या यशाची गुरूकिल्ली आहे. कारण मुलांचं व्यक्तिमत्त्व आपणच घडविणार आहोत. मुलं ही आपली जबाबदारीच नव्हे तर अमूल्य संपत्ती आहे; पण जेव्हा आपण त्यांना शिल्पकाराच्या तन्मयतेने घडवू तेव्हाचं! आपल्याला जर खरोखरच मुलांना काही द्यावसं वाटत असेल तर उत्तम व्यक्तिमत्त्व द्या. 'उत्तम व्यक्तिमत्त्व', 'सुयोग्य आत्मप्रतिमा' ही मुलांना आपण फक्त आपणच देऊ शकतो.

मुलांची मन ही ओल्या मातीसारखी असतात. त्यांना योग्य आकार देण्याचे काम आपण करणं गरजेचे आहे. आजचे बालक हे उद्याचे एक जबाबदार नागरिक होणार आहेत, हे आपण सर्वांनी लक्षात घेऊन प्रत्येक कुटुंबात मुलाच्या विकासाच्या मानसिक व शारीरिक आरोग्याचा विचार होणं अत्यंत आवश्यक असतं. प्रत्येक मुलाची समस्या ही वेगळी असते. अगदी विरुद्ध टोकाची असू शकते. या दृष्टीने बालसंगोपनाचा व बालमानशास्त्राचा अभ्यास व समस्यांबाबत वैयक्तिक चर्चा करणं आवश्यक आहे. यासाठी इतरांची मदत घेतली तर ती एक सृजनशील विचारांची देवाणघेवाण होईल आणि मुलांच्या विकासातील अडचणी दूर होण्यास मदत होऊन एक चांगलं व्यक्तिमत्त्व आकारास येऊ शकतं. त्यामुळे या निसर्गदत्त देणग्यांना एक मूर्त स्वरूपही मिळू शकेल.

आज आपल्या समाजाची रचना एवढी बदलत चालली आहे की नातेवाईक तर दूरच. पण शेजाऱ्यांशी संपर्कदेखील कमी झालेला दिसून येतो. याच कारण इंटरनेट आहे. इंटरनेटमुळे सगळं जगच बदललं आहे. शेअरिंगसाठी फेसबुक आणि व्हॉट्सअॅपचे पर्याय आले आहे. त्यामुळे संवादाच्या काही पारंपारिक पद्धती मोडीत निघाल्या आहेत. काही गोष्टी आई-वडिलांजवळ बोलता येत नव्हत्या. ते व्यक्त होण्यासाठी नात्यातलाच नाही, तर आई-वडिलांच्या मित्रपरिवाराला एक काका, मामा, आजोबा कोणी तरी असायचा. जो या साऱ्या भावना समजून घ्यायचा. त्यातून निचरा व्हायचा, गरज पडलीच तर त्यांच्या आई-बाबांशी बोलायचा आणि समस्या निकाली निघायची. आज हा घटक कमी होत चालला आहे. पूर्वी काका, मामा कुशनसारखा कामी यायचा. आज असे किती बफर शिल्लक आहेत? याचे उत्तर नकारार्थीच येईल.हे पुनर्स्थापित करण्याचं काम पालकांना ठरवून करावे लागणार आहे.

आपल्या समाजात संस्काराचं महत्त्व वेळोवेळी बिंबवलं आहे; पण कधी-कधी संस्कारामध्ये एक प्रकारचं दडपण जाणवत असल्याचे दिसून येतं. संस्कार कितीही उच्च असले तरी आज बाह्य शक्तींचा रेटाच इतका प्रचंड आहे की, वाममार्गाकडे मुले वळण्याची शक्यता नाकारता येणार नाही. वयात येण्याचे प्रमाण आणि करिअरच्या वाटेवर स्थिर होत विवाहबंधनात अडकण्याच्या टप्प्यापर्यंतचा काळ खूप मोठा झाला आहे. या काळात संस्कार आणि बाह्य शक्तीचं द्वंद्व सुरूच असतं. संस्काराचा बडगा हा नाही म्हटले तरी करिअरच्या वाटेवर काही प्रमाणात तरी शिथिल होताना दिसून येतो. आर्थिकदृष्ट्या सुस्थापित असणं मुलांना वाममार्गाली खेचू शकतं.

शहरीकरणाच्या प्रचंड वेगामुळे आणि त्या वेगाला नव्या जीवनशैलीची जोड यामुळे प्रगतीच्या यात अनेक चांगल्या गोष्टी आल्या तशा वाईटदेखील आल्या आहेत. त्यामुळेच केवळ चित्रपटात दिसणाऱ्या अप्राप्य अशा गोष्टी सहज उपलब्ध होऊ लागल्या आहेत.

तळहातावरील मोबाईलच्या चार-पाच इंचाच्या पडद्यात सारं विश्व सामावून गेलेलं आज दिसत आहे.



Scanned with CamScanner

आजवर जुन्या पिढीने संस्काराच्या वर्चस्वाखाली झाकून ठेवलेल्या गोष्टींना आव्हान मिळालेले दिसून येत आहे. पूर्वी हे सगळं होतचं; परंतु फरक फक्त एवढाच की आजच्या इतकं एक्सपोजर तेव्हा नव्हतं. आज या सर्व बऱ्या-वाईटांचा मारा महासागराच्या लाटांप्रमाणे आपणावर आदळू पाहत आहे. काय घ्यायचं आणि काय सोडायचं हेच कळेनासं झालं आहे, असे दिसून येते.

पूर्वीचं व्यसन करण्याचं वय कमी होऊन आज १३-१४ वयापर्यंत येऊन ठेपलं आहे. अगदी नववी-दहावीतील मुला-मुलींनी एकत्र येऊन दारू पिणं, पार्टी करणं हे आज अगदी सर्वच स्तरातील घरांत आणि शहरांत आढळणारं ढळढळीत वास्तव आहे. त्यातच अमली पदार्थांच्या वाढत्या फैलावाची त्याला जोड मिळाली आहे. वयाच्या विशीपर्यंत दोन वेळा ब्रेकअप होणं हेदेखील सर्रास होताना आपण पाहतो आहे. स्मार्टफोनमुळं आज प्रेमाचं पॅकेच तयार झालं आहे. बॉयफ्रेंड, गर्लफ्रेंड आहे हा आजचा स्टेटस सिम्बॉल झाला आहे तर जोडीला प्रेम, व्यसन, व्हिडिओ गेम हे तणाव दूर करण्याचे पर्याय ठरू लागले आहेत.

शालेय वयात व्यसनांच्या विळख्यात अडकण्याची शक्यता अधिक असल्याची दिसून येते. सुगंधी सुपारीपासून सुरू झालेला प्रवास हा गुटखा, सिगारेटपर्यंत कधी जाऊन पोहचतो हेदेखील आजच्या मुलांना कळत नाही.

पौगंडावस्थेत मुलगे प्रेमात पडतात. त्याचा त्यांना मानसिक त्रास होतो आणि त्यातूनच अनेक प्रश्न निर्माण होऊ लागतात. त्यामुळे त्यांना सिगारेट, गुटखा, अमली पदार्थांचे व्यसन लागते. त्यामुळे नैराश्य प्राप्त होऊन मुले आत्महत्त्येचा प्रयत्न देखील करतात. हे आपल्याला समाजात दिसते. त्यामुळेच मुलं चुकली कुठे हे शोधण्यापेक्षा हे सारं या पातळीपर्यंत आलं कसं, नेमकं काय घडलं हे तपासणं आणि हे आपल्या घरी घडू नये आणि घडलंच तर त्याला सामोरे कशाप्रकारे जाता येईल हे पाहणं महत्त्वाचं आहे.

शालेय वयात आई-वडिलांपेक्षा मुलांचा शाळेत अधिक काळ व्यतीत होत असतो. अशावेळेस शिक्षकांशी असणारे संबंध हा खूप महत्त्वाचा घटक आहे. एके काळी शाळेतला शिक्षक हा मुलांच्या सर्वांगिण जडणघडणीत महत्त्वाची भूमिका बजावत असे. मुलांच्या अडचणी त्याला माहिती असत. त्यावरील उपाय शोधायचा तो प्रयत्न करीत असे. आज हा शिक्षक विद्यार्थ्यांमधील संवाद काही प्रमाणात तरी तुटलेला आपल्याला दिसत आहे. आजचा शिक्षक हा उदासीन, हतबल झालेला दिसून येतो आहे, असं म्हणावं लागेल. किशोरवयीन विद्यार्थ्यांसाठी शिक्षक हा खरं तर मित्रासारखा वाटला पाहिजे; पण आज ही परिस्थिती नसल्याचे दिसते. याला शिक्षणात आलेलं व्यापारीकरण कारणीभूत असल्याचं दिसून येत आहे, असे मानायला हरकत नाही. कारण नवनवीन शैक्षणिक धोरणांचा (नापास करायचं नाही. रागवायाचं नाही, मनोभंग, तेजोभंग होऊ द्यायचा नाही.) याचा परिणाम यावर झालेला दिसून येतो. त्यामुळे आदरयुक्त भीती आणि दहशत मुलांमध्ये राहिलेली आढळत नाही.

त्यामुळे शालेय वातावरणात मुले आपल्यावर असणारी बंधने झुगारून वास्तवाची जाणीव न ठेवता त्यामध्ये वाहत जाताना आपल्याला दिसत आहे. शालेय वयात मुले भरकटण्याला दोन गोष्टी कारणीभूत असल्याचं दिसून येतं ते म्हणजे घरातील विसंवाद. यामुळे मुले याच उत्तर इतरत्र शोधण्याचा प्रयत्न करतात. अशावेळेस आपल्यावर असणारी बंधनं ती झुगारून देतात. त्यामुळे मुलांच्या भावना, न्यूनगंड याचा विचार करता त्यांच्या शंकांचं निरसन होत नाही. आज आपण १०० वर्षाचं आयुष्य दहा वर्षात जगू पाहतो आहोत. जगण्याची गतीच इतकी वाढली आहे की, आपल्याला स्वतःकडे देखील पहायला वेळ नाही. त्यातूनच पालक-पाल्यातील संवाद तुटतो आहे.हे तुटणं गंभीर आजारापेक्षा देखील गंभीर आहे; पण आपण तुटलो आहोत. हे अनेकजण ते मान्य करत नाहीत ही सध्याची स्थिती आहे.

आज संवादच सर्वात महत्त्वाचा आहे. संवादातील अडथळे आणि परिणाम स्थलकालपरत्वे बदललेले आहेत हेच अनेकांना उमगत नाही. आपल्या पाल्याशी संवाद असणे हे आजच्या पालक वर्गासाठी अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे.

आजची परिस्थिती अशी आहे की, पालक आपल्या मुलांसाठी अनेक सुविधा द्यायला तयार असतात. चांगली शाळा, क्लासेस, छंद वर्ग मिळावं ही त्यामागची त्यांची प्रामाणिक भावना. आपल्याला मिळालं नाही ते घ्यावं हे मान्य; पण आपल्याला जे संस्कार मिळाले आहे ते त्यांना मिळावेत म्हणून प्रयत्न करावेत. आपण जर आयुष्यात सक्षमपणे, सुजाणपणे वावरत आहोत तर आपल्याला जे मिळालं ते आधी घ्यावं आणि मग न मिळालेल्या गोष्टींकडे



Scanned with CamScanner

वळावं हे श्रेयस्कर ठरेल.

आज मुलांना सर्वच गोष्टी पूरक असूनही त्यांच्यात न्यूनगंड निर्माण होताना दिसून येत आहे. विविध समस्यांना बळी पडणाऱ्या मुलांमध्ये नैराश्य निर्माण होत आहे. त्यासाठी पालकांनी योग्य प्रकारची दखल घेऊन त्या समस्यांचा स्विकार करून त्या कशाप्रकारे सोडविता येतील याचा विचार करणे गरजेचे आहे.

मुलांना मोठेपणी कर्तृत्ववान बनविण्यासाठी त्यांना कार्यक्षमतेचे धडे लहानपणापासूनच द्यायला हवेत. वेळ, श्रम, पैसा यांचे संयोजन कशाप्रकारे करावे याचे छोट्या–छोट्या उदाहरणातून पाठ शिकवायला हवे. घरातील आर्थिक निर्णयात त्यांचा समावेश करून घ्यावा. आर्थिक अडचणीदेखील मुलांना माहिती करून द्याव्यात. कदाचित तेदेखील एखादा मार्ग सचवू शकतील. यामुळे त्यांच्यात आत्मप्रेरणा निर्माण होऊन त्यांना जबाबदार कार्यक्षम आणि कुशलतेचे ज्ञान आत्मसात होईल.

मुलांना आत्मकेंद्रीत आयुष्याची सवय न लावणं गरजेचं आहे. मी, माझं करिअर पैसा, गाडी, घर यापलीकडे जाताना, त्याच्या क्षमतेला वाव देण्यासाठी या चक्राच्या बाहेरचं त्याला पहायला शिकविण्याची गरज आहे. त्यातूनच इतर मोहांकडे वळण्याची त्याची शक्यता कमी होऊ शकते. आजच्या पालकांसमोरील हे एक मोठे आव्हानच आहे. वाढती सुख–सुविधा, इंटरनेटचा वाढता प्रसार यामुळे मुलांच्या व्यक्तिमत्त्वावर त्यांचा परिणाम झालेला दिसून येतो. त्यामुळे पालकांनी याची वेळेत काळजी घेणं महत्त्वाचे ठरेल.

मुले ही अनुकरणप्रिय असतात. ते उत्साह, आनंद, नीटनेटकेपणा, चटपटीतपणा, स्वतःच्या दैनंदिन कार्यक्रमात काम, अभ्यास, चिंतन, खेळ यांचा मेळ सारासार विचार करून घरातील इतरांशी चर्चा करून योग्यप्रकारे निर्णय घेणे, समाधान, विवेकशीलता, आदरपूर्वक बोलणे हे सर्व गुण ते घरातील मोठ्यांकडूनच घेत असतात. ते मोठ्याच्या सवयी निरीक्षणातून करत असतात. त्यामुळे मुलांना उच्च विचारसरणीचे योग्य असे संस्कार हे आपणाकडूनच मिळत असतात. आई–वडील हे मुलांना श्रद्धा, विश्वास आणि आधाराचे स्थान वाटले पाहिजे. भीती, दुःख, चिंता, ताण यासारख्या नकारार्थी भावना मुलांनाही सतावत असतात. अशावेळी मुलांना समजावून सांगून आपुलकी, सहानुभूतीच नव्हे तर योग्य प्रेरणा देणे हे पालकांचे महत्त्वाचे कर्तव्यच आहे. मुलांना प्रेरित करून आत्मगौरवाची जपवणूक करताना व्यक्तिमत्त्वाची भरपाई करण्यास शिकवणे हेच योग्य.

मुले सुखी समाधानी आणि आनंदी राहण्यासाठी त्यांना अनेक विषयांची आवड निर्माण करून देणे. त्यामुळे ते आपल्या आवडी–निवडीनुसार त्या विषयांत प्राधान्य मिळवू शकतील. मुलांचे छंद जोपासण्यासाठी त्यांच्या कलागुणांना वाव देणे आपले कर्तव्य ठरेल. त्यांना छंद निवडण्याचा अधिकार देणे, छंद हा आनंदासाठीच असतो. त्यामध्ये त्यांना त्यांचे सामर्थ्य निर्माण करून देणे, त्यांना त्यांच्या आवडीनुसार चित्रकला, वाचन, नृत्य, गायन, हस्तकला, संगीत, नाट्य ज्या गोष्टीची आवड आहे, त्यांना प्राधान्य देणे. यामुळे वाढत्या तंत्रज्ञानाच्या अतिवापराला आळा बसून मुलांमध्ये आपले छंद जोपासण्याची कला अवगत होईल.


शेवटी इतकचं सांगावसं वाटतं की सारं काही संपलेलं नाही. बदलत्या काळानुसार आव्हानं बदलत जाणार आहेत. त्यांना स्वीकारत त्यावर उपाय कसे शोधता येईल हे महत्त्वाचं आणि त्या प्रश्नांची उत्तरे आपल्यातच दडलेली आहेत. गरज आहे ती फक्त मनातील गोंधळ दूर करून आजच्या गांगरलेल्या पिढीला सावरण्याची, त्यासाठी बाहेरून कोणीच येणार नाही. हे काम पालकांनाच करावं लागणार आहे.



Scanned with CamScanner

# मुंबईतल्या चाळीतील लोकजीवन

कौसर पिंजारी




अखंड महाराष्ट्राचे साहित्याच्या बाबतीत आराध्य दैवत कोण असेल तर पु.ल.होय. संपूर्ण महाराष्ट्रात आणि विशेषत: मराठी माणसांमध्ये पु.ल.देशपांडे माहीत नाहीत असा माणूस सापडणे कठीण आहे. जरी असा कोणी सापडला तर त्याने स्वत: काहीतरी गमावलं आहे, असे म्हणायला देखील काही एक हरकत नाही. पु.ल हे आपले जगणे समृद्ध करतात. हसत हसत बघण्याचा दृष्टीकोन ते आपल्याला देतात. पुलंनी उभी केलेली प्रत्येक व्यक्तीरेखा आपल्याला अशी आपलीशी वाटते. कारण पुलांनी उभ्या केलेल्या व्यक्तीरेखा आपल्या आजुबाजूला फिरत असतात. रोजच्या आयुषयात येतात आणि भेटतात त्यामुळेच पु.ल. हे आपल्याला आपलेसे वाटतात.

त्यांचा जन्म हा स्वातंत्र्यअगोदर १९१९ चा आहे. त्यांच्या लिखानातून आपल्याला स्पष्ट दिसून येतो. आयुष्याची ८ दशके त्यांनी साहित्य सेवेत घालविली. त्यांच्या याच साहित्य सेवेतील त्यांच्या हातून घडलेला शिरोमणी म्हणजेच बटाट्याची चाळ!

मुंबापुरीत चाळ संस्कृती नामशेष होत चालली आहे. उंच –उंच इमारती चाळींच्या जागी बांधल्या जात आहे. जुन्या चाळी, तेथील प्रेमळ माणसे, सुख दु:ख एकमेकांर्पीज्ञ वाटणे, मदतीला धावून जाणे याबाबत आजही खरा मुंबईकर भरभरुन बोलतो आणि आठवणींनी डोळ्यांच्या कडा ओलावतात.

या पुस्तकामध्ये अनेक घटना, गोष्टी, पात्रे आहेत परंतु सर्वात महत्वाच म्हणजे की ही सगळी पात्र तुमच्या आजूबाजूला दिसणारी आहेत. हा काळ पूर्व स्वातंत्र्य व उत्तर स्वातंत्र्य दरम्यानचा होताफ त्यावेळी यावर लेखन करण्यात आले. जेव्हा बऱ्याच गोष्टी भारतात घडत होते ब्रिटीश येऊन गेलेले होते. तरी काही ब्रिटीश राजवटीचे अंश भारतात राहून गेलेले होते. तेव्हाची ही गोष्ट.

या पुस्तकातील मला भावलेली गोष्ट अशी की, पु.ल.देशपांडे यांनी कुठल्याही प्रकारचा पूर्वग्रह न ठेवता एका सामान्य माणसाच्या दृष्टीकोनातून ही चाळ कशी दिसते  हे रेखाटले आहे. त्यामुळे कदाचित ती तुम्हां आम्हांसारख्या मध्यम वर्गीय नोकरदार लोकांना जास्त भावते कारण की पूर्वी पुस्तकामध्ये नायक पात्र हे तुमच्या आमच्या सारखेच आहेत. ते ही नोकरी करतात प्रत्येकाच प्रत्येकाशी काही तरी भांडण आहे. कुठे ना कुठे तरी प्रत्येकाचं कुणाशी तरी काही तरी जमतं आणि जमतही नाही तरीसुद्धा ही चाळ एकत्र राहते व एक चाळ म्हणून जीवंत राहते. हे खूप सुरेख पद्धतीने या ठिकाणी मांडलेले आहे.

सामान्य माणसाचं आयुष्य देखील आनंदी होऊ शकते फक्त गरज आहे ते डोळे उघडून बघण्याची. जी माणसे यात आहेत, ती आपल्या गुणांदोषां सकट या ठिकाणी मांडलेली आहे. हे लेख वाचत असताना असं वाटत की उठावं  आणि मुंबईतील गिरगावात जाऊन ही चाळ कुठे आहे ? हे बघाव



Scanned with CamScanner

बटाट्याची चाळ हे पुस्तक हाती घेतल्यावर त्याचे मुखपृष्ठ हे आपले लक्ष वेधून घेते. डेरेदार वृक्ष आणि त्यांच्या बुंध्यांमध्ये वसलेली बटाट्याची चाळ वरवर बघितले तर ती प्रचंड गजबजलेली दिसते. चाळीला आाधार देण्यासाठी एखादा टेकू लागतो की काय असे वाटते.

या लेखात चाळीमधील लोक,त्यांची भांडण,त्यांच्या चर्चा,त्यांच्या सोसायट्या याचं विनोदी चित्रण केलेले आहे. पण जसजसे पुस्तक शेवटाला येते तसतसे आपणांस असे जाणवते की, समाजामध्ये त्या काळी जे बदल घडत होते, ते तंतोतंत पु.ल.देशपांडे यांनी आपल्यासमोर ठेवण्याचा प्रयत्न केलेला आहे.

तेव्हा इमारतीचं जग आलेलं होत. चाळी पाडून नवीन इमारती बनविण्याचा अट्टाहास सर्वांनी केला होता. अर्थात तीसुद्धा एका प्रकारची प्रगतीच होती. पण चाळीत असणारा एकोपा, चाळीत असणारा मोकळपेणा तो कुठे तरी लोप पावणार होता आणि त्यांचे वर्णन पु.ल.देशपांडे यांनी केलेले आहे.

यात पहिली दोन प्रकरणे हे सांस्कृतिक चळवळ आणि सांस्कृतिक शिष्ठमंडळ ही आहेत. या प्रकरणामधून त्यांनी व्यक्तीरेखा साकारण्याचा प्रयत्न केलेला आहे. प्रत्येक व्यक्तीरेखा ही विरुद्ध अंगाने रंगवतांना पु.ल.नी त्या व्यक्तीरेखेला न्याय देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

गच्चीसह झालीच पाहिजे हे अजून एक छान प्रकरण. यामध्ये चाळीचा मालक हा नवीन झाल्याने तो काही नवीन सुविधा देण्याचे जाहीर करतो. यामध्ये तो गच्ची सर्वांसाठी खुली करतो मग ती गच्ची आपली व्हावी यासाठी सर्वांचे प्रयत्न सुरु होतात. पुढे होणारी धमाल या प्रकरणात मांडलेली आहे.

उपवास हे प्रकरण तर फारच मजेशीर आहे. पंतांचे वजन वाढल्याने ते डायट करायचे ठरवतात आणि त्या डायटचा कसा बोजवारा उडतो हे आजच्या काळातील साधर्म्य असणारी घटना त्यांनी रेखाटली आहे.

रघुनानांची कन्येस पत्रे,काही बासऱ्या ही प्रकरणे सुद्धा उत्तमच आहेत.

भ्रमण मंडळ म्हणजे या सगळ्यांचा कळसच आहे. इथे काही जण हे ट्रिप प्लेन करतात मग त्या ट्रिपचे काय घडते, ती कशी होते आणि त्यातल्या गमती जमती काय घडतात हे जाणून होण्यासाठी पुस्तक वाचणे अत्यावश्यक आहे.

एक चिंतन हे प्रकरण आपल्याला स्वत:त तसेच आजुबाजूच्या परिस्थितीमध्ये खोल डोकवायला लावते. चाळ पूर्वी कशी होती आणि आता ती कशी झाली याचे दाखले ते देतात.

लेखाच्या शेवटी वाचकांच्या डोळ्यांसमोर एक करुण दृश्य निर्माण होतं आणि आपोआप आपल्या पापण्यांच्या कडा ओलावतात. कारण त्याचं लिखानचं अस आहे तुमच्या परवानगीने पण आता इलाज नाही चाळ कोलंमडत आलीये शेवटचा घाव कोण घालणार? याची ती वाट पाहत आहे. तिला चिंता आहे ती एकच हा घाव घालणारा तिने ज्यांचा आजवर भार पाहिला त्या माणसांच्या नातवंडी परतंडवांना सिमेंट क्रॉंक्रीटच्या कपाटात त्रिलोरेकर शेठ येता की काय क्रिकेट खेळायला? असे प्रश्न ऐकू येणार नाहीत. मनमुराद गप्पा आता ऐकू येणार नाहीत गरीब किंवा कमी पैसे असताना देखील असणारी मौज आता सिमेंट कॉंक्रीटच्या भिंतीमध्ये सापडणार नाहीत हे दु:ख या पुस्तकाच्या माध्यमातून समोर आणण्याचा प्रयत्न केला.

पुस्तकातील शेवटचे प्रकरण मनाला सुखरुप लावत असते. काहीस वाईट वाटतं परंतु आतमध्ये धागे तुटलेले नाहीयेत. असा आशावादी दृष्टीकोन पु.ल. यांच्या लेखणीतून व्यक्त करतात.

हा लेख वाचल्यानंतर आपणांस असे समजते की, आपल्या सभोवताली देखील अशी एक चाळ उभी आहे. गरज आहे, ती फक्त आपले डोळे उघडे ठेवण्याची व मन मोकळे ठेवण्याची.



Scanned with CamScanner

## मोठा परिणाम करणाऱ्या छोट्या गोष्टी

अविनाश जावळे

मॅल्कम ग्लॅडवेल हे एक कॅनेडियन पत्रकार व लेखक आहेत त्यांनी द टिपिंग पॉईंट हे पुस्तक लिहिले. त्यातून ते हे सांगण्याचा प्रयत्न करतात की एखाद्या छोट्या गोष्टी सर्वात मोठा परिणाम कशा प्रकारे घडवून आणू शकतात. आणि हाच त्यांच्या पुस्तकाचा महत्वाचा मुद्दा आहे.

काही गोष्टी, घटना आपल्या उंबरठ्यावर येऊन पोहचतात त्या कशा प्रकारे पसरतात व किती मोठा परिणाम करुन जातात आणि टोकावरील बिंदूवर कशाप्रकारे पोहचतात हे **द टिपिंग पॉईंट** या पुस्तकातून आपल्याला बघायला मिळते.

पुस्तकाच्या सुरुवातीलाच प्रस्तावनेमध्ये लेखक मॅल्कम हे एका हश पप्पसीसयच उदाहरण देतात. हश पप्पीस हरी एक बुट कंपनी आहे. पहिल्या वेळेस बुटांची विक्री झाली नाही. परंतु एका व्यक्तीने एक छोटासा बदल करण्यास सांगितले. तो बदल त्यांना त्यांच्या विक्रीसाठी महत्वाचा ठरला व तो एक छोटासा बदल कंपनीला टोकावरील बिंदूपर्यंत घेऊन गेला आणि सर्वात मोठा परिणाम घडवून आणला.

पुढे लेखक अजूणन एक उदाहरण देतात ते म्हणजे ब्रुक्लीन ब्राऊन्सविले न्यूयॉर्क अशा शहरांमध्ये वाढलेले गुन्हेगारीचे प्रमाण ही गुन्हेगारी का वाढली, वाढती लोकांच्या बेरोजगारी,शिक्षण नाही इ. कारणामुळे. परंतु एकस इन्स्पेक्टरने फक्त एकच वाक्य बोलले. मला आता मोठ्यांचा आवाज येत नाही, या एका वाक्याने गुन्हेगारीत बदल घडवून आणला. कारण हे वाक्य गुन्हेगारांपर्यंत सुद्धा पोहचले या वाक्यामुळे पोलिस फोर्स मध्येही बदल घडून आला. या नंतर रोजगारीमध्ये बदल करण्यात आले. तरुणांना रोजगार मिळाला व गुन्हेगारीचे प्रमाण कमी झाले. आणि आता न्यूयॉर्क इ. सारख्या शहरातील लोक रात्रीच्या वेळी स्ट्रीटवरती निवांतपणे फिरु शकत होते. द टिपिंग पॉईंट हे पुस्तक आठ धड्यांमध्ये घटकांमध्ये विभागलेले आहे. पहिला चॅप्टर हा साथी रोगांच्या तीन नियमांविषयी आहे. यामध्ये लेखकाने सिफिलीस आणि एचआयव्ही सारख्या आजारांचे प्रमाण कशा प्रकारे वाढले याविषयी सांगतात. लेखक सांगतात कि साथी रोग हे संक्रमण प्रसारीत करणाऱ्या लोकांचे कार्य आहे. आपणच संक्रमण प्रसार करण्याचे माध्यम आहोत आणि आपल्यामुळेच असे संक्रमण होते.

आज आपण बघतो की चीनमधील फक्त एका छोट्या समाजातील घटकामुळे पूर्ण पृथ्वीवर कोरोनाचे संक्रमण झाले. १० लोकांपासून १०० लोकांना व १०० पासून १००० आणि पुढे हे संक्रमण करण्याचे कार्य मानवाद्धारेच होते आणि हे त्या एका छोट्या गोष्टीमुळे झाले हे आपणास येथे लक्षात येते. याचच एक उदाहरण देण्यासाठी लेखक डारनेल अॅफूगी याचं उदाहरण देतात. या एका व्यक्तीने ६० स्त्रियांमध्ये एचआयव्ही विषाणूच संक्रमण केले व तो रोग पसरत गेला. पूर्ण शहरभर हा रोग पसरण्याचे हा कारण होता तो श्रीमंत होता, पैसे होते गाड्या होत्या. यमुाळे स्त्रीया आकर्षीत होत होत्या याची स्टोरी आपल्याला १९ एप्रिल १९९७ च्या न्यूयॉर्क टाईम्स वृत्तपत्रामध्ये बघायला मिळते. ही घटना त्या व्यक्तीच नाव गुगलवरती सर्च केल्यावरही आपल्याला दिसून येईल.

एखादी छोटी गोष्ट किती मोठा परिणाम करते व उंबरठ्यावर कशी येऊन पोहचते हे लेखक येथे सांगत आहे. एक काही लोकांचा नियम, दोन, चिकटपणाने तत्थ्य, तीन, संदर्भाची ताकद हे तीन नियम पुरुषांच्या पहिल्या चॅप्टर मध्ये लेखक सांगतात. फक्त काही लोकांमुळे चिकटपणामुळे व त्यापाठीमागील संदर्भा मुळे साथी/रोग कशा प्रकारे पसरतात हे लेखक या तीन नियमांधून समजावून सांगतात. पुढील चॅप्टर्स मध्ये या

नियमांचे विश्लेषण करण्यात आले आहे.

पुस्तकातील चॅप्टर दोन, काहींचा नियम मध्ये लेखक जोडणारे, माहिती असणारे, विकणारे या तीन घटकांचा एकमेकांशी व समाजाशी असणारा संबंध सांगतात. जोडणारे म्हणजे अशी व्यक्ती जी आपल्याला उत्तर व्यक्तीच्या/गोष्टीच्या त्यांच्याकडे काही माहिती असते जी आपल्या उपयोगाची असते आणि एखादा बिजनेसमन व विक्री करण्यासाठी या माहितीचा उपयोग विक्रेत्यावर किंवा देणाऱ्याद्वारे होतो.

चॅप्टर तीन मध्ये चिकटपणाचा नियम यामध्ये लेखक असा सांगण्याचा प्रयत्न करतात की काही गोष्टींमध्ये खिळवून ठेवण्याचे,लक्ष वेधून ठेवण्याचे सामर्थ्य असते. याच उदाहरण देतांना ते एका टि.पी. शो च उदाहरण देतात. सिझम स्ट्रिट हा एक कर्दन शो होता, त्याचा पहिला एपिसोड १० नोव्हेंबर १९६९ ला प्रसारित झाला. या शो.ने. मुलांचे लक्ष वेधून घेतले. हेच नाही तर मुले झोपेतही या शो विषयी बडबडायची. आपण आजही बघतो पबजी सारख्या गेम्सच्या आहारी गेलेली मुल आजही झोपेत बडबडतात.

यावरुन लेखक एक उदाहरण देतात की, मुलांना चांगल्या प्रकारे शिकवायचे असेल तर शिकवतांना त्यांचे लक्ष खिळवून ठेवण्याचे सामर्थ्य किंवा कला असायला हवी तेव्हा त्यांना चांगल्या प्रकारे शिक्षण देवू शकतो.

पुस्तकातील चॅप्टर चार मध्ये संदर्भाची ताकद याविषयी लेखक समजावून सांगतात. हे सांगत असतांना लेखक गुन्हेगारीच एक उदाहरण देतात.

एक व्यक्ती ३०–४० पर्यंत का असेल तो रेल्वेमध्ये चाललेला असतो. त्याच्या समोर ४ काठ्या हातात असलेली तरुण बसलेली असतात. ते त्याला पैसे मागतात व तो व्यक्ती त्यांच्यावर बंदुकिने गोळ्या झाडतो व निघून जातो. होता, पुढे पोलिसांना लक्षात येते कि ते मुल गुन्हेगार होती, त्यांच्याकडे चाकू सारखी हत्यारे होती व त्यांच्या नावावर बरेच गुन्हे दाखल होती.

परंतु तो व्यक्ती कोण होता कि त्याने त्या चार मुलांना मारले, लोकांसाठी तो मसीहा झाला होता परंतु तो व्यक्ती स्वत:हून पोलिसांना सांगतो. त्याच्या विषयी

या घटनेमागील कारण मुलांच गुन्हेगारी करण्यामागील बॅकग्राऊंड म्हणजेच बघुया, मुल स्लम सारख्या एरियातील होती पैशांसाठी गुन्हेगारी करायची म्हणजे त्यांच्या बॅकग्राऊंडमुळे जी मुल गुन्हेगारीकडे वळाली.

दुसर म्हणे तो व्यक्ती ज्याने या चार मुलांना ठार केलं त्यांच्यावर त्याच्या वडिलांनी जुलूम केले होते ते खूप कडक शिस्तिचे होते. चुक केली कि सजा दयायचे याचा परिणाम त्या व्यक्तीवर झाला होता.

यावरुन एखादी घटना घटण्याचे पाठीमागचे कारण काय आहे हे लक्षात येते व तय कारणांमध्ये त्या छोट्या गोष्टीमध्ये किती ताकद आहे, कि ती गोष्ट कुणालकउे मोठा परिणाम घडवून आणू शकते हे येथे आपल्याला बघायला मिळते

पुस्तकातील चॅप्टर पाच हा आहे. यातही लेखकाने संदर्भ,बॅकग्राऊंड हे कशाप्रकारे भविष्यातील बद्दल घडविण्यासाठी कारणीभूत ठरतात याविषयी सांगतात चॅप्टर सहा आणि सात हे केस स्टडी याविषयी आहे. एखादी केस घटना याविषयी अभ्यास करणे म्हणे याविषयी लेखकाने समजावून सांगितले आहे. पहिल्या केस स्टडी मध्ये लेखक अफवा स्निकर्स (आवाज न होणारे) आणि भाषांतराची ताकद हे तीन मुद्दे समजावून सांगतात.

आपल्याला माहित आहे कि एक छोटीसी अफवा कशाप्रकारे परिणाम घडवून आणू शकतो. उदा कोरोनाची लस घातक आहे ही अफवा पसल्यामुळे लाखो लोकांनी प्रथम लस घेतली नाही जेव्हा सर्वांना लस सुरक्षित आहे हे सबुतांच्या आधारे सांगितले तेव्हा लोकांनी लक्ष घेण्यास सुरुवात केली हे आत्ताचे उदाहरण देऊन मी लेखकाने पुस्कात अफवाविषयी काय



Scanned with CamScanner

सांगितले आहे हे सांगण्याचा प्रयत्न केला आहे.

भाषांतराची ताकद तर आपल्याला माहितच आहे एखादा शब्द किंवा वाक्य चुकले किंवा ते बदलेले गेले तर तर त्याचा परिणाम कसा होतो हे आपल्याला माहित आहे आपल्या परिचयाचे उदाहरण मी येथे सांगतो, उदा हा चा या करणे, हारुण आणा चं मारुन आणा असे झाले तर किती मोठा परिणाम होऊ शकतो हे आपणास ठाऊकच आहे.

चॅप्टर सात मधील मध्ये लेखक, आत्महत्या, धुम्रपान याविषयी सांगतात. एखादी व्यक्ती आत्महत्येकडे का वळते? किंवा कॉलेजमधील विद्यार्थी तरुण धुम्रपान का करतात हे आपण येथे बघतो. यामध्ये परिवारिक घटक,मित्र परिवार, सामाजिक घटक व्यक्तीच्या मानसीक, शारिरीक गोष्टींवर कशा प्रकारे परिणाम करतात हे येथे लक्षात घेणे गरजेचे आहे. सर्वात पुस्तकाचा शेवटचा घटक आहे. द टिपिंग पॉईंट शेवट करतांना लेखक पुस्तकातील पहिल्या घटकापासून तर शेवटच्या घटकापर्यंत आपण काय शिकलो हे लक्षात घेणे महत्वाचे आहे असे लेखक स्पष्ट करुन सांगतात.

टिपिंग पॉईंट बदलल्या संभाव्यतेची आणि बुध्दीमान कृतीची शक्ती याची पुष्टी करतात. आपण बघीतले तर हे जग एकाच ठिकाणी स्थायी आहे असे दिसते परंतु नाही एखाद्या छोट्या गोष्टीला योग्य त्या ठिकाणी योग्य त्या वेळेस पुश करा आणि गोष्ट शिखराच्या उंच बिंदूपर्यंत जाऊन पोहचेल..



Scanned with CamScanner

# कोसला

– अजय बरे

भालचंद्र नेमाडे यांची कोसला ही कादंबरी स्वत:चे असे वेगळेच प्रभाविपण सिद्ध करणारी आहे. आजच्या काळाचे प्रतिबिंब तिच्यात पुरेपुर उतरले असून ती केवळ एखाद्या तात्कालिक समस्येला हाताळत नाही. कादंबरीच्या आवाक्याला पुरेल असाच एक मोठा विषय उकलण्याचा प्रयत्न तिच्यातून लेखकाने केलेला आहे.

कादंबरीत महत्व आहे ते पांडूरंग सांगवीकरच्या जीवनाबद्दलच्या काही कटू पण वास्तव जाणिवा कशा हळूहळू उमगत आहेत, याला त्याला आयुष्याच्या सगळ्या धडपडीच्या अर्थ अखेरच्या तडजोडीच्या क्षणांमध्ये उमगतो तो इतकाच की, आपल्या सारख्यांचा जीवनक्रम जन्माला येण्यापूर्वीच समाजाने ठरवून दिलेला आहे. अशा काही गोष्टी आहेत की, त्यातून सामान्य माणसाची सुटकाच होऊ शकत नाही, मरण्यापूर्वी काय काय प्राप्त कर्तव्य आहेत, तीही जाणून जणू नेमून दिलेली आहेत या आखीव मार्गातून जे सुटतात त्यांना जे काही वेगळे उमगले ते उमगेल पण पांडुरंग सांगवीकरला घाण्याचा बैल झाले पाहिजे तरीही पांडुरंग सांगवीकरचा वाचकांवर प्रभाव पडतो. तो निव्वळ घाण्याचा बैल वाटू शकत नाही कारण बैल असू नये यासाठी तो कधीही तिस्करणीय होऊ शकत नाही. जीवनात काहीततरी चाकोरी बद्धतेला तो सदैव कंटाळलेला आहे. जीवनात काहीतरी थोर असावे यासाठी तो नित्य काही ना काही धडपड करतो जेव्हा जेव्हा जीवन भकास, शून्य निरर्थक आहे. असे जाणवते, तेव्हा त्याला फार भय वाटते व तो त्या भीतीतून बाहेर येण्यासाठी प्रचंड धडपड करतो. मग तो संतापतो, वैतागतो जगामधल्या मोठेपणाचा तमाशा त्याला कॉलेजच्या लहानग्या विश्वातही भासमान होतो. अशी ही एक ध्यास लागलेली पण ध्येय न मिळालेली एक जिवंत व्यक्तीरेखा कोसला या कादंबरीतून नेमाडे यांनी परिश्रमपूर्वक अआणि स्वत:चे असे यशस्वीरितीने उभी केली आहे. समाजाशी माणधूस कसा आगतिकपणे, अजाणतेपणी गुंतलेला आहे आणि स्वत:चे असे महत्वपूर्ण एकटेपणच या समाजात किती दुर्लभ आहे. अगदी सामान्य वाटणाऱ्या जीवनक्रमातून मोठ्या भेदकरीतीने पटवून देण्याचा प्रयत्न नेमाडे यांनी कोसलामध्ये केला आहे.

कोसला म्हणजे कोष. ज्यात एक जीव धडपडून मोठा होण्याचा प्रयत्न करतो. १९६३ साली नेमाडेंनी वयाच्या २५ व्या वर्षी ही कादंबरी लिहीली. ही कादंबरी नेमाडेंच्या स्वत:च्या आयुष्यावर आधारित आहे. यामध्ये पांडुरंग सांगवीकर नावाचा नायक आपल्या शालेय जीवनापासून ते कॉलेज जीवन आणि त्यानंतर गावाकडील काही वर्ष हे सर्व आपल्या कादंबरीत मांडलेले आहे.

एक युवक ज्याला गावाकडील निरुत्साही वातावरण न आवडणारा त्याला त्याबद्दल वाटणारा तिटकारा. पण तरीही गावासाठी काहीतरी थोर कराव असं त्याच स्वप्न. पुढील शिक्षण पुण्यातील फर्ग्युसन कॉलेजजमधील आणि त्यात बऱ्याच केलेल्या उठाठेवी जसे कॉलेजच्या निवडणुकीस मित्राच्या सांगण्यावरुन भाग घेणे, स्नेहसंम्मेलनात पुढाकर घेऊन पैसे अडकणे अशा नाना प्रकारच्या गमती होतात आणि पुढे नीट अभ्यास करावा हा ध्यास.

मनी नावाची त्याची धाकटी बहीण आणि ती देवीच्या साथीने मरण पावते. ह्या क्षणाबद्दल लेखकाने इतक्या तिडकीने लिहिलं आहे की, आपल्यालाही त्या भावना जाणून येतात. कादंबरीतील मुखपृष्ठ हे याच भागावर आहे की जणू आपल्या समोर ह्या सर्व गोष्टी होत आहेत. आपल्याला त्या गोष्टी जाणवतात रमी विषयच प्रेम आहे. बुंदी विषयी वाटणारी वेगळी भावना आहे हे नायकाने येथे ठळकपणे दर्शविले आहे.

प्रत्येक विषयावर आपली रोखठोक मते कोसला



Scanned with CamScanner

कादंबरीत लेखकाने मांडलेली आहेत. आई आणि वडील यातील संवाद असो किंवा कॉलेजमधील मित्र असो.

कॉलेज मध्येच अर्धवट सोडून आल्यानंतर गावात बरीच चीथू होते ते सहन करत आणि गावातील काही मित्र आणि लोकांना पाहिल्यानंतर बदलेले विचार हे खरं ह्या कोसलाचा सार आहे.

कुठल्याही सांगवी नामक गावातला पांडुरंग सांगवीकर स्वत:ची कथा सांगायला सुरुवात करतो. कथा घडते मुख्यत्वेकरुन ५९ ते ६३ च्या दरम्यान पुण्यामध्ये पण त्याआधी मॅट्रिकचा अभ्यास करतांना उंदीर मारणारा पांडुरंग, घरातल्या आई आजीचे पिचलेपण, त्यातून होणारी भांडण,मुलांची त्रास देण्याची प्रवृत्ती, वडीलांची क्षुल्लक गोष्टीतली लबाडी आणि खोटारडेपणा आणि यात तयार होत गेलेला संवेदनशील भावनाप्रधान वरुन घट्टपणा दाखवत मिरवणारा पांडुरंग आपल्यासमोर मोजक्या शब्दांत उभा राहतो.तिथून पुण्यात आल्यावर पहिल्या वर्षात  गावाकडचे बुजरेपण टाळत व्यक्तिमत्व घडवण्याच्या मागे जाणारा सांगवीकर गॅदरींगला कल्चरल सेक्रेटरी होऊन पदरचे पैसे खर्च केलेली सेक्रेटरी, अभ्यासाकडे दुर्लक्ष करत चमकण्याच्या मागे असलेला सांगवीकर घरुन येणाऱ्या पैशांची फारशी फिकीर नसलेला आणि आल्या गेलेल्याला चहा सिगारेटी पाजणारा सांगवीकर, मेस सेक्रेटरी असताना वर्षाच्या शेवटी जोरदार फटका बसलेला सांगवीकर इंटरच्या आणि ज्युनिअरच्या वर्षात वाहत जातो. मनु मेल्यचे दु:ख पचविण्याची क्षमता नसलेला, मानसिक षडत्वाची जाणीव होणारा, पैशाची काटकसर करतांना मित्रासोबत राहूनही एकूणतच सर्वांपासून अलिप्त होत दूर होत जाण्याचा प्रवास करणारा सांगवीकर आता दिसतो.

आणि मग शेवटी परीक्षेत पेपर सोडून शिक्षकाला रामराव ठोकून गावी परत जातो. तेथे वडीलांचा धंदा कारभाराला शिव्या देत थोडेफार त्यातलेच काम बघत, इतर अश्याच शहरात राहून शिकून गावी परतलेल्या कंपूत दिवसाचे दिवस ढकलणारा. आता जे होईल ते होवो, सगळेच भंकस मग का चिंता करावी अशा पराभूत तत्वज्ञानाशी येऊन पोहोचलेल्या पांडुरंगाची सगळ्याला शुल्लक ठरवण्याच्या वृत्तीच्या मागे मी का जगतो ? वा काय अर्थ आहे का ह्याला हा धागा जास्त दिसतो. त्यातून तो सुरुवातीला गावाला, गावातल्यांना त्यांच्या मानसिकतेला शिव्या देत शहरात रमून जायचा प्रयत्न करतो तर कादंबरीच्या शेवटाला शिव्या देत गावच बरा म्हणत येतो. नॉस्टॅल्जिया त्याला येऊ देत नाही. पण खोल तळाशी कुठेतरी त्याला एक एक सोडून जाणारा मित्र खोली,वर्षे अस्वस्थ करत जाते. शेवटी तो सगळ्यांना सोडून फक्त प्रवाहात तरंगणारी काडी व्हायला तयार होतो.



Scanned with CamScanner

# अवयवदान विषयक माझे विचार

अतुल गायकवाड

उन्हाळ्याच्या असाच एका दुपारी मी नेहमी प्रमाणे दुपारच्या'तपोवन एक्सप्रेस'या ट्रेनमध्ये बसून कॉलसेंटरला औरंगाबाद येथे कामावर जात असताना ट्रेनमध्ये एक वयस्कर व्यक्ती माझ्या नजरेस पडली ती व्यक्ती जन्मत: दिव्यांग होती, एका प्रकारे सांगायचे झाल्यास त्या व्यक्तीचे हात हे अवयव हे माझ्या नजरेस पडले नाहीत या वयात सुद्धा ती व्यक्ती भर उन्हात वेगवेगळ्या देव-देवतांचे आणि महापुरुषांचे काही मनाला आकर्षणारी रंगीत चित्रे विक्री करत होती.

मला त्या व्यक्तीच्या धाडसाचे आणि जिद्दीचे कौतुक करावेसे वाटते, पण मनात एक खंतही होती. ती अशी की, अशा परिस्थितीला ही व्यक्ती दररोजची दोन वेळेची गुजरान करण्यासाठी सर्व हालअपेष्टा सोसून जगण्यासाठी नेहमी संघर्ष करत आहे आणि दुसरीकडे मुंबई सारख्या ठिकाणी असो वा देशाच्या कुठल्याही ठिकाणी असो, आपल्यातीलच आजचे काही तरुण हे ट्रेन्समध्ये दरवाजाजवळ उभे राहून का, थरकाप आणणारी घातक अशी स्टंटबाजी करुन वेळप्रसंगी आपले बहुमोल असे जीवन गमावून बसतात किंवा आपले हात किंवा पाय हे गमावून आपल्या वृद्ध कमावत्या आई-बापांच्या डोक्याला किंबहुना त्यांचे जीवन व जगणेच अवघड करुन या जगातून कायमचे निघून जातात.

जर त्या ट्रेनमधील दिव्यांग व्यक्तीला किंवा डोळे नसलेल्या लहान मुलांना म्हणजेच त्या सर्व व्यक्ती ज्या अपघतात किंवा जन्मत: काही अवयव हे गमावून बसलेली आहे वा ज्यांना अवयवाची अत्यंत गरज आहे, त्यांना जर असे अवयव मिळाले किंवा कृत्रीम पद्धतीने म्हणा किंवा दुसऱ्या एखाद्या माध्यमाने तर किती बरे होईल नाही का? त्या साठीच खऱ्या अर्थाने जिवंत असताना आपण सर्वांनी या करीता नक्कीच पुढे आले पाहिजे.

धडधाकट माणसे ही आज अपघातात मृत्यू पावतात. कुणाला ह्दय विकाराचा झटका येऊन तर कुणाला उच्च रक्तदाब, मधूमेह किंवा नैसर्गिकरित्या ती व्यक्ती ही मरण पावते. कोणाचा मेंदू हा मृत म्हणजेच ब्रेनडेड होतो, अशावेळी त्यांच्याा शरीरातील अवयव गरजूंना देणे याच्या शिवाय मोठे व महान कार्य नाही. मृत व्यक्तीच्या अंत्यसंस्कारानंतर शरीरातील चांगले अवयव नष्ट होतात. मग अशावेळी आपण आपल्या कुटुंबातील मृत पावलेल्या सदस्यांचे शरीर हे जाळून टाकण्याऐवजी जर त्या व्यक्तीच्या शरीरातील अवयव हे दुसऱ्याच्या शरीरात बसवून एखाद्या व्यक्तीला पुन्हा नव्याने जीवन जगण्याची संधी बहाल करणे आणि असे केल्यास जर गरजू रुग्ण जर मरणाच्या दारातून परत येत असेल व पुढे तो चांगले आयुष्य जगणार असेल तर अवयव दाना सारखे महान काम नाही. अवयव दानाने एखादयाला नवीन आयुष्य मिळू शकते आणि थांबलेले जगणे सुरु होऊ शकते.

उपलब्ध आकडेवारीनुसार, निरनिराळ्या देशातील अवयवदाना विषयीचे प्रमाण हे कमी-जास्त फरकाने दिसून येते. निरनिराळ्या देशातील अवयवदानाविषयक प्रमाण दर दहा लाख लोकांमागे स्पेन मध्ये ३५, इंग्लंडमध्ये २७, अमेरिकेत २६ व कॅनडात १४ इतके आहे. तर आपल्या भारतात फक्त ०.१६ इतके कमी आहे. त्यातही भारतात अत्तापर्यंत सर्वांत जास्त अवयवदानाच्या घटना चेन्नई म्हणजेच पूर्वीच्या मद्रास येथे नोंदविण्यात आले आहे आणि आपल्या महाराष्ट्रात पुणे जिल्ह्याचा त्यात समावेश होतो.

आपण बघतो की, एखादी व्यक्ती ही अपघाताने मरण पावल्यास, त्यांच्या घरच्यांना, जवळच्या व्यक्तींना डॉक्टर हे अवयवदान करण्यासाठी सूचवितात. त्यावेळी दु:खात बुडालेल्या व्यक्तींना मृत व्यक्तीचे अवयवदान करण्यासाठी प्रोत्साहित करण्याचे काम डॉक्टर, करत



Scanned with CamScanner

असतात.

सोबतच अत्यंत कुशलतेने व काळजीपूर्वक डॉक्टर हे अवयव एका व्यक्तींच्या शरीरामधून काढून त्यास दुसऱ्या ठिकाणी असलेल्या नव्या गरजूंच्या शरीरामध्ये खूपच कौशल्यपूर्वक प्रत्यारोपण करतात. तसेच आपल्या देशातील २४ तास कर्तव्य बजावणारे आपले पोलिस हे ग्रिन कॉरिडोरच्या अत्यंत यशस्वीपणे नियोजन करुन आपआपली जबाबदारी पार पाडतात.

अवयवदाना संबंधीचा कायदा १९९४ सालीच झाला असला तरी त्यातील तरतूदींविषयी फारशी माहिती ही जनसामान्यां मध्ये दिसत नाही. त्यामुळेच आपल्याकडे अवयवदानाचं प्रमाण हे कमी आहे.

अवयवदानाच्या माध्यमातून मृत्युनंतरही जिवंत राहता येते हे काम पुण्य कमविण्याचे आहे. सर्व इंद्रिये आपल्याला भगवंतानो दिली आहेत.

दिली इंद्रिये हात पाय कान ।
डोळे मुख बोलाया वचना।।

वरील उक्तींच्या स्वरुपात संत तुकोबांनी शरीराची महती ही सर्व सामान्य व्यक्तिंना उद्देशून दिलेली आहे.

विज्ञानाच्या प्रगतीमुळे आपण या इंद्रियांचा पुन्हा वापर करु शकतो, हे शक्य झाले आहे. पण याविषयीची माहिती ही योग्य प्रकारे लोकांना मिळत नाही. सोपी सुटसूटीत माहिती सर्व समाजापर्यंत पोहचली पाहिजे.

आजही समाजामध्ये याबाबत अनेक गैरसमजूती आहेत. ज्या संस्कृतीत दानाला अनन्यसाधारण महत्व आहे, त्या भारतीय संस्कृतीला आज अंधश्रद्धा नामक अविचारी भावनेने ग्रासून टाकले आहे. अवयवदान श्रेष्ठदान असले तरी लोकांना फारशी कल्पना नसल्याचे जाणवते. एकीकडे अंधश्रद्धेमुळे अवयवदानाविषयी लोकांमध्ये संभ्रम असताना अनेक सुशिक्षित माणसांना मुळात अवयवदानाविषयीचे मार्गच हे माहिती नाहीत.

सध्या किडनी दानाला सामाजिक दान म्हणून पाहण्यापेक्षा पैसा कमावण्याचे साधन या दृष्टिकोनातून पाहिले जाते. कारण, किडनी या अवयवाला काळाबाजारात खूप महत्व आहे.

किडनीचे झोल करुन डॉक्टर व किडनी विकणारा बक्कळ पैसा कमावतो, हे आजचे चित्र आहे. तसेच हे चित्र सर्वसामान्यांना चित्रपट, मालिकांमधून चुकीच्या पद्धतीने दाखविले गेल्याने त्याविषयीची सर्वसामान्यांच्या मनामध्ये एक नकारात्मक छबी झालेली दिसून येते.

अवयवदान करण्यासाठी कायदा होवो न होवो, पण जनजागृती करण्याची अतिशय गरज आहे. कारण, अयवदान करण्यात आपले आजर्यंतचे धर्मविषयक संस्कार आड येतात. मृत शरीर अवयव काढून विद्रुप करायचे किंवा त्या मृतदेहावर योग्य ते संस्कार होतील की नाही? आत्म्याला मुक्ती मिळेल का नाही असे एक ना अनेक कारणे, गैरसमज आहेत. आपण त्या गैरसमजूती दूर व्हाव्यात म्हणून प्रत्येकाने आपल्या परीने या बाबतीत आपला खारीचा वाटा हा उचलावा व जनजागृती करत रहावी.

अवयवदान करण्यासाठी खूप मोठ्या प्रमाणावर जनजागृती करणे गरजेचे झाले आहे. त्यासाठी आपण राज्य, देशपातळीवर सर्व शाळा म्हणजेच वेगवेगळ्या भाषेतील शाळा व महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांकडून फार मोठ्या प्रमाणावर रॅलीचे आयोजन करुया व त्या विद्यार्थ्यांकडून निबंध, फलक, चित्र काढून घेऊन ती देशातील सर्व सरकारी व खाजगी रुग्णालये, सर्व धर्माची तीर्थस्थळे, जसे-मंदिर, चर्च, मस्जिद, गुरुद्वारा त्यासोबतच बसस्टॅन्ड, भारतीय रेल्वेची सर्वस्थानके सर्व सरकारी व खाजगी क्षेत्रे या ठिकाणी कायमचे ते उपलब्ध करुन देऊ शकतो.

आपण सर्व सरकारी अधिकारी ज्यामध्ये शाळा,कॉलेज, विदयापीठे व इतर ठिकाणी कार्यरत असलेल्या व्यक्तीकडून अवयवदान करण्यासाठी त्यांची नावे नोंदवून घेऊ शकतो. काही व्यक्ती यास विरोध

करतील. मात्र नव्याने कुठेही नोकरी देण्याअगोदर कुटुंबातील किमान एका व्यक्तीचे निधन झाल्यानंतर अवयवदान करावे अशी अट ही नोकरी देताना नमूद करावी.

याविषयी जर एखाद्या व्यक्तीला काही आक्षेप असला तर कायदया आधारे संपूर्ण पुरावे कोर्टासमोर सादर करुन आपण न्यायधीशांना (याबाबतचे) गांभीर्य समोर आूणन दिले पाहिजे. ज्यामध्ये पुरावे म्हणून ज्या व्यक्ती आहेत ज्यांची अवस्था अत्यंत दयनीय अशी झालेली आहे, त्यांच्यापैकी काही व्यक्तींना प्रमाण म्हणून सर्वांसमोर सादर करु शकतो. जेणेकरुन अशा व्यक्ती जेव्हा त्यांच्यावर अशी वेळ ओढवेल, तेव्हाच हीच व्यक्ती त्याकरिता आपोआपच पुढे येईल.

भारतातील सर्व लष्करी, निमलष्करी दलातील कर्मचारी यांना व त्यांच्या कुटूंबातील व्यक्तींना यासाठी सहभागी करुन घ्यावे. तसेच विविध राज्यांतील पोलीस यंत्रणा ज्यामध्ये पोलीस शिपाई पासून ते पोलिस महानिरीक्षक या पदापर्यंत असलेल्या व्यक्ती व त्यांच्या जवळील सदस्यांना या कार्यात सहभागी करुन घेतले गेले पाहिजे.

सोबतच या कार्यासाठी वेळोवेळी ती व्यक्ती जर अस्तित्वात किंवा जिवंत नसेल तर त्यांच्या कुटूंबातील सदस्यांचा राष्ट्रीय स्तरावर आदर-सत्कार हा करण्यात यावा. जेणेकरुन यामुळे ही अवयवदानासाठी अधिकाधिक लोक यासाठी स्वत:च पुढे येतील. अशा वेळेस त्या सर्वांची नोंदणी करुन त्या सर्वांना मानाचे स्थान देण्यात यावे. जेव्हा जेव्हा व्यक्तीला सन्मानित करण्यात येते, तेव्हा तेव्हा तो अधिक शक्तीने, उत्साहाने तसेच जोमाने स्वत: व आपल्या परिजनांना या राष्ट्रीय कार्यामध्ये सहभागी करुन घेतो.

आपल्या देशात अनेक अशा व्यक्ती आहेत, ज्यांना आदर्श व्यक्ती म्हणून पाहिजे जाते, त्यांना मानणारे, त्यांचे विचार आचरणात आणणाऱ्यांची संख्या अफाट असते. अशा वेळेस जर त्या मोठ्या व्यक्तीने स्वत:हून जर या कार्यात सहभागी करुन घेतले तसेच त्यांच्या अनुयायींना सुद्धा या महान कार्यासाठी आवाहन केले तर खरचं हळूळहू यामध्ये एक आश्चर्यकारक बदल हा आपणास नक्की पाहायला मिळेल.

आजपर्यंत रक्तदान हेच श्रेष्ठदान असे समजले जात असे. तसेच यापूर्वी अवयवदानाबद्दल जनजागृती होऊनही म्हणावे तसे त्यामध्ये यश मिळाले नाही. याचे प्रमुख कारण म्हणजे अवयव प्रत्यारोपणाबाबत समाजात असलेले गैरसमज आहेत. जसा भ्रष्टाचार हा रक्तदान या मोहिमेत आहे, तशा भ्रष्टाचार अवयवदान या मोहिमेत ही आहे.

रक्तांची एक बाटली मिळविण्यासाठी जसे दुप्पट पैसे मोजावे लागतात, त्याचपद्धतीने अवयवही मिळविण्यासाठी अवाच्या सव्वा रक्कम ही मोजावी लागते. या प्रक्रियेत दलाल, डॉक्टर्स आणि संबंधित यंत्रनेचे अधिकारीही सामील असू शकतात. त्यामुळे सामान्य जण मेटाकुटीस येतात, म्हणून शासनाने अवयवदानाची जनजागृती करताना सामाजिक संस्था,प्रत्यारोपण केंद्रे आणि संबंधित आरोग्य यंत्रणेच्या विभागाशी समन्वय साधून अवयवदानाची मोहिम ही राबविली पाहिजे. परंतु त्याचबरोबर त्यासाठी लागणारा अपेक्षित निधीही राखीव ठेवला पाहिजे.

अवयवदान करताना आपण सरकारी यंत्रणेमधील चांगल्या चारित्र्याचे अधिकाऱ्यांना सक्तीने अवयवदात्याचे अवयव काढण्यापासून ते नवीन गरजू व्यक्तींच्या शरीरात यशस्वी पद्धतीने प्रत्यारोपण करेपर्यंत उपस्थित राहण्यासाठी प्रवृत्त करावे आणि त्यामध्ये सतत त्या अधिकाऱ्यांमध्ये बदल हा ठेवावा. जेणेकरुन अवयवदान करताना कोणत्याही प्रकारचा भ्रष्टाचार हा होणार नाही. आणि केलेल्या अवयवदानाचे पुरावे नेहमी सुरक्षित ठेवावे. तसेच एका स्वतंत्र कमेटीच्या सदस्यामार्फत जे पोलिस यंत्रणा, एन.जी.ओ. व निवृत्त न्यायाधीश, लष्करी



Scanned with CamScanner

अधिकारी यांच्या मार्फत कधीही अचानकपणे, कोणत्याही वर्षी व वेळी योग्य व्यक्तीलाच अवयवदान केले गेले आहे का? याची काटेकोरपणे पडताळणी केली जावी, अशी त्यामध्ये तरतूद करण्यात यावी.

आपल्याला माहित आहे की, जसे कांद्याचे उत्पादन जर कमी झाले तर त्यांचा सर्वाधिक फायदा हा व्यापारी वर्गाला होताना दिसून येतो व कमी उत्पादन झाल्यामुळे शेतकऱ्याला भाव ही जास्त मिळतो. पण ग्राहकांना ते परवडत नाही. अगदी याच पद्धतीने समजा जर अवयवदानाचे प्रमाण वाढले तर अवयव हे मुबलक प्रमाणात उपलब्ध होतील. म्हणजे एक प्रकारे अवयव जास्त असल्यामुळे त्यांची अवैध विक्री करण्यास हवी तशी मागणी होणार नाही. त्यामुळे भ्रष्टाचार हा कमी होऊन खऱ्या गरजूपर्यंत वेळेवर मदत ही पोहचेल यामुळे लोकांच्या मनामध्ये अवयवदाना संबंधी जी नकारात्मक भूमिका झालेली आहे ती नक्कीच सकारात्मक होण्यास वेळ लागणार नाही. यामुळे सुदधा चुकीच्या लोकांचे तोंड आपोआपच बंद होऊन, मृत व्यक्तीचे नातेवाईक स्वत:हूनच खूप मोठ्या प्रमाणावर अवयवदान करतील.

दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे कुटूंबातील एका व्यक्तीने जरी अवयवदान करण्याचा सकारात्मक निर्णय घेतला तरी जे या अवयवदानाच्या प्रतिक्षेत आहेत, त्या सर्वांना यामुळे निश्चितच एकप्रकारे दिलासा मिळेल. म्हणून मला सांगावेसे वाटते की, 'तुम्ही जगा आणि दुसऱ्याला जगवा आणि म्हणतात ना, 'मरावे परी कीर्तीरुपी उरावे' त्यामुळे अवयवदान करणे ही काळाची गरज आहे.

अवयवदान, जीवनदान,श्रेष्ठादान !



Scanned with CamScanner

## छावणी : जीवनातील ग्रामवास्तवाचे भान

निवृत्ती धिंदळे

नामदेव माळी यांची छावणी ही कादंबरी मराठीतील ग्रामीण कादंबरीच्या परंपरेत आपल्या वेगळेपणाने उठून दिसावी अशीच आहे. दुष्काळात पाळीव जनावरे जगवण्यासाठी निर्माण झालेल्या चारा छावणीचे आणि त्या अनुषंगाने प्राण्यांचे जग आणि त्याच्या भोवतालचे माणसाचे जग एकमेकांच्या शेजारी लेखकाने ठेवले आहे. ग्रामीण जगण्याचे ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि राजकीय भान व्यक्त होते. ती वास्तववादी असली तरी त्यामागे सांस्कृतिक चिकित्सा करण्याची इच्छा आहे.

नामदेव माळी यांची छावणी ही ग्रामवास्तवाचे विदारक पण ठाम चित्रण करणारी कादंबरी आहे. दुष्काळ महाराष्ट्राला नवा नाही. त्यात दरवेळी शेतीची आणि शेतकऱ्याची त्यांच्या जनावरांसकट जी पडझड होत असते ती विलक्षण दयनीय असतेस या छावणीत गणपा नावाच्या कुणब्याच्या आत्महत्येच्या बातमीने उठलेला गदारोळ आणि त्यानिमित्ताने पुढे आलेले इथल्या गरीब माणसांचे,हिकमती धुर्त राजकारण्यांचे, डुखधऱ्या सावकारांचे, जगण्याचे कसलेच गांभीर्य नसलेल्या टग्यांचे आणि बेमौत मरुन जाणाऱ्या माणसांचे आणि जनावरांचे नवेच जग आपल्यासमोर उलगडत जाते.

गणपासारखा कुणबी मोठ्या आशेने बाग लावतो, त्यापायी कर्ज काढतो, पण पाऊस दगा देतो, सावकारी कर्ज घेऊन टँकरने पाणी आणूनही एकीकडे बाग मरुन जाते आणि दुसरीकडे त्याची आशाही. रंगातात्या नावाच्या पतसंस्थेच्या आडून खाजगी सावकारी करणाऱ्या माणसाच्या कर्जात गणपा बुडून जातो. दारची जनावरे, भंगारात बागेचे मांडव विकून पैसे चुकते करतो. पण सावकारी हिशोब काही वेगळाच असतो. लोकांना अडचणीत पकडून त्यांच्या जमिनी लिहून त्यांना देशोधडीस लावणारा तात्यासारखा माणूस गणपाच्या मरणावर टपून बसतो. इथे दोन प्रकारचे रोग दिसतात. एक म्हणजे पिकावर येणारे पण किमती औषधे फवारुनही नष्ट न होणारे आणि दुसरे म्हणजे गावातल्याच आपल्याच नेहमीच्याच माणसांना संपविणारे डावपेचाचे क्रूर रोग, गणपा म्हणतो, गरिबीचा रोग आलाय, दांडगी लागण. सगळी गरीबं मारा बागंबर फवारल्यागत फवारा अवशिद गरिबावर. 'लेखकाने हत्तीची दंतकथा, धनगराने घातलेल्या हुमान, दिनकरच्या आईने सांगितलेल्या गोष्टी फवारल्यागत फवारा आणि कथानकाला गती दिली आहे.

दुष्काळाची नवी देणगी म्हणजेच जनावरांची छावणी. एकाच गावातले हे दुसरे नवे जग असते. गावापेक्षा इथे चैतन्य अधिक. तशा भानगडीही अधिक तिथले सारे काळेबेरे व्यवहार चालविणारे, आमदारांच्या सावलीत राहणारे नागूजी, सयाजी यांच्यासारखी करामती माणसे गावात सरपंचाला चिकटून राहिलेली असतात. तपासणीच्या साहेबाला खूश करुन छावणीतल्या शेणासकट सारे खाऊन टाकणारी ही माजोरी माणसे. छावणीच्या निमित्ताने गावावरुन ओवाळून टाकलेली, सदैव भानगडी करणारी आणि नव्या भानगडीच्या मागावर राहणारी कफल्लक असलेली तरुण पोरांची किलतान गँग... आधी नवऱ्यानं टाकलेली मग आईबापानं सोडून दिलेली तरुण वयाची राधी एका पाडीला घेऊन छावणीत सयाजीच्या आश्रयाला येते. त्याच्यावर जीव लावते आणि एक नवी कहाणी जन्माला येते.

मजबुरी आणि तारुण्य यांच्या कोंडीत ती सापडते. पाडीला जगवणे आवश्यक असते म्हणून सयाजीलाही सांभाळावे लागते असा दुहेरी पेच दुष्काळने तिच्यासाठी उभा केलेला आहे. भानासारखा चळवळ्या तरुण मोर्चे काढून, मेखमारो आंदोलन करुन गावातल्या लोकांना दुष्काळात काम मिळवून देतो. त्यासाठी विरोधही पत्करतो, पण हा एकमेव आशेचा किरण असतो. जिथे



Scanned with CamScanner

सगळीकडूनच भ्रष्टाचाराची चटक लागलेल्या लोकांची झुंड टपून असते. तिथे एकटा भानातरी काय करणार? गावातले कतेपण ज्यांच्याकडे वंशपरंपरेने चालत आलेले असते ते बाबुराव पाटील घरातल्या आणि गावातल्या संघार्षाने हळूहळू अस्वस्थ होत जातात आणि मग अबोल होऊन गजासोबत कोरड्या विहिरीच्या आशा हायत्या म्हणून आमचा देश अजून माणसात हाय. या काळात काष्टा घालून ती भांगलायला गेली. काष्टा घातलेली.हातात खूरपं घेतलेली आय लय साजरी दिसते. विधानसभेसमोर अशा आईचा पुतळा उभा कराया पाहिजे. मग या पुढाऱ्यास्नी जरा आठवण येईल आईची.

दुष्काळाचा फायदा घेऊन आपल्या राजकीय पोळ्या भाजण्याच्या खेळ्या करणारे आमदार, त्यांची तळी उचलणारे हस्तक, त्यांच्या एकमेकांतील कुरघोड्या पाहिल्या की मन उदास होते. प्रत्येक गांजलेला माणूस हाच इथल्या शिकाऱ्यांचे सावज आहे. छावणी कुणाला चालवायला दयायची इथपासून ते बोगस जनावरे, त्यांचा चारा कसा पचवायचा हा भ्रष्टाचार करण्यात सराईत असणारी यंत्रणा कादंबरीभर राजरोस वावरते. पाण्याविना सगळा गाव ठप्प झालेला, माणसे नुसतीच जिवंत आहेत. प्रत्येकजण श्वास राखण्याचा प्रयत्न करतो आहे. सुभाना, भरमाप्पा, गजा, बाबुराव पाटील, सयाजी नागुजी, दिनकर, भाना, बाळू आणि इतर सारे पुरुष वेगवेगळया कारणाने लक्षात राहतात. सावित्री, हौसामावशी राधी,शेवंता अशी कितीतरी बायका रोज मरत असतात.

हे दु:ख आहे ते गणपाच्या आत्महत्येचे. त्याने घठरवून, गावभर फिरुन माझ्या घराकडे ध्यान ठेवा असे सांगून सारे घर, शिवार,गाव एकदा पाहून फार क्लेशाने बायकापोरांचा निरोप घेणारा गणपा हा सावकारी कर्जाच्या धसक्याने मरुन मोकळा होतो. त्याचे मरणे मनाला जखम करणारे आहे आणि व्यवस्थेविषयी अपरंपार चीड आणणारे आहे. त्याच्या मरणाचेही शेवटी सरपंच,रंगातात्या, नागुजी राजकारण करतात. पोस्टमार्टेमशिवाय त्याच्या प्रेतावर अंत्यसंस्कार करतात आणि स्वत:ची मान सोडवून घेतात, जिवंतपणी न्याय मिळालाच नाही आणि मेल्यावरही नाही याची चीड येऊन भाना विरोध करतो, पण गावापुढे त्याचे काही चालत नाही. हे वास्तवाचे दर्शन प्रखरपणाने कादंबरीकार घडवितो. गणपाचे मरण आणि छावणीतील कडेला पडून राहतात. एके काळी कामाचा म्हणून प्रसिद्ध असलेला गजा दुष्काळाच्या तडाख्याने मोडून पडला आहे. कुणाचा तरी झेंडा हातात घेऊन तो सतत फक्त एवढचं बरळत असतो की, पाणी पाहिजे गावाला, पणी पाहिज

गावाची वाताहत व्हायला अनेक घटक कारणीभूत आहेत. पण माणसांची बदललेली नियत हा सगळ्यात मोठा परिणामकारक घटक आहे. घर सारवायला शेणसुद्धा चोरुन न्यावे लागते आणि समजा ही चोरी पकडतील तर भलतीच नाचक्की होते. ऊसाच्या कांडक्यांनी जनावरांची तोंडे सोलून निघाली आहेत. पायाच्या नख्या वाढल्या आहेत. त्या नासल्या आहेत. ती आजारी पडली तरी ना डॉक्टर वेळेवर येतो ना औषधपाणी होते. बरीच जनावरे मरतात, पण बोगस जनावरांची संख्या दाखवून नोंदीचे मस्टर मात्र फुगतच राहते. पाणी बघायला मिळत नाही म्हणून माणसे कृत्रिम पावसाची वाट पाहतात. तो एकदा येतो हि पण येऊन आणखीनच रोगराई सुरु होते आणि तो आला नसता तरी चालले असते असे वाटून जाते.

या कादंबरीचे मोठे बलस्थान म्हणजे तिची भाषा. लेखकाने अनेक वर्षे मेहनत घेऊन छावणीची उभारणी केलेली आहे. विशेषत: यातल्या हौसामावशीसारख्या स्त्रियांची भाषा अविस्मरणीय आहे. बाईवर होणारा अन्याय भयानक असतो, पण त्याची साधी दखलसुध्दा कुणी घेत नाही. मोर्चामध्ये पुरुषांच्या बरोबरीने आपल्या जनावरांना घेऊन जाणाऱ्या बायका जन्मभर दु:ख सोसत राहतात आणि सोसणे हेच तिचे मोठेपण आहे ते ऐकत



Scanned with CamScanner

राहतात. हौसामावशीचा मुलगा धाब्यावरच्या दारुच्या बाटल्या चोरुन आपल्या घरात लपवून ठेवतो. हे लक्षात येताच दिनकरची आई आपल्या एकुलत्या एका मुलाला गावाबाहेर काढते. त्याला मामाकडे पाठवते. म्हणते ''बाळा, गरीब होऊन जग पोटात भुकेपेक्षा दोन जादा भाकरी खपत्यात पण पायात दसुडी खपत नाही.' असे सांगुन मोठ्याच्या नादी लागायच नाही हे सांगते. याच आईची कड घेऊन लेखक म्हणतो माझ्या जनावराचे मरण यात काहीच फरक नाही. थोडी हळहळ, थोडे उसासे एवढेच त्याहून मोठा ओरखडा उठत नाही. मरणाऱ्याच्या यादीत एक नाव समाविष्ट केले जाते एवढेच. मुक्या जनावरांना आणि असहाय झालेल्या गावकऱ्यांना वेठीला धरुन पैसे कमावणारे हीन वृत्तीचे लोक याच गावातील आहेत. लेखक सुचवतो की, यांचा वेगळा इतिहास कुणीतरी लिहिला पाहिजे.

तसे तर कादंबरीमध्ये प्रदेशनिष्ठ इतिहास असतोच. कादंबरीच्या शेवटी कुणबीपणाचे वंशसातत्य टिकले पाहिजे हे पाटील बोलून दाखवितात. कुणब्याची जात संकटातूनच उभी राहते. मातीत गाडून घेते, उगवते. ती मातीला विसरत नाही, बिमोड होऊ देत नाही. हे सुचवत सुचवत ही कादंबरी पुन्हा पावसाची वाट पाहत असते. कधीतरी ही पिडा संपेल आणि बळीचे राज्य येईल या एकाच आशेवर ही कादंबरी ग्रामजीवनाचे भान आणून देणारी आहे.


नामदेव माळी यांची छावणी ही कादंबरी मराठीतील ग्रामीण कादंबरीच्या पंरपरेत आपल्या वेगळेपणाने उठून दिसावी अशीच आहे. ग्रामीण संस्कृतीच्या आपत्तीकरणाची भ्रामक भूमिका ही कादंबरी घेत नाही, त्याऐवजी या कादंबरीमधून ग्रामीण जगण्याचे ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि राजकीय भान व्यक्त होते. ती वास्तववादी धारणेतून लिहिली गेलेली असली तरी हा वास्तववाद सरधोपट वाटत नाही. त्यामागे सांस्कृतिक चिकित्सा करण्याची इच्छा आहे. दुष्काळारात पाळीव जनावरे जगवण्यासाठी निर्माण झालेल्या चारा छावणीचे आणि त्या अनुषंगाने प्राण्यांच्या भावविश्वाचे प्रत्ययकारक दर्शन छावणीमधून घडते. हे प्राण्यांचे जग आणि त्याच्या भोवतालचे माणसाचे जग नामदेव माळी एकमेकांच्या शेजारी ठेवतात. ही दोन जगे आपापल्या जागी स्थिर राहत नाहीत. ती एकमेकांमध्ये घुसू लागतात, एकमेकांवर भाष्य करु लागतात. या भाष्यांमधून ग्रामीण जीवनाचे नवे व चिकित्सक भान छावणीमधून व्यक्त होऊ लागते.



Scanned with CamScanner

# महारथी कर्णाची यशोगाथा

देवराम दिनकर भांगरे




'मृत्युंजय' महाभारतातील 'कर्ण' या व्यक्तिरेखेवर आधारित शिवाजी सावंत यांनी लिहलेली ही कादंबरी आहे. २४ सप्टेंबर १९९५ रोजी या पुस्तकाला भारतीय ज्ञानपीठ या संस्थेतर्फे मूर्तिदेवी पुरस्कार मिळालेला आहे.

मृत्यूंजय कादंबरीच्या लेखनासाठी शिवाजी सावंत यांनी थेट कुरुक्षेत्रातच मुक्काम ठोकला होता. प्रदीर्घ संशोधन, चिंतन,मनन यांतून रससंपन्न अशा मृत्यूंजय कादंबरीचा जन्म झाला, आणि शिवाजी सावंत हे नाव महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहोचले.

महाभारतातील सामान्यत: खलनायक म्हणून परिचित असलेल्या महावीर कर्णाच्या असामान्य व्यक्तिमत्वाचा मागोवा ही कादंबरी घेते. बऱ्याच कथा सर्वांना परिचित आहेत. नायक असूनही बहुतांशी सगळीकडे तो एक खलनायक भासतो. पण शिवाजी सावंत लिखित 'मृत्युंजय' कादंबरी हाती घेतली आणि जणू कर्णाचे जीवन नव्याने माझ्या मनात उलगडले गेले. कर्णासारखा दानशूर या भूमीवर कधीच नव्हता हे या कादंबरीतून प्रकर्षाने जाणवते.

कर्ण हा महाभारतातील कुंती आणि सुर्य यांचा पुत्र होता म्हणून 'सुर्यपुत्र' आणि 'कुंतीपुत्र' या नावानेही ओळखला जातो. कर्ण हा दुर्योधनाचा परम मित्र होता. दुर्योधनाने त्याला अंगदेशाचे राज्य दिले होते. कौरवांचे नेतृत्व करत असल्याने 'कौतेय' या नावानेही कर्ण ओळखला जातो राधा नावाच्या स्त्रीने त्याला लहानाचे मोठे केल्यामुळे तो 'राधेय' या नावाने ओळखला जात होता.

कुंतिभोज राजाची कन्या कुंती हिच्या सेवेवर प्रसन्न होऊन दुर्वास ऋषींनी तिला एका मंत्राचे वरदान दिले. त्या मंत्राचा वापर करताच जा दैवताचे स्मरण ती करेल, त्या देवाकडून तिला पुत्रप्राप्ती होणार होती. कुमारी असलेल्या या कुंतीने सुर्याचे स्मरण करुन मंत्रोच्चार केला आणि मंत्राच्या प्रभावाने पुत्रप्राप्ती झाली. या सुर्यपुत्राला जन्मत: अंगावर अभेद्य कवच आणि कानात कुंडले होती. कुमारी माता बनलेल्या कुंतीने घाबरुन एका टोपलीत घालून त्या मुलाला गंगा नदीत सोडून दिले. सुताला किंवा रथचालकाला ती टोपली मिळाली. त्याने आणि त्याची पत्नी राधा यांनी त्या मुलाचे पालन केले. त्यांनी त्या मुलाचे नाव 'वसुसेन' ठेवले. कुंडलांमुळे तो कर्ण या नावाने प्रसिद्ध झाला. राधेचा पुत्र म्हणून तो 'राधेय' नावानेही ओळखला जातो. अधिरथ हा कर्ण आणि शोण यांना घेऊन हस्तिनापुरास आला आणि कृपाचार्याकडे त्याचे शिक्षण सुरु झाले.

जेव्हा कौरव आणि पांडवांचे शिक्षण पूर्ण झाले. तेव्हा द्रोणाचार्यांनी त्यांच्यातील सर्वोत्कृष्ट योद्धा ठरविण्यासाठी एक स्पर्धा आयोजित केली. त्या स्पर्धेमध्ये अर्जुनाने सर्व युद्ध प्रकारांमध्ये आपले प्राविण्य

दाखविले. हे बघून चिडलेल्या कर्णाने आपले अर्जुनापेक्षा वरचढ कौशल्य दाखविले आणि स्पर्धेचा खरा विजेता ठरविण्यासाठी अर्जुनाला दवंदवाचे आव्हान केले. त्या काळातील नियमांनुसार केवळ समान अथवा तुल्यबळ कुळ असलेल्या योद्धयामध्ये दवंदवं होऊ शकत असे. या नियमाचा आधार घेऊन कृपाचार्यांनी कर्णाला आपले कुळ जाहीर करावयास सांगितले. हे ऐकून दुर्योधनाने कर्णाला राजपुत्र असलेल्या अर्जुनाच्या तुल्यबळ करण्यासाठी अंगदेशाचा राज्याभिषेक केला. दुर्याधन आणि कर्ण यांच्या मैत्रीची ही सुरुवात मानली जाते.

कर्णाला दोन बायका होत्या, पहिली वृषाली, ही दुर्योधनाचा सारथी सत्यसेन याची बहीण होती. दुसरी सुप्रिया ही पुकेय देशाची राजकन्या व दुर्योधनाच्या पत्नीची म्हणजे भानुमतीची मैत्रिण होती.

द्रुपद राजाची कन्या'द्रौपदी' हिच्या स्वयंवरासाठी त्याने धनुर्विद्येचा कठीण पण लावला होता. हा पण जिंकण्यासाठी दुर्योधन कर्णाला घेऊन पांचाल राज्यात गेला. पांडवांच्या वारणावतातील मृत्युनंतर तो पण पूर्ण करु शकणारा कर्ण हा एकमेव योद्धा मानला जात होता. स्वयंवराच्या वेळी जेव्हा कर्ण पण पूर्ण करण्यासाठी पुढे आला तेव्हा द्रौपदीने 'मी सुतपुत्राशी विवाह करणार नाही' असे म्हणून त्याचा अपमान केला. नंतर ब्राम्हणाच्या वेशात आलेल्या अर्जुनाने तो पण जिंकला. या घटनेनंतर पांडवाबद्दलचे विशेषत: अर्जुनाबद्दलचे कर्णाचे वैर आणखीनच वाढले.

पांडवांनी इंद्रप्रस्थात केलेल्या राजसुय यज्ञासाठी हस्तिनापूरातून गेलेल्या राजांमध्ये कर्णाचा समावेश होता. मयसभेत झालेल्या दुर्योधनाच्या अपमानाचा कर्ण साक्षीदार होता. या मयसभेत कौरवांचा युवराज गदावीर दुर्योधन त्या मायावी महालातील जमिनीसारख्या दिसणाऱ्या तळ्यात पडला, त्याचा मुकूट नकळत तळ्याच्या तळाला गेला. त्यावर द्रौपदीसकट सर्व स्त्रिया हसल्या व त्यांनी अंध पित्याचे पुत्रही अंधच असतात काय? असे खोचक उद्गार काढले. याचा दुर्योधनाला खूप राग आला. व तो म्हणाला योग्य वेळ येताच अंध पित्याचे पुत्र किती डोळस असतात हे तुला दाखवून देईन अंध हा त्याचा अपमान महाभारताच्या युद्धाला कारणीभूत ठरला.

पांडवांच्या वाढत्या सामर्थ्याबद्दल मत्सरग्रस्त होऊन दुर्योधनाने आपला मामा शकुनी याच्या सल्ल्याप्रमाणे युदि्धष्ठिराला विष्णूजित यज्ञाच्या निमित्ताने हया द्यूत खेळण्याचे आमंत्रण दिले. द्युतात सर्व राज्य गमावलेल्या युदि्धष्ठिराने आपले बंधू, आपण स्वत: आणि अखेरीस आपली पत्नी द्रौपदी यांना पणावर लावले , हरलेल्या द्रौपदीला निर्वस्त्र करण्याची दुर्योधनाने आज्ञा दिली. या प्रसंगी दुविधा मनस्थितीत कर्ण निस्तब्ध होऊन बसला होता.

वनवासात असलेल्या पांडवांना आपल्या वैभवाचे दर्शन करवण्यासाठी दुर्योधनाने आपल्या दासदासींसह पांडवांच्या पर्णकुटीजवळ असलेल्या तलावात जलक्रिडेसाठी जायचे ठरवले. तिथे गेल्यावर दुर्योधनाने गंधर्व राजकुमारीशी जबदरदस्ती करण्याचा प्रयत्न केला. हिच स्थिती राजकुमारीने भावाला आणि वडिलांना सांगितली तर चित्रसेनाने दुर्योधनाला आंध्रवाणी म्हणजेच डोळे बंद करुन पकडून नेले. त्यावेळी कर्ण व दुशासन हे मंदिरात होते. अर्जुनाने युदि्धष्ठिराच्या आज्ञेवरुन युद्धात चित्रसेनाचा पराभव केला आणि दुर्योधनाला मुक्त केले.

राजसुय यज्ञासाठी चार पांडवांनी एकेक दिशेला जाऊन दिग्विजय केला. त्यामुळे चिडून आणि चित्रसेनाकडून झालेल्या अपमानकारक पराभवानंतर आपले शौर्य दाखविण्यासाठी कर्णाने हस्तिनापूराच्या सैन्याचा सेनापती बनून सर्व आर्यावर्तातील (चारी दिशांची) राज्ये जिंकली. कृष्णाबद्दल असलेल्या आदराचे प्रतिक म्हणून कर्णाने त्याच्या मथुरा आणि द्वारका राज्यावर हया दिग्विजयात चाल केली नाही.

दिग्विजयानंतर दानधर्माबाबत प्रसिद्ध असलेल्या कर्णाने प्रतिज्ञा केली, की त्याच्या दारातून एकही याचक परत जाणार नाही. आपला मुलगा अर्जुन याच्या

रक्षणासाठी इंद्राने एका गरिब ब्राम्हणाचे रुप घेऊन कर्णाकडे त्याच्या कवच कुंडलांचे दान मागितले. कवच कुंडलांमुळे आपण युद्धात अजिंक्य आहोत, हे माहित असूनही कर्णाने आपली कवच कुंडले कापून इंद्राच्या स्वाधिन केली. त्याच्या त्या दानशूरपणावर प्रसन्न होऊन इंद्राने त्याचे रक्तबंबाळ रुप पूर्वीसारखे केले आणि युद्धात एकदाच वापर करण्यासाठी एक अमोध शक्ती (वैजयंती अस्त्र कर्णाला दिली.

कवच कुंडलांचे दान केल्यानंतर युद्धात आपण अर्जूनाला कमी पडू नये म्हणून कर्णाने ब्रम्हास्त्रप्राप्ती करण्याचे ठरवले.द्रोणाचार्यांनी त्याला शिकवण्यास नकार दिल्यानंतर त्याने त्यांचे गुरु असलेल्या परशूरामांकडून ब्रम्हास्त्र मिळवले. परशूराम केवळ ब्राम्हणांनाच शस्त्रास्त्रविद्या शिकवत असल्याने कर्णाने असत्य बोलून त्यांच्या आश्रमात प्रवेश मिळवला आणि ब्रम्हास्त्र प्राप्ती करुन घेतली. कर्ण हा ब्राम्हण नाही हे लक्षात येताच परशूरामांनी कर्णाचे खरे कुळ विचारले. सत्य कळताच त्यांनी कर्णाला शाप दिला, की ऐन युद्धप्रसंगी त्याला ब्रम्हास्त्राचे स्मरण होणार नाही. याच काळात शिकारीच्या वेळी एका गरीब ब्राम्हणाच्या चिखलात अडकलेल्या गाईची हत्या कर्णाच्या हातून घडली. त्याने कर्णाला शाप दिला. की ऐन युद्धप्रसंगी त्याच्या रथाचे चाक असेच जमिनीत अडकेल.

वनवास आणि अज्ञातवास भोगून पांडवांनी आपले राज्य मागण्यासाठी दूत म्हणून कृष्णाला हस्तिनापूरास पाठविले. दुर्योधनाने जेव्हा त्याची मागणी नाकारली, तेव्हा परत जाताना कृष्णाने कर्णाला त्याच्या जन्माचे रहस्य सांगितले आणि पांडवांकडे येण्याची विनंती केली. जरी कुंतीचा सर्वात ज्येष्ठ पुत्र म्हणून कर्ण पांडवांच्या संपूर्ण राज्य आणि संपत्तीचा स्वामी झाला असता, तरीपण त्याने दुर्योधनाच्या मैत्रीस स्मरुन युद्धकाळात कौरवांची बाजू सोडून जाण्यास नकार दिला.

महायुद्धाच्या पहिल्या दिवशी कौरवांतर्फे भीष्मांना सेनापतीपद देण्यात आले. त्यांनी विविध सेनाप्रमुख नेमताना कर्णाचा 'सुतपुत्र, कुंडले नसल्याने शापित आणि अर्धरथी' म्हणून अपमान केला. हा अपमान सहन न होऊन कर्णाने भीष्म जीवंत असेपर्यंत रणभूमीवर न उतरण्याची प्रतिज्ञा केली. युद्धाच्या १० व्या दिवशी भीष्म शरपंजरी पडले असताना भेटायला आलेल्या कर्णाची स्तुती करुन त्यांनी कर्णाला त्याचे जन्मरहस्य सांगितले आणि पांडवांच्या व धर्माच्या बाजूने लढण्याचा सल्ला दिला. परंतु कर्णाने परत एकदा मित्र कर्तव्याला जागण्याचे ठरविले. त्याच दिवशी कुंतीने स्वत: येऊन कर्णाची भेट घेतली, आणि त्याचे मन वळवण्याचा प्रयत्न केला. तिच्या विनंतीचा मान ठेऊन कर्णाने अर्जुन सोडून बाकी पांडवांना युद्धात न मारण्याचे वचन दिले. दुसऱ्या दिवशीच्या युद्धात कर्णाने प्रचंड पराक्रम गाजवला.

युद्धाच्या १५ व्या दिवशी शस्त्र खाली ठेवलेल्या द्रोणाचार्यांचा धृष्टद्युम्नाकडून शिरच्छेद झाल्याने चिडलेल्या कौरवांकडून रात्रयुद्धाला सुरुवात झाली. या युद्धात भीमाचा पूत्र घटोत्कच याने कौरवांकडून लढणाऱ्या दोन राक्षसराजांचा वध केला. तेव्हा घटोत्कचाकडून कौरवसेनेचा घेऊ नये म्हणून कर्णाने इंद्राकडून मिळालेल्या शक्तीचा वापर करुन त्याचा पध केला.त्यानंतर दुर्योधनाने कर्णाला सेनापती म्हणून अभिषेक केला. कर्णाने त्यानंतर युदधात अर्जुन सोडून सर्व पांडवांना गाडून त्यांचा पराभव केला, परंतु कुंतीला दिलेल्या वचनाला जागून त्याने सर्व पांडवांना जिवंत सोडून दिले.

युद्धाच्या सतराव्या दिवशी कर्ण आणि अर्जुनाची अखेरीस युद्धभूमीवर गाठ पडली. दोघेही तुल्यबळ योद्धे असल्याने त्यांचे युद्ध खुप वेळ चालले. परंतु, अखेरीस परशुरामाने दिलेल्या शापामुळे कर्णाच्या रथाचे चाक युद्धभुमीवर झालेल्या चिखलात अडकून बसले आणि त्याचा रथ जागेवर स्थिरावला. चाक काढणासाठी धनुष्य खाली ठेवून कर्ण रथातून खाली उतरला, निश:स्त्र कर्णावर वार करण्यास अर्जुनाने नकार दिला, परंतू द्रौपदी वस्त्रहरण आणि अभिमन्यूच्या मृत्यूप्रसंगीच्या कर्णाच्या



Scanned with CamScanner

सहभागाची कृष्णाने अर्जुनाला आठवण करुन दिली आणि कर्णावर हल्ला करण्यास सांगितले. स्वत:च्या रक्षणासाठी कर्णाने ब्रम्हास्त्राचे स्मरण करण्यास सुरुवात केली. परंतु परशुरामांच्या शापाप्रमाणे त्याला मंत्रांचे स्मरण झाले नाही आणि अर्जुनाचा आंजलिक बाण त्याच्या कंठात घुसला. कुरुक्षेत्राच्या भूमीवर रक्तात न्हालेला महावीर कर्ण मृत्यूच्या शेवटच्या घटका मोजत होता. मृत्यूच्या अखेरीस शेवटचे दान म्हणून स्वत:चे दोन सुवर्णदात याचकास सुपूर्द करत कर्णाने कायमचे डोळे मिटले. पुढे कृष्णानेच कर्णाचे अंत्यसंस्कार केले.

महाभारतातील सर्वोत्कृष्ट योद्धा म्हणून अर्जुनाचा लौकिक असला तरी या सर्व गोष्टींवरुन आणि अर्जुनाशी झालेल्या त्याच्या युद्धावरुन ते दोघे तुल्यबळ होते हे सिद्ध होते. जरी युद्धात अर्जुनाने कर्णाचा वध केला असला तरीपण या वेळी कर्ण हा शापित आणि कवच कुंडलविरहीत आणि निशस्त्र होता. त्यामुळे कर्ण हा मुळात अर्जुनाहून प्रबळ योद्धा होता हे भगवान श्रीकृष्णांनीही मान्य केले आहे.

या कादंबरीचे एक खास वैशिष्ट्य म्हणजे ही कादंबरी इतर कादंबऱ्याप्रमाणे एकमुखी गोष्ट नाही. तर महाभारतातील विविध पात्रांच्या मुखातून पुस्तकाच्या प्रत्येक पानावर झरझर उतरणारा कर्णाचा जीवनपट आहे. कुंतीला मिळालेले असामान्य वरदान, त्यातून कर्णाचा झालेला असामान्य जन्म, जगाच्या भीतीने कुंतीने घेतलेला कठोर निर्णय, गुरु द्रोण आणि पांडवांकडून झालेला कर्णाचा अपमान, त्यातूनच दुर्योधनासोबत जन्मास आलेले मित्रप्रेम, द्रौपदी वस्त्रहरण, कुरुक्षेत्रातील युद्ध या सर्वच गोष्टी वरवर प्रत्येकाला माहित आहेतच. पण या गोष्टीत काही बारीक सारीक अशा कितीतरी गोष्टी दडलेल्या आहेत, ज्या पुस्तक हाती घेण्याआधी आपल्या विचारांतही नसतात किंवा वर्षानुवर्षे आपण या प्रश्नांची उत्तरे शोधत आलो आहोत, पण जी अजूनही अनुत्तरीत आहेत.

उदाहरणार्थ कुंतीला ही पुत्रप्राप्ती नक्की कशी झाली? सारथ्याच्या घरी कर्णाचे बालपण कसे असेल? शोण म्हणून असलेल्या राधेचा मुलगा या कर्णासोबत कसा वागत असेल? कर्णाची पत्नी वृषाली नक्की कशी होती... त्यांच्यातील प्रीतीचे क्षण कधी फुलले होते की इंद्राला कवच कुंडलं दान केल्यानंतर निस्तेज झालेल्या कर्णाप्रमाणे त्याचे प्रेमजीवनही कोमेजलेले होते? सुर्याचा पुत्र असूनही त्याने धर्माच्या विरोधात अधर्मी दुर्योधनास नेहमी साथ का दिली...केवळ मैत्रीसाठी? अभिमन्यूला धर्माविरुद्ध मारणाऱ्यात कर्ण का सामील झाला? खरेच तो अधर्मी होता का? जर असे होते तर मग श्रीकृष्ण विरुद्ध पक्षात असतानाही त्याने या सुपुत्राचा अंतिम संस्कार करण्यात रस का दाखवला?

जसजसे आपण एकेक पान वाचत जावू तसतसा हा हळूहळू उलगडत जाणारा खुलासा आपल्याला जागीच खिळवून ठेवतो आणि कर्णाचं रहस्यमय जीवन आपणाला सांगून जातो...



Scanned with CamScanner

## महाश्वेता : सुंदर धैर्यशील अनुपमाची कहानी

–निकिता झरेकर

'महाश्वेता'' ही कादंबरी अनुपमा नावाच्या मुलीवर आधारीत आहे. या कादंबरीमधील मुख्य पात्र नायिका म्हणजेच अनुपमा होय. अनुपमा ही अतिशय सुंदर, लोभस हुशार अगदी एखाद्या राजकन्येसारखी होती. अनुपमा ही एक गरीब शाळा मास्तराची मुलगी होती. अनुपमाची आई लहानपणी वारल्यामुळे तिला सावत्र आई आणि दोन सावत्र बहिणी होत्या. अनुपमाच्या वडीलांचे नाव शमाण्णा आणि तिच्या सावत्र आईचे नाव सवाक्का आणि दोन सावत्र बहीणींचे नाव वसुधा व नंदा असे होते. तिची सावत्र आई अनुपमाला सतत टोमणे मारत. अनुपमा हुशार आणि दिसायला देखणी होती आणि तिच्या सावत्र मुली सुंदर नव्हत्या आणि अनुपमासारख्या हुशार ही नव्हत्या. त्यामुळे त्या माया–लेकी अनुपमावर सतत जळत असत.

अनुपमा दिसायला सुंदर होतीच. पण त्याचबरोबर ती हुशारही होती. त्यामुळे तिने तिला मिळत असलेल्या स्कॉलरशीप वर तिचे शिक्षण करत होती. तसेच ती शिकण्यासाठी हॉस्टेल वर राहून शिकत होती. अनुपमा आता च.अ संस्कृतच्या शेवटच्या वर्षाला शिकत होती. ती नाटकातही भाग घ्यायची. नाटकात काम करताना अनुपमा तिच्या व्यक्तिरेखामध्ये जिवंतपणा आणायची. अनुपमा एखदा तिच्या वडीलांचे मित्र डॉक्टर देसाई यांच्याकडे नाटकाची तिकिटे विकायला गेली होती तेव्हा त्यावेळी तिची डॉक्टर आनंद म्हणजे या कादंबरी मधील नायक होय यासोबत ओळख झाली. डॉक्टर आनंद हा डॉक्टर देसाईचा हुशार विदयार्थी तर होताच तसाच तो त्यांच्या हॉस्पिटलमध्ये कामही करत होता.

डॉ. आनंद हा दिसायला खूप देखणा होता. आणि हुशारही होता. आनंद जन्मापासूनच अत्यंत श्रीमंत होता. बंगला, गाडी, नोकर चाकर, कपडे लत्ते, पैसे सोने सर्व काही सुख त्यांच्याकडे होते. सोन्याचा चमचा जणू घेवून तो जन्माला आला होता.

आनंदला अनुपमा बघता क्षणी आवडली होती. तिच नाटक पाहिल्यावर तर तो तिच्या प्रेमामध्ये पडला. अनुपमालाही आनंद मनापासून आवडला होता. पण तिने तिच्या मनावर आवर घातला. कारण तिला माहित होत की ती अतिशय गरीब घरामधील आहे. आणि आनंद अतिशय श्रीमंत आहे त्यात आनंदचा आईचा स्वभाव ही कडक आहे. हे तिला कळाले होते. त्यामुळे आनंद आणि तिचा लग्न होणार नाही हे तिने जाणल होत. म्हणून अनुपमाने डॉ. आनंद सोबत परिचय वाढवला नाही.

पण आनंदला अनुपमा खूपच आवडली होती. त्यामुळे तिच्या सोबत लग्न करायचे होते. डॉ. आनंद हे डॉक्टर देसाई हे अनुपमाच्या वडीलांचे मित्र असल्याने त्यांच्या मध्यस्थेनी डॉ.आनंद आपली आई राधाक्काला अनुपमाविषयी सर्व काही सांगून डॉक्टर देसाई कडून अनुपमाच्या वडीलांना पत्र पाठविले.

इकडे अनुपमाच्या वडीलांना डॉक्टर देसाई यांचे पत्र मिळाले. तेव्हा ते पत्र वाचून त्यांना मनोमनी आनंद झाला पण अनुपमाच्या सावत्र आई व सावत्र बहिनी ना मात्र खूपच जळफळाट झाला. हे लग्न जमूनये त्यांना अशी वाटत होते.

एहे दिवशी अनुपमाचे वडील अनुपमाला भेटायला हॉस्टेल वर येतात व डॉक्टर देसाईच्या पत्राबद्दल डॉ.आनंद बद्दलच्या स्थळा बद्दल सांगतात. अनुपमाला आश्चर्याचा धक्का बसतो. कारण तिने कल्पानाही केलेली नसते ती डॉक्टर आनंद लग्नाची मागणी घालतील. ती डॉक्टर आनंदला ओळखते असे ती वडिलांना सांगत नाही. पण ती त्यांना बोलते की मला शिकायच आहे. नोकरी करुन तुम्हाला मदत करायची आहे. पण तिचे



Scanned with CamScanner

वडील तिची समजूत काढतात की देवाच्या कृपेने इतके चांगले स्थळ आले आहे. त्याला नाकारु नकासे. तिची समजूत काढून तिला लग्नासाठी तिचे वडील तयार करतात.

आशारीतीने एके दिवशी डॉक्टर देसाईच्या घरी अनुपमाला पाहायचा कार्यक्रम पार पडला. राधाक्कांना; डॉ. आनंदच्या आईला अनुपमाचे ते रुप आवडले. अनुपमा त्यांना पसंत पडली पण ती गरीब घराण्यामधणील असल्याने तिला सून म्हणून करुन घेण्यास त्यांचे मन राजी होईना. कारण त्यांच्या घरची श्रीमंती होती. त्यामुळे आनंदच्या आईला श्रीमंत घराण्यातील सुंदर शिकलेली सून हवी होती. पण मुलगा त्याचे मन नाराज करु नये म्हणून त्याची आई अनुपमाला सुन करुन घेण्यास राजी झाली. शिवाय लग्नात आपल्या घरची नाचक्की होऊ नये म्हणून तिने अनुपमाच्या वडीलांना लग्नाचा सर्व खर्च आम्ही करु तुम्ही फक्त तुमचे जेवढे पाहुणे असतील ते आणि मुलीला घेऊन या असे बोलले त्यामुळे आनंद ही खूप खुश झाला आणि अनुपमाला ही खूप बरे वाटले.

आशाप्रकारे डॉ. आनंद व अनुपमा यांचे लग्न थाटामाटात झाले. सिनड्रेला प्रमाणे अनुपमाचे आयुष्य ही खूप सुंदर झाले होते. ज्या मुलावर प्रेम केले तोच मुलगा तिला पती म्हणून मिळाला. त्या दोघांचे वैवाहिक जीवन खूप सुखी आणि आनंदी होते.

लग्नानंतर तीन महिन्यानंतर आनंद पुढील शिक्षणासाठी इंग्लडला गेला. त्यामुळे अनुपमाला सारी एकटे होते. सुनेकडून श्रावणामधील सर्व पुजा आणि नवरात्र मधील सर्व धार्मिक कार्यक्रम करुन ती इंग्लडला पाठवू असा आनंदच्या आईचा विचार होता.

शुक्रवारी लक्ष्मीची पुजा करताना चुकून एक लालबुंद रसरशीत निखारा अनुपमाच्या एका पायावर पडला. तिच्या पायावर फोड आला. हळूहळू जखम भरली. पण त्या पायावर सारखी खाज सुटायची. अनुपमाने त्याच्याकडे लक्ष दिले नाही. मध्ये बरेच दिवस गेले. एक दिवस अनुपमाचे त्याच्याकडे लक्ष गेले तर एक पांढरा डाग दिसला. तो डाग मोठा झाला. आता मात्र अनुपमाला दुर्लक्ष करता आले नाही कारण तिच्या अंगावर कोड पसरला होता. याच्याबद्दल तिला आनंदला सांगणे शक्य नव्हते. आनंद येथे आल्यावर त्याला सांगू असे तिने ठरविले. तिच्या घरी सोवळी पूजा अर्चा सतत चालायची त्यामुळे सासूला कळाले तर काय होईल याचा विचार तिला करवत नव्हता.

मैत्रिणीकडे जाते असे सांगून ती डॉक्टरांकडे जाऊन आली. ती गोळ्या औषधे वेळेवर घेत होती. पण डाग काही जात नव्हता आणि एक दिवस अनुपमाच्या पायावरील कोड तिच्या सासूला दिसला. कोड लग्नाआधीचे आहे. तू मला आणि माझ्या मुलाला फसवले अशी तिची सासू तिला बोलू लागली.

अनुपमाला कोड आहे हे कळल्यापासून कोणीही तिच्यासोबत बोलत नव्हते व तिच्या सोबत जेवत ही नव्हते. हे कमी होत की काय अनुपमाच्या सासूने अनुपमाच्या वडीलांना तार पटवून बोलवून घेतलं आणि अनुपमाला त्यांच्याबरोबर माहेरी हकलवून लावलं. जसे की कचऱ्यामध्ये कचरा फेकवून दयावा. तस तिला अतिशय वाई रित्या घरातून हकलवून दिले.

माहेरी गरीबी आणि घरी सावत्र आई त्यामुळे अनुपमाला रोज टोमणे ऐकावे लागत होते. आता तिला आनंदच काही तरी करेल अशा होती. अनुपमाने आनंदला दोन पत्रे पाठवली. पण महिना उलटला तरी तिच्या पत्राला काही उत्तरे आले नाही. तिला कोड आहे. त्यामुळे तिच्या सावत्र बहीणीचे लग्न मोडले होते. त्यामुळे तिच्या आईचा तिच्यावर फार राग होता.



Scanned with CamScanner

अनुपमाची जवळची मैत्रिण सुमन. तिला अनुपमाची स्थिती कळाल्यामुळे तिने अनुपमाला मुंबईला निघून ये आणि इकडे येऊन नोकरी कर असे पत्र पाठवले होते. पण आनंदने आपल्याला पत्र का नाही पाठवले या बद्दल ती विचार करत बसायची.

नंतर तिला कुठून तरी कळाले की आनंद आता त्यांच्या  घरी आला आहे. आणि त्याची आई त्याच दुसर लग्न लावणार आहे.  त्यासाठी मुलींची शोधाशोध ही सुरु केली आहे. हे समजल्यावर अनुपमाच्या पायाखालची जमिन सरकली.

आनंदला चांगल ठाऊक होत की अनुपमाला कोड नव्हता. तोच तिच्या आईला हे सत्य सांगू शकत होता आणि तो डॉक्टर असल्याने त्याला चांगले  माहित होत की कोड फुटणे हा काही संसर्गजन्य रोग नाही किंवा अनुवंश रोग आहे हे अजून सिद्ध झाले नाही. तरीही तो असा का वागला? खरच तो असा का वागला? कुठे गेले त्याचे प्रेम? का त्या फक्त आपल्या रुपावरच प्रेम केले? असे अनेक प्रश्न तिला पडत होते. तिच आता सगळ संपल होत. तिच सार काही उध्दवस्त झाल होत. ती खूप रडली. आत्महत्या करण्यासाठी ती देवीच्या डोंगवर गेली. पण त्याचवेळी तिला अंतरिक शक्तीने आत्महत्या करण्यापासून रोखले आणि तिच्या मनात विचार आला की माझी काही चूक नाही. मी का मरावे म्हणून ती घरी आली आणि तिने मनाशी पक्क ठरवल मैत्रीणीकडे मुंबईला थोडे दिवस जाते. पण मनाशी पक्के ठरवले की परत कधीच घरी यायचे नाही त्याबद्दल तिने वडीलांना ही सांगितले नाही. ती मुंबईला निघून गेली.

त्यानंतर ती सुलभा  नावाच्या मैत्रीणीकडे गेली. सुलभाच्या नवरा हरी कडून तिला रिशपनिस्टची नोकरी लागली. आता तिला आर्थिक स्वातंत्र्य मिळल होत. त्यातून ती वडिलांना थोडे पैसे पाठवू लागली. आतापर्यंत तिच्या हातावर आणि पायावर कोड पसरले होते. पण येथे मात्र दिला कोणी अस्प्रूशाप्रमाणे वागवत नव्हत.

मुंबई मध्ये गेल्यावर ही अनुपमाला अनेक कठीण प्रसंगाना चर्तुराईने तोंड दिले. सुलभाच्या नवऱ्याने अनुपमावर जबरदस्ती करण्याचा प्रयत्न केला होता. तेवढ्यसात एक सेल्स गर्ल प्रोडक्ट विकायला आली तिच्या मदतीने त्या सुलभाच्या नवरा हरीच्या तावडीतून सुटका करुन घेतली व त्यानंतर तिने ठरवले सुलभाच्या घरी परत कधीच जायचे नाही  त्यानंतर ती ऑफिस मधील मैत्रीण डॉलीच्या घरी पेईंगगेस्ट म्हणून राहू लागली. डॉलीला एक रक्ताची गरज होती त्यावेळी अनुपमाने डॉलीला रक्त देऊन तिचे प्राण वाचवले. त्यानंतर डॉलीचे लग्न झाले व ती ऑस्ट्रेलियात सेटल झाली. त्यानंतर डॉलीने तिचे संपूर्ण घर अनुपमाच्या स्वाधीन केले व तुला जितके दिवस राहायचे तितके दिवस राहा. असे तिने अनुपमाला  सांगितले.

ह्यानंतर अनुपमाला विलेपोंच्या कॉलेजमध्ये संस्कृतची प्राध्यापिकेची नोकरी मिळाली. त्यानंतर ती कॉलेजमधील विद्यार्थ्यांची नाटके बसवू लागली. आतापर्यंत अनुपमाने सर्व दु:ख पचवल होत व ती खूप पुढे निघून गेली होती.

इकडे मात्र आनंदला खूप पश्चाताप होऊ  लागला होता. त्याचा एक प्रसंग म्हणजे तो इंग्लंडमध्ये असताना एक पेशंट त्याच्याकडे आला होता त्या पेशंट सोबत एक दोन्ही पायाने अपंग असलेली स्त्री व लहान बाळ त्याच्या सोबत आलेले हाते. तेव्हा त्या माणसाने एकाकार ॲक्सिडेंट मध्ये हिचे दोन्ही पाय गेले. तिला बर वाटत नाही त्यात बाळ ही खूप रडत आहे. देवापुढे मृत्यूपर्यंत तिला अलग होणार नाही. म्हणून वचन घेतल होत ना मग हिला काही त्रास होत असताना मला हिच्या साबत राहिलेच पाहिजे ना. अस तिला मी सोडून जाऊ शकणार

नाही कधीच त्या माणसाचे बोलणे ऐकताच आनंदला मनात वाटल आपण ही अनुपमाला हे वचन दिले होते पण पाळले मात्र नव्हते. आणि दुसरे लग्न करायला तयार झालो. दुसऱ्या बायकोला असाच रोग झाला तर? दुसऱ्या लग्नाने मी सुखी होईन याची काय खात्री?

अशाप्रकारे त्याला खूप मनोमनी पश्चातप होऊ लागला. त्याच अनुपमावर खूप प्रेम होते. आईन दुसरे लग्न कर म्हणून हट्ट केला पण त्याने लग्न केले नाही. आनंदच्या आईने आनंदला स्पष्ट सांगितले की आपल्या घरातील सोवळ ओवळ पूजा अर्चा ठाऊक आहे. तुला त्यामुळे कोडलेल्या मुलीला मी माझ्या घरी पाय ठेवून देणार नाही. पण कालांतराने त्याला अनुपमाची होणारी घालमेल व अपमान त्याला कळू लागला. तिच्या ऐवजी आपल्याला कोड फुटल असत तर ती आपल्याला सोडून गेली असती काय? आता ती कशी असेल कुठे असेल अशा अनेक प्रश्नांनी त्याला पश्चाताप होऊ लागला. म्हणून त्याने ठरवल आती किती विरोध झाला तरी अनुपमाची माफी मागून तिला परत घरी आणयचं. अपुनमाचा शोध त्याने अनेक ठिकाणी घेतला. पण तिला भेटण्यासाठी तो जसजसा व्याकूळ होत होता. तसतस त्याला अनुपमाच्या मनाची परिस्थिती समजत होती.

एके दिवशी आनंदला अनुपमाचा पत्ता भेटला. तेव्हा तो तिला भेटायला गेला. तेव्हा अनुपमाला धक्का बसला. तिला स्वप्नातसुद्धा वाटले नव्हते. आनंद तिच्या समोर येईल. आनंदने अनुपमाची मनापासून माफी मागितली. आतापर्यंत अनुपमाच्या सर्व अंगावर कोड पसरले हाते. आनंद तिची खूप माफी मागत होता. एक वेळ क्षमा करत म्हणून तो तिला विनवणू लागला पण अनुपमाने त्याला माफ केल नाही. त्याच्या सोबत ती गेली नाही. कारण ज्या वेळी सासू, समाज, माहेरचे लोक अशा सर्वांनी तिली वाळीत टाकण्यासारखी वागणूक दिली तेव्हा आनंद शांत होता त्याने तिला मदत केली नाही. ना पाठिंबा दिला, आनंद एकमेव व्यक्ती होता जो सिध्द करु शकणार होती की अपुनमाला आर्धा कोड नव्हते. पण तेव्हा तो आला नाही. शिवाय अनुपमाच्या पत्राला त्याने एकही उत्तर दिल नाही.

ती बोलते, आनंद तुम्ही स्वतः डॉक्टर आहात. तुम्हाला या संदर्भात मी काही सांगणे योग्य ठरणार नाही. कोड अनुवंशिक नाही असे कुठे सिध्द झाल नाही? आमच्या घराण्यात कुणाला कोड नाही. जर तुम्ही माझ्या सोबत बोलला असता तर मी स्वतः तुमच्या बरोबर पत्नीसारखी न राहता उत्तम मैत्रिणीसारखी राहिले असते. तुमचे दुसरे लग्न जाऊन दिले असते? पण तुम्ही ती संधी मला दिली नाही.

आनंद गप्प होता परत ती बोलली, आनंद तुम्हालाच कोड झाले असते तर? तुमच्या पुढच्या पिढीला काय होईल? पण माझा विचार का नाही केला मी पण कुणाची मुलगी आहे? तुम्हाला कोड पुढले असते. तर मी तुम्हाला सोडून गेले असते?

पती-पत्नी हे नात असं आहे की कुणा एकाला काही झाल तर दुसऱ्यानं त्याला आधार देऊन संसाराचा गाडा पुढे न्यायला पाहिजे. रोगी आधीच वेदनेने तळमळत असतो. त्याला आणखी मारु नये हे तुमच्या सारख्या डॉक्टरला समजल नाही याच आश्चर्य वाटत. तुम्ही साध डॉक्टर म्हणून कर्तव्य ही केल नाही.

शेवटी अनुपमाने आनंदला माफ केले नाही. कारण माफी मागायला खूप उशीर झाला होता. शेवटी ती आनंदला बोलते, जाऊ दे आनंद होरपळून गेलेल्या बीजाला कोंब फुटणे शक्य नाही. आता नवरा माया, प्रेम हे सारे निरर्थक वाटते. तुम्ही खूप उशीरा आलात, मला माझ्या जीवनाचे ध्येय मला समजले मला आता कुठल्याही आधाराची गरज नाही. देवाच्या कृपेने मला



Scanned with CamScanner

चांगली बुद्धी आहे. त्यासाठी आवश्यक ती संधी उपलब्ध आहे. मुंबईने मला अपार रक्षण दिले. अनुपमा आनंदला बोलते मला कॉलेजला जायच आहे. असे म्हणून आत निघून जाते.

जिच्याशी लग्न झाल्यावर आपण स्वत:ला सुदैवी समजत होतो तोच मी हिच्या जिवनातील मोठ्या वळणाला कारणीभूत झाली या विचाराने तो सुन्न झाला.

तरी शेवटी तो तिला विचारतो, अनुपमा आणखी एकदा तू विचार कर. तेव्हा ती त्याला बोलते, तुम्ही कुलीण घराण्यातील सुशिक्षित बुद्धीवान आहात. पण एक गोष्ट तुम्हाला माहित नाही. तो बोलतो काय ? तेव्हा ती बोलते, की परस्त्रीला एकेरी नावाने हाक मारणे योग्य नाही. एवढ सांगून ती कॉलेजला निघून जाते. तिच्या बोलण्यातील मतितार्थ समजून आनंद गडबडून गेला.

या कथेमध्ये आनंद अनुपमाला भेटण्याच्या आधी एक प्रसंग हा आहे की अनुपमाचा एकदा ॲक्सिडेंट होतो. तेव्हा ती हॉस्पीटल मध्ये ॲडमिट असते. तिचा पाय फ्रॅक्चर झालेला असतो. तेव्हा तिची ओळख डॉ. वसंत व डॉ. सत्त्या सोबत होते. थोड्या दिवसात अनुपमाची या दोन्ही डॉक्टरां सोबत चांगली मैत्री होते.

त्यानंतर एक प्रसंग डॉ. सत्त्या आजारी असतो. तेव्हा त्याला मरणाच्या दारातून अनुपमा बचावते. अनुपमा सत्याला तिची कहाणी सांगते तेव्हा सत्याला त्याच दु:ख खूप लहान वाटत आणि त्याच्या जीवनात अनुपमा मुळे जगण्याचा दृष्टिकोन बदलतो. वसंतला सत्या कडून अनुपमाची कहानी कळते. तेव्हा त्याला अनुपमाने किती दु:ख सोसले याची कल्पना येते. वसंतला अनुपमा आवडली असते. त्या तिला कोड आहे, याबद्दल काहीच वाटत नसते. तो स्वत: डॉक्टर असल्याने त्याला कोडाबद्दल माहिती असते.

एकदा डॉ. वसंत अनुपमाला तिचा भूतकाळ व कोड या दोन्ही गोष्टी स्वीकारुन लग्नाबाद्दल विचारतो. याचे अनुपमाला खूप आश्चर्य वाटते. पण ती डॉ. वसंतला बोलते.

डॉ. मला संसार, नवरा, घर मूल, आई, भावंड ही सगळी नाती खोटी वाटतात. माझा अनुभव पाहता मला आता संसाराच्या जाळ्यात अडकण्याची मुळीच इच्छा नाही कृपा करुन तुम्ही मला या जाळ्यात खेचू नका. तुम्ही तुम्हाला अनुरुप अशा तुमच्या स्वभावाशी मिळली जुळली मुलीचा शोध घेऊन तुमचे जीवन सार्थ करुन द्या माझ्या शुभेच्छा तुमच्या पाठीशी आहेत. आपल मैत्रीच नात असूच राहू देत.

मी मुंबई सोडू शकणार नाही. माझ जीवन पुढेच असच जाईल. जगायचं स्वतंत्र मला आहे. माझी आवडती शिक्षिकेची नोकरी, माझे विद्यार्थी मी आणि माझी आवडती रंगभूमी हेच माझ्या जीवनाचे ध्येय आहे. या मध्ये मी स्वत:ला विसरुन जाईल. माझी जीवनाकडून याहून जास्तीची अपेक्षा नाही. जीवनाने मला सर्वोत्कृष्ट दिले आहे. माझा हाच स्वर्ग आहे.

अशीही महाश्वेता अनुपमाची गोष्ट या पुस्तकात दिली आहे. अनुपमा हशुार आणि सुशिक्षित होती. योग्य वेळी ती तिच्या पायावर उभी राहिली आणि सकारात्मक रित्या ती तिच्या जीवनात पुढे गेली. तिच्या जीवनातील सर्वात मोठ दु:ख पचवण्यासाठीचे धैर्य तिने स्वत:मध्ये निर्माण केल. एके वेळी मरायला गेलेली अनुपमा सकारात्मकरित्या जगाकडे पहायला शिकली. पुढे ती आनंदाने एकटी जगू लागली.

आशारितीने ही माहश्वेता कादंबरी वाचाययला घेतल्यावर पूर्ण वाचल्याशिवाय राहवत नाही. याचे सगळे श्रेय सुधा मूर्ती या श्रेष्ठ लेखिकेली जाते. सूधामुर्ती यांच्या कादंबरीतून खूप शिकण्यासारखे आहे. मी बऱ्यापैकी ही कथा माझ्या शब्दात सांगण्याचा प्रयत्न केला. सगळे मुद्दे सांगता येत नाही त्यामुळे ही कादंबरी एकदा अवश्य वाचा.



Scanned with CamScanner

# निळ्या नभाच्या पलिकडे

प्रतिभा तागड

सर्व सामान्य भारतीय स्त्रिला आपल्याला मुलगा व्हावा अशी इच्छा असते. त्याचप्रमाणे कल्पनाच्या आईचीही इच्छा होती पण मुलगी झाली. मुलगा काय यश मिळवेल असे यश कल्पनाने मिळवले आणि आईवडिलांना नाव मिळवून दिले, असे म्हणतात,

**पुत्र व्हावा ऐसा गुंडा**
**ज्याचा तिन्ही लोकी झेंडा**

या मुलीने आपला झेंडा सात खंडांची पृथ्वी आणि शेकडो मैल पसरलेले वातावरण भेदून आकाशात रोवला अशा या कल्पनाचा जन्म १ जुलै १९६१ ला कर्नाल येथे झाला. कल्पनाच्या वडिलांचे नाव बनारसीलाल आणि आईचे नाव संयोगिता असे होते. सुनिता, दीपा या दोन मुली, मग संजय हा मुलगा आणि धाकटी कल्पना

कल्पना बालवयाची असल्यापासून बाहेरच्या जगात रमणारी होती. धाकटी असल्याने घरीदारी सर्वांची लाडकी होती. मुलांचे खेळ खेळायला तिला आवडत असे. ताईंबरोबर घरात रमण्यापेक्षा भावाबरोबर बाहेर धांगडधिंगा घालायला तिला मनापासून आवडे. कल्पना ही हट्टी होती. आपलेच म्हणणे खरे करण्यासाठी ती परत परत विचारत राही आणि होकार मिळेपर्यंत चिवटपणे झुंजत राही.

कर्नालच्या टागोर बालनिकेतन सिनियर सेकंडरी शाळेत सर्व भावंडे जात. शाळेत एक हुशार मुलगी म्हणून तिची ओळख होती. ती नेहमी पहिल्या पाच नंबरमध्ये येत असते. शाळेत भरतनाटयम बरोबर ती कराटेही शिकली होती. शाळेच्या स्पोर्टस डेला अनेक बक्षिसे मिळवून ती घरी आणत असे. माध्यमिक वर्गात असताना विज्ञानाच्या शिक्षकांनी पर्यावरणधावरती लहानसा प्रकल्प करायला सांगितला होता कल्पनाने एक मोठे पोस्टर बनवले. त्यामध्ये आकाशात उडणारी विमाने अवकाशयाने, ग्रह आणि तारे त्यांची चित्रे होती. तेव्हापासूनच कल्पनाने आकाशात उडण्याचे स्वप्न पाहिले होते. तिचा भाऊ संजय मला पायलट व्हायचे आहे असे नेहमी म्हणत. तिचा भाऊ तिच्यापुढे आदर्श होता. कल्पनाचे वडिल पारंपारिक विचाराचे होते, पण व्यवसायाच्या निमित्ताने बाहेर जाणे येणे असल्यामुळे आधुनिक विचारांची कल्पना त्यांच्याकडे होती.

शालेय शिक्षण संपवून कल्पनाने कर्नालच्या दयालसिंग कॉलेजमध्ये पदवीपूर्व वर्गाचे दोन वर्षे शिक्षण घेतले. आणि गुणवत्तेवर चंदीगडच्या पंजाब इंजीनिअरींग कॉलेजात प्रवेश मिळवला. कल्पनाच्या कुटुंबात मुलींनी बाहेरगावी वसतिगृहात राहून शिक्षण घेणे कोणालाच पसंत नव्हते. परंतु कल्पना हट्टाला लागली होती. तिच्या वडिलांचा उच्च शिक्षणाला विरोध नव्हता. ते म्हणायचे, तू डॉक्टर हो किंवा प्राध्यापक हो. इंजिनियरींग हा व्यवसाय मुलींसाठी योग्य नाही. शेवटी तिच्या हट्टापुढे ते काही करु शकले नाही. कॉलेजमध्ये प्रवेश घेण्यासाठी गेली तेव्हा तिच्यासोबत संपूर्ण कॉलेजात फक्त सात मुली होत्या. तिला मेकॅनिकल वा इलेक्ट्रिकल हा विषय निवडण्यास सुचवण्यसात आले. पण कल्पनाने तिला एरॉनॉटिक्स याच विषयात प्रवेश घ्यायचा असे निक्षून सांगितले. एरॉनॉटिक्स या विषयात प्रवेश घेणारी ती एकमेव मुलगी होती.

कर्नालला तिचा भाऊ संजय फ्लाईंग क्लबमध्ये जात असे. त्याच्या पावलावर पाऊल ठेऊन कल्पानानेही वैमानिक व्हायचे मनाशी पक्के ठरवले. त्यासाठी तिने प्रयत्नही केले परंतु तिथल्या अधिकाऱ्यांनी विरोध केला. तिने आपले स्वप्न तसेच जपून ठेवले आणि इंजिनिअरिंगच्या शेवटच्या वर्षी पंजाब विदयापीठात पहिला क्रमांक मिळवला. त्याचवेळी संजयच्या मुलाला

उत्तम शाळा व शिक्षण मिळावे म्हणून चावला कुटूंब दिल्लीत स्थलांतरीत झालेत. पण कर्नालच्या शाळेत शिकूनही कल्पनाने आपले स्वप्न साकार केले. मुलामध्ये व्यक्तिमत्वाच्या ज्या छटा असतात त्या चांगल्या शाळेमुळे अधिक गडद होतात हे खरे असले तरी लहान गावात शिक्षण मिळाले म्हणून अडत नाही. कर्तृत्व असेल तर हातून फार मोठी कामे होतात.

इंजिनिअरिंगच्या निकाल आल्यानंतर तिच्या कॉलेजने आपल्याकडे शिकवायला येण्यासाठी नोकरी देऊ  केली पण तिने अमेरिकेत उच्च शिक्षण घेण्यासाठी जायचा निर्धार केला होता. टेक्सास विदयापीठात तिला एरॉनॉटिक्स मध्येच उच्च पदवी घेण्यासाठी प्रवेश मिळाला. ३१ ऑगस्ट ही प्रवेशाची अंतिम तारीख होती. अमेरिकेला जाण्यासाठी ती संजय सोबत निघाली. पण हव्या त्या तारखेचे तिकीट मिळाले नाही. विद्यापीठाला कळविले की उशीराने प्रवेश घेत आहोत. त्यांनी परवानगी देखील दिली. अठ्ठावीस ऑगस्टला ती विमानात बसली. ते साल १९८२ होते. त्या आधी एक वर्ष 'नासा' या अमेरिकेतील अवकाश संशोधन संस्थेने 'कोलांबिया' हे  अवकाशयान बांधले होते. कल्पना अमेरिकेत आली तर होती पण विमान चालवत उडणे हे स्वप्न परत तिने जागृत केले. आपले स्वप्न पूर्ण करण्यासाठी ती  सर्वार्थाने प्रयत्न करत राहिली प्रथमदर्शनी अशक्य वाटणारी गोष्ट सतत प्रयत्न करत राहिले. तर मिळू शकते वाट अवघड असली तरी पावले टाकत राहिल्यावर हळहळू रस्ता सापडत जातो.

अमेरिकेत पोचल्यावर युनिव्हर्सिटी याच विषयात तिृ आपल्या पदव्युत्तर शिक्षणाला सुरुवात केली. तसेच अमेरिकेत मुलगा मुलगी असा भेद न पाळता कुणालाही विमान शिकणे सोपे असते. अर्लिंगटनला गेल्यागेल्या जीन पियरे हॅरिसन या अमेरिकन तरुणाशी ओळख झाली. मूळचा तो फ्रेंचचा असल्याने त्याला जेपी नावाने ओळखले जात असे. भारतात स्त्री असल्याने अपुरे राहिलेले स्वप्न प्रत्यक्षात आण्यासाठी कल्पनाने जेपीकडे विमान चालवायचे धडे घ्यायला सुरुवात केली.

विमान चालवणे तर ती शिकलीच. तसेच ती पाण्यातील स्कुबा ड्रायव्हिंग हा रोमांचक प्रकारही शिकली. स्कुबा ड्रायव्हिंग म्हणजे पाठीवर प्राणवायुचे भरलेले नळकांडे बांधून आणि डोक्यावर संरक्षक हेल्मेट घालून पाणबुड्याप्रमाणे खोल पाण्यात जाणे. विमानातून लांबवर फिरुन येणे दोघांच्याही आवडीचे होते. ती गोष्ट पुन्हा पुन्हा करताना त्यांचे प्रितीचे धागे जुळले.

कल्पनाच्या घरच्यांचा या लग्नासाठी प्रचंड विरोध होता. पण ती हट्टी होती. यावेळी संजय तिच्या पाठीशी उभा राहिला. १९८४ साली जेपी आणि कल्पना चावला चे लग्न झाले. जेपी तिचा नवरा तिच्या पाठीशी सतत उभा असे. तिच्या आवडी निवडींकडे तो लक्ष देत असे. मास्टर ऑफ सायन्सची पद्वी मिळवून तिने कोलोरॅडो विदयापीठात एरोस्पेस इंजिनियरिंग, म्हणजे अवकाशात जाणाऱ्या वस्तूंसाठी लागणारे तंत्रज्ञान यातील विषय आपल्या डॉक्टरेटच्या प्रबंधासाठी निवडला. डॉक्टरेटच्या निमित्ताने विमानाचे तंत्रज्ञान ती शिकू शकली. सरळ, गुरुत्वाकर्षणाच्या विरुद्ध दिशेने, उर्ध्व गामी उड्डाण करण्यासाठी लागणारी ऊर्जा आणि वस्तूमानाला मिळणारा प्रवेग यांची समीकरणे शोधून, त्यांचे संगणकीकरण करणे त्यासाठी प्रणाली विकसित करणे हा तिचा संशोधनाचा भाग होता. तिचे हे संशोधन अनेक शास्त्रीय नियतकालिकोंतून प्रसिद्ध झाले. एरोस्पेस तंत्रज्ञावर भरणाऱ्या परिषदामध्ये तिने पेपर सादर केले. तिने केलेले संशोधन आजही संदर्भ पेपर म्हणून वापरले जाते.

विमान उडवायचा परवाना तिने मिळवलाच पण



Scanned with CamScanner

विमानाची तपासणी करायचा, ते सुस्थितीत आहे असा परवाना देण्याचीही पात्रता ही तिने मिळवली. इंजिनाशिवाय पतंगासारखे आकाशात उडणारे ग्लायडरही ती सहजतेने उडवत. १९८८ मध्ये आपली डॉक्टरेट पूर्ण झाल्यानंतर तिने अवकाशात जायच्या प्रयत्नांची आखणी करायला सुरुवात केली. नासाच्या संशोधन विभागात तिने संशोधकाच्या नोकरीसाठी अर्ज केला. नासाचे जॉन केनेडी स्पेस सेंटर हे अंतराळ प्रवासाचे प्रवेशद्वार आहे हे कल्पनाला माहित होते. आपल्या एम.एस आणि पीएच.डी. च्या अभ्यासाने तिने तिथे प्रवेश करण्याची पात्रता मिळवली होती. कसून घेतलेल्या चाचण्या आणि मुलाखतीनंतर तिची नासामध्ये संशोधक म्हणून निवड झाली. संशोधक पदावर ती नियुक्त झाली. एमकॅट ही संस्था नासाच्या विभागात येते. तेथे ती काम करु लागली. कमी वेळात प्रचंड ऊर्जा पुरवून, अधिक प्रवेग निर्मिती करणे आणि विवेक्षित वेग चटकन गाठणे हे या टीमचे उद्दिष्ट होते. त्या टीमने केलेले संशोधन पुढे हॅरियर गटात मोडणाऱ्या लढाऊ विमानासाठी वापरण्यात आले.

त्यानंतर ओव्हरसेट मेथड्स इनकॉपेरशेन या लॉस अल्टॉस येथील संस्थेमध्ये तिची उपाध्यक्ष आणि संशयोधक या वरिष्ठ पदावर नेमणूक करण्यात आली. संशोधक म्हणून नासामध्ये काम करताना अवकाशयात्री बनायचे आपले स्वप्न ती विसरली नव्हती. वयाच्या तिशीनंतर नासाच्या संशोधन विभागातून अवकाशयात्री विभागात प्रवेशासाठी अर्ज केला. १९९४ मध्ये त्या विभगाात तिची निवड झाली. या पदासाठी ज्ञान, वय, स्वभाव, वागणे, कौटुंबीक पार्श्वभूमी, मनोबल, टीमवर्क मनाची स्थिरता, आयक्यू. इ क्यू या सर्वांची चाचणी घेण्यात येते. या सर्व चाचण्या कल्पनाने यशस्वी पार पाडल्या.

नासाच्या संशोधन विभागात कल्पनाला तिचे इतर सहकार्याशी वागणे उत्त होते. नम्र स्वभााव, दुसऱ्यांना मदत करणे, स्वत:बद्दल विश्वास होता. गुणी, मेहनती, प्रामाणिक होती. निवड झाल्यावर प्रयोगशाळेतील काम संपवून ती ह्युस्टन येथील लिंडन जॉन्सन स्पेससेंटरवर १९९५ साली प्रशिक्षणासाठी रुजू झाली. हे प्रशिक्षण अतिशय खडतर असते. आवकाशात गुरुत्वाकर्षाणाचा अभाव असल्याने शरीराच्या हतालचालींवर नियंत्रण ठेवावे लागते. जसे की, पाय जमिनीला टेकलेले नसतात, स्नायुंच्या हलचाली वरचे नियंत्रण शिकावे लागते, पेल्यातून पाणी पिता येत नाही स्ट्रॉ वापरुन ओढावे लागते. पाण्याचा थेंब बाजूला गेला तर तो हवेत तरंगतो. असे विविध प्रकारचे प्रशिक्षण कृत्रिमरित्या शून्य गुरुत्वाकर्षण निर्माण करुन अवकाशयात्रीकडून करुन घेतात. वजन विरहित अवस्थेतून गुरुत्वाकर्षणात येताना रक्तदाब वाढतो, व हृदयाचे ठोके ७० ते ७२ वरुन एका सेकंदात १०० च्या पलीकडे जातात.

नासाच्या कॅलिफोर्नियातील रिसर्च सेंटरमध्ये संशोधक म्हणून काम करताना संगणकीय प्रणाली ती शिकली होती. एका वर्षाचे प्रशिक्षण कल्पनाने पूर्ण केले. त्याचे मूल्यांकनही झाले. त्यानंतर ती रोबोटिक्स विभागात काम करु लागली. तिच्या वरिष्ठांनी तिचे काम पाहून कोलंबिया एस.टी.एस. ८७ मिशनसाठी कल्पनाची निवड केली. तिच्या प्रशिक्षणाची पुन: पुन्हा उजळणी करण्यात आली. त्याचवेळी तिच्या नवऱ्याने अमेरिकन नागरिकत्व स्विकारले व तिनेही अमेरिकन नागरिकत्व स्विकारले. अवकाशात जाण्याआधी १९९२ ला तिने भारताला भेट दिली.

१९ नोव्हेंबर १९९७ या दिवशी कोलंबिया अवकाशात झेप घेणार होते. तयारी झाली होती. अंतराळयात्रींच्या प्रशिक्षणावर सॅन फ्रॅन्सीस्को मोफेट



Scanned with CamScanner

ट्रेनिंग सेंटर येथे शेवटच्या हात फिरवण्यात आला. यानाच्या उड्डाणाची वेळ १९ नोव्हेंबर म्हणजे शनिवारी सकाळी निश्चित करण्यात आली होती. यानात फक्त ६ जण होते. या मोहिमेचे दोन प्रमुख उद्देश होते. एक होता 'मायक्रोग्रॅव्हेटी चा अभ्यास करणे आणि एक उपग्रह अवकाशात सोडावे. ३००० पौंड वजनाचा तो स्पार्टन नावाचा उपग्रह होता. २१ नोव्हेंबरला स्पार्टनला ऑर्बिटरपासून अलग केले. १९ नोव्हेबर १९९७ ते ५ डिसेंबर १९९७ असे१६ दिवस कल्पना कोलंबिया यानात होती. या यानाने पृथ्वीभोवती २५२ फेऱ्या मारल्या ३७६ तास, चौतीस मिनिटे हे सर्व अवकाशात राहिले. त्यानंतर ते सुखरुप पृथ्वीवर परतले. ज्यावेळी कल्पना स्पार्टन हा उपग्रह अवकाशात सोडत होती तेव्हा काही तांत्रिक अडचणींमुळे स्पार्टन सक्रीय होऊ शकला नाही. समितीने कल्पनाला म्हणाले की तू एक उत्तम अवकाशयात्री आहे. त्यावेळी एक धडा कल्पना शिकली, चूक होऊ न देणे आपल्या हातात प्रत्येक वेळी असतेच असे नाही. अज्ञात कारणाने चूक झाली तर ती शोधून सुधारणे हे अधिक कौशल्याचे आणि परिपूर्णतेचे उा. आहे. दुसऱ्या फेरीसाठी कल्पनाला वाट पहावी लागली नाही. २००० साली एस.टी.एस. १०७ या कोलंबियाच्या फेरीसाठी तिची निवड झाली. ही अवकाशयात्रा २००३ साली ठरवण्यात आली होती. कल्पनाने दुसऱ्यसा उड्डाणाची तयारी सुरु केली. या फेरीची ती कमांडर म्हणजे प्रमुख फ्लाईट इंजिनिअर होती. त्यामुळे तिला विशेष प्रशिक्षण देण्यात आले. सर्व प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर १६ जानेवारी २००३ ला पहाटे कोलंबिया अवकाशात झेपावले. यावेळी अवकाशात ८० च्या वर प्रयोग सुरळीत पार पडले. सोपवलेले काम पार पाडून कोलंबियाने परतायची तयारी चालू केली. शनिवार दिनांक १ फेब्रुवारी २००३ स्थानिक वेळेनुसार ९ वाजून १६ मिनिटांची वेळ निश्चित केली गेली.

नियोजित वेळे आधी ६१ मिनिटे कल्पनाने कोलंबियांची ताशी २८००० कि.मी. असलेली गती करण्यास सुरुवात केली तीस मिनिटे असताना ते १२० कि.म. उंचीवर होते. ध्वनीचा वेग तापमानावर अवलंबून असतो. ० सेलशियसला तो सेकंदाला ३३० मीटर इतका असतो. यान ७५ कि.मी. च्या जवळ आले तेव्हा १९.६ मॅक झाला. साधारण ऑस्ट्रेलियाच्या वर कोलंबियाने वातावरणात प्रवेश केला. वातावरणात आल्यावर हवेच्या कणांशी यानाचे घर्षण होते आणि हवेचे तापमान वाढते. ते तापमान १४५०० से. इतके वाढू शकते. ही उष्णता यानाच्या आतील भागात वाढू नये म्हणून जाड उष्णरोधक फरशा पृष्ठभागावर विशिष्ट पदार्थाने एकमेकांना चिटकवलेल्या असतात.

आठ वाजून ५३ मिनिटांनी यानाच्या डावीकडे असलेल्या यंत्रणेची माहिती नियंत्रणकक्षावरील संगणकाच्या पडद्यावरुन नाहीशी झाली. त्या भागाचे तापमान खूपच वाढले होते. नियंत्रणाबाहेर ते तापमान गेले. आणि नियोजित वेळेआधी सोळा मिनिटे कोलंबियाचा आणि कक्षाचा संबंध तुटला. तेव्हा कोलंबिया जमिनीपासून सुमारे साठ कि.मी. उंचीवर होते. टेक्सास अर्कान्सस, आणि लुझियातील काही भागात लोकांना स्फोट झाल्याचा मोठा आवाज ऐकू आला. श्वास रोखून नियंत्रणकक्षात बसलेल्या नासाच्या वरिष्ठ तंत्रज्ञाला कोलंबिया जळून नष्ट झाल्याची बातमी जाहीर करावी लागली.

अशा या महान आंतराळयात्री कल्पना चावला यांचा १ फेब्रुवारी २००३ ला मृत्यू झाला. कल्पना नेहमी म्हणायची; वहस्वप्नाकडून सत्याकडे जाणारा मार्ग अस्तित्वात आहे. फक्त तो शोधायची दृष्टी आणि धैर्य तुमच्या अंगी असायला हवे.



Scanned with CamScanner

# एका उत्तम व्यावसायिकाचा जीवनप्रवास

कविता गाडेकर

नागपुरच्या बांधकाम क्षेत्रातील एक अग्रगण्य उदयोजक श्री. प्रभाकरराव उर्फ भय्यासाहेब मुंडले यांनी आपल्या वयाची सात दशके ओलांडल्यावर गतायुष्याचे विहंगमावलोकन करण्याचा प्रयत्न प्रस्तुत 'आम्हीबी घडलो' या आत्मकथनाद्वारे केला आहे. छोटुभय्या मुंडले यांचे व्यक्तिमत्व पुरुषार्थसंपन्न आहे. हा पुरुषार्थ त्यांना उमलत्या तारुण्यापासून प्रतिकुलतेशी कराव्या लागलेल्या संघर्षातून सिद्ध झालेला आहे. प्रतिकुलतेतही झगडत राहिले ते छोटुभैय्या.

प्रभाकर मुंडले यांचा जन्म १८ जानेवारी १९३९ ला मुंडले घराण्यात सहावे अपत्य म्हणून झाला. त्यांच्या आईंनी त्यांचे नाव प्रभाकर असे ठेवले. त्यांच्या घराण्याचा पूर्वापार व्यवसाय शेती होता. पळसाट या गावी ते राहत असत. पळसाट हे गाव नागपूरपासून भंडाऱ्याकडे जाताना नागनदीच्या काठावर आहे. त्यांचे वडील नागपूरच्या जामदार यांचे व्यवस्थापक म्हणून देखील काम करत असत. जामदार घराणे म्हणजे प्रभाकर मुंडले यांच्या आत्याचे घर होते. प्रभाकररावांचे प्राथमिक शिक्षण पळसाटलाच झाले. त्यांचे बालपणही अगदी आनंदात गेले. खेळण्या बागडण्यात निसर्गाच्या सान्निध्यात गेले. पळसाट गावाशी त्यांचे खूप जुळले होते. गावाच्या प्रत्येक घडामोडीत, प्रत्येक लग्नात, आनंदाच्या क्षणी आणि दु:खातही जामदार मुंडले हेच गावाचे मार्गदर्शक,मित्र,साखा असत. त्यामुळे संपूर्ण मुंडले कुटुंबाचे गावावरती अपरिमित प्रेम होते व गावातील लोक देखील त्यांच्या आईवडिलांना अतिशय मान देत असत आई तर त्या गावाची माऊली होऊनच राहात असे.

या गावात प्रभाकरराव दुसरीपर्यंत शिकले. त्यानंतरच्या शिक्षणासाठी त्यांना नागपूरला जामदारांकडे जावे लागत असे. एकूणच प्रभाकररावांचे बालपण, शिक्षण उत्तमरित्या चालू होते.

जेव्हा ते नागपूरला आले, तेव्हा देशात स्वातंत्र्याचे वारे वाहू लागले हाते. स्वातंत्र्य मिळणार म्हणजे काय होणार हे नेमके माहित नसले, तरी काहीतरी चांगले होणार. असे त्यांना वाटत होते. १५ ऑगस्ट १९४७ ला देशाला स्वातंत्र्य मिळाले. त्यादिवशी सर्वांनी सीताबर्डी किल्ल्यावर टाळ्याच्या कडकडाटात तिरंगा फडकवला. स्वातंत्र्य मिळाल्याचा आनंद काही दिवस कायम होता. पण हळूहळू देशाची फाळणी होऊ ल ागली आणि भारत खंडित झाला. फाळणी झाल्यामुळे देशातील अनेक भागांत रक्ताचे पाट वाहत होते. एका रात्रीतून लोक बेघर झाले होते. देशात निर्वासितांचे लोंढे येऊ लागले होते. गावोगाव पसरु लागले होते. तसतशी फाळणीची दाहकता जनतेला उमजू लागली.

हा आघात सहन करीत राष्ट्रजीवन पुढे सरकायला लागले आणि तेवढ्यातच ३० जानेवारी १९४८ ला महात्मा गांधीची दिल्लीत हत्या झाली. म. गांधीची हत्या एका महाराष्ट्रीय ब्राम्हणाने केली होती, त्याचे नाव नाथुराम गोडसे. एका ब्राम्हणाच्या चुकीचे परिणाम गावोगावीच्या संपूर्ण ब्राम्हण समाजाला भोगावे लागले. गांधीवधाचे निमित्त होऊन गावोगावी ब्राम्हणावर हल्ले होऊ लागले होते. त्यांची घरे-दारे जाळली जाऊ लागली. त्या सर्वांना निर्वासिताचे जीवन जगण्याची वेळ आली. घराची राखरांगोळी करण्यात आली. या सगळ्यांमध्ये गांधीवरील प्रेम हा भाग नक्कीच होता, पण व्यक्तिगत विद्वेषाचा स्पर्श त्याला झाला होता. म.गांधीवर गोळ्या झाडणारा गोडसे ब्राम्हण होता, म्हणून प्रत्येक ब्राम्हणाचे त्याला सहाय्य होते. समर्थन होते, असे नाही.

प्रभाकररावांचे वडील गांधीवादी होते. जातपात न पाळणारे एक दिलदार व्यक्तिमत्व अशी त्यांची त्या गावातील प्रतिमा होती. गावातील सुख दु:खात धावून जाणारी जी काही मोजकी मंडळी होती, त्यात प्रभाकररावांच्या वडिलांचे नाव अग्रभागी होते. ज्या गावाच्या सुख दु:खात आपण आपले सुख दु:ख पाहत होतो, त्या गावात आपल्याला त्रास होणार नाही, अशी त्यांची कल्पना होती. पण कल्पना आणि वास्तव यात भरपूर अंतर होते. गावातील जुनीजाणती मंडळी शांत होती. पण गावातले तरुण मात्र भडकले होते. त्यांनी शहरी साथीदारांना समोर करुन फेब्रुवारी महिन्याच्या पहिल्या आठवड्यात मुंडले व जामदार घराण्याला गराडा घातला. एका गांधीवादी माणसाला फक्त त्याची जात बघून उद्ध्वस्त करायला सर्व गाव एकत्र जमला होता.

त्यांनी घरातील प्रत्येक भांडे, वस्तू, दागिने, धान्य, गुरढोर लुटली. वडिलांनी आजवर मोठ्या कष्टाने उभारलेला त्यांचा संसार त्या डोळ्यादेखत उद्ध्वस्त झाला होता. ज्या गावकऱ्यांवर त्यांनी निरतिशय प्रेम केले होते, त्या गावकऱ्यांनी त्यसांना कुठलीच मदत केली नाही. अंगावरच्या कपड्यानिशी मुलाबाळांना घेऊन आणि पत्नीला घेऊन एका निर्वासिताचे जिणे जगण्यासाठी त्यांचे वडील रात्रभर चालत नागपूरला येऊन पोहचले. त्यांचा संपूर्ण संसार उद्ध्वस्त झाला होता. जे काही कमावले हाते. ते गंगार्पण झाले होते आणि पुन्हा आता शून्यातून विश्व उभारण्याचे आव्हान त्यांच्या समोर होते. वडील झुंजत होते. विपरीत परिस्थितीवर मात करत होते, पण त्यांची हिंमत तुटली होती. श्रमणारे हात हे सगळं उभं करु शकतील, असा त्यांच्या मनात विश्वास होता, पण त्याला साथ देईल अशी कुठलीही परिस्थिती नव्हती.

नागपूरला गेल्यावर लक्ष्मीनारायण मंदिराच्या बाजूला असणाऱ्या २०बाय ३० च्या शेडमध्ये त्यांच्या राहण्याची सोय बाळासाहेब जामदारांनी केली. ४ खोल्यांच्या जागेत २० जण राहत होते. एका खडतर प्रवासाचा हा प्रारंभबिंदू होता. वडिलांनी कर्ज काढून दूधाचा व्यवसाय सुरु केला रोज पळसाटला जाऊन दूध आणणे आणि नागपूरात वाटणे, असा दिनक्रम होता. दूधाला पूरक व्यवसाय म्हणून शेतात भाजीपाला लावायला सुरुवात केली. हा भाजीपाला कॉटन मार्केटला जाऊन विकणे ही जबाबदारी मुलांवरच होती. यावर प्रभाकरराव मुंडले म्हणतात, अशा जगण्यातून लहान वयातच व्यवहाराचे ज्ञान त्यांच्या अंगी बाणवले जात असे. प्रत्येक येणारे संकट हे संधीत कसे रुपांतरित करायचे हे याच काळात शिकले. यातूनच त्यांची वृत्ती व्यवसायाला अनुकूल अशी बनत गेली.

परंतु त्यावेळेस त्यांच्या वडिलांनी सर्व भावंडासमोर एक प्रस्ताव ठेवला की वडील कर्ज काढून प्रत्येकाला एक एक हजार रुपये देतील आणि या पैशातून त्यांनी कामधंदा करायचा, पैसे कमावण्याशिवाय कुणीच घरी परतायच नाही.

वडिलांच्या या प्रस्तावामुळे प्रभाकररावांना भवितव्याबद्दल प्रश्न निर्माण झाला. परंतू त्यांनी वडिलांचा प्रस्ताव आणि इंजीनिअरींगची ओढ याचा सुवर्णमध्य गाठण्याचे ठरविले. सिव्हिल इंजीनिअरींगमध्ये पदविका संपादन करण्यासाठी तंत्र निकेतन मध्ये प्रवेश घ्यायचे ठरवले. त्यांना दहावीला चांगले गुण असल्यामुळे पॉलिटेक्निकला सहज प्रवेश मिळाला. तसेच ३० रु. महिना शिष्यवृत्ती ही मिळाली. त्यावेळी पॉलिटेक्निकची फी ४ रु. प्रतिमहिना होती. हे ४ रुपये शिष्यवृत्तीतून जात उरलेल्या २६ रुपयात कपडे, पुस्तके वगैरेचा खर्च निभावला जात. असे. एकूणच या ३० रुपयात शिक्षण चांगले चालले होते.



Scanned with CamScanner

१९५९ मध्ये प्रभाकररावांनी पॉलिटेक्निकची पदवी घेतली त्यांना नोकरी करायची नव्हती. व्यवसाय सुरु करायचा होता. परंतु त्यावेळच्या पॉलिटेक्निकच्या नियमाप्रमाणे हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यावर सरकारी खात्यात तीन वर्षे नोकरी करणे क्रमप्राप्त होते. तसा बाँडही भरुन दिला होता. हा बाँड पूर्ण करायचा नसेल, तर शिक्षणावर अजवर झालेला खर्च म्हणून १५०० रु. सरकार दरबारी भरावे लागत असे. परंतु एवढे पैसे भरण्याची परिस्थिती नसल्याने हा बाँड पूर्ण करण्याशिवाय पर्याय नव्हता. त्यामुळे प्रभाकररावांनी हा बाँड पूर्ण केला. ते ही नोकरी पुढे चालू ठेवू शकत होते. परंतु त्यांना नोकरी करायचीच नव्हती. त्यांना स्वतःचा व्यवसाय करायचा होता. म्हणून दि. ४/०९/६२ ला त्यांनी त्यांची नोकरी सोडून दिली. त्यावेळी त्यांच्याकडे फक्त ६०० रु. होते.

ज्यावेळेस त्यांनी नोकरी सोडल्याचे त्यांच्या आई–वडिलांना समजले तेव्हा ते म्हणाले, ''छान झाले. त्याने नोकरी सोडण्याचा निर्णय घेतला हे फारच चांगले झाले आहे.'' यावेळी प्रभाकरराव मुंडले म्हणतात की, माझ्या आई वडिलांच्या जागी दुसरे कोणी असते आणि जर त्यांना कळल असत की मुलाने दर महिन्याला हमखास वेतन मिळणारी नोकरी सोडली आहे, तर त्या घरामध्ये नक्कीच कुरबुरी झाल्या असल्या. परंतू त्यांच्या आई वडिलांनी हा निर्णय कुठलीही अडचण समोर न आणता स्विकारला, त्यांचे वडिल त्यांना नेहमी म्हणत जर दुसऱ्या महायुद्धानंतर बेचिराख झालेले जर्मनी आणि जपान पुन्हा सावरत उभे राहू शकतात आणि भरारी घेऊ शकतात, तर मुंडले कुटूंब का सावरु शकणार नाही?'' वडिलांचे हे वाक्य प्रभाकररावांना त्यावेळीही प्रेरणा देऊन गेले आणि आजही देते.

दि. ५ सप्टेंबरला नोकरी सोडल्यानंतर पहिले काम मिळाले. त्यांनी खोदकाम, बांधकाम केले. सुरुवातीला मिळालेली कामे प्रमाणिकपणे यशस्वीपणाने पूर्ण केली. त्यापाठोपाठ त्यांना अनेक कामे मिळत गेली. त्यामध्ये अनेक अडचणी ही आल्या. विश्वासघाताचे प्रसंग पचवावे लागले. परंतु यावर मात करीत त्यातून मार्ग काढला.

प्रभाकरराव मुंडले म्हणतात, अनेकदा असेही होते. की कधी कधी यश अगदी नजरेच्या टप्प्यात येते, आपल्या जीवनातील अंधाराचा बोगदा आता संपत आला आहे, असे वाटते. पण प्रत्यक्षात मात्र अजून काही पावले टाकणे आवश्यक असते. खर बघता याही पावलांचे अंतर आपण सुरुवात केली तेवढ्याच काही फुटांचे असते. पण मन एवढे थकलेले असते, मनात इतका विषाद भरलेला असतो. की हे शेवटचे पाऊल किती मोठे आहे असा प्रश्न मनाला पडतो. लास्ट लेग इज द लाँगेस्ट लेग' हे सूत्र विसरुन चालत नाही.

भागिदारीच्या वाईट अनुभवानंतर १९७० साली प्रभाकररावांनी स्वतःची मेसर्स श्रीराम कन्स्ट्रक्शन नावाची कंपनी स्थापन केली आणि आजतागायत क्लास वन काँट्रॅक्टर म्हणून त्या परंपरेला धरुन काम करीत आहेत.

या व्यवसायिक कामांमध्येच ६६ साली प्रभाकररावांचे लग्न झाले. इंदोरला पोलीस अधिक्षक असणाऱ्या यशवंतराव रेण्यांची सर्वात लहान कन्या सुहास हिच्याशी ते विवाहबद्ध झाले. वडिलांच्या निधनानंतर १९७१ ला शिवाजीनगरला त्यांच्या स्वतःच्या घरात स्थायिक झाले. त्यांना निखिल, मंजू व अनुप्रिता अशी एक मुलगा व दोन मुली आहेत.

प्रभाकरराव मुंडले यांनी जीवनाची काही मार्गदर्शक तत्वे सांगितली आहेत. ते म्हणतात की, प्रत्येकालाच आपले जीवन जगताना काही मार्गदर्शक तत्वे आखून घ्यावी लागतात आणि त्याच तत्वावर वाटचाल करावी लागते. या तत्वांशी प्रतारणा करणे वा तडजोड करणे हे नेहमीच टाळावे लागते.



Scanned with CamScanner

## वार्षिक अहवाल : शैक्षणिक वर्ष २०२१ – २२

**प्रवेश प्रक्रिया :**

सन २००४–०५ या शैक्षणिक वर्षापासून केंद्रीय प्रवेश प्रक्रियेद्वारे महाराष्ट्र शासनामार्फत सामायिक पात्रता परीक्षा घेवून प्रवेश प्रक्रिया पूर्ण केली जाते. महाविद्यालयाची प्रवेश प्रक्रिया दि. १९–०१–२०२२ ते २८–२–२०२२ अखेर महाराष्ट्र शासन व शिक्षण संचालक, पुणे यांच्या नियोजनाप्रमाणे त्यांच्या नियमांच्या आधीन राहून पूर्ण करण्यात आाली. शैक्षणिक वर्ष २०२१–२२ मध्ये प्रथम वर्षासाठी ५२ प्रवेश पूर्ण झालेले आहेत.

**पाठ विभाग : प्रा. डॉ. नान्नर आर. के.**

विद्यार्थी शिक्षकांच्या अंगी अध्यापन कौशल्ये विकसित व्हावीत यासाठी महाविद्यालयाचा पाठ विभाग कार्यरत आहे. या वर्षी प्रथम वर्ष विद्यार्थी शिक्षकाने सूक्ष्म अध्यापन पाठ ०६, एकात्मिक पाठ ०६, अभिरुप पाठ ०२, विविध अध्यापन पद्धतीवर आाधारित ०६ पाठ, सरावपाठ ०६, सलग सराव पाठ ०६ पूर्ण केले. त्याबरोबर पाठ निरीक्षणे पूर्ण केलेली आहेत. व्दितीय वर्ष बी.एड. विद्यार्थी शिक्षकांनी ०६ सरावपाठ पूर्ण केले. परिसरातील विविध विद्यालयामध्ये प्रथम वर्ष विद्यार्थ्यांना एक महिना कालावधीचा छात्रसेवा काल २७–६–२०२२ ते २६–७–२०२२ अखेर होता. तर व्दितीय वर्ष विद्यार्थ्यांनी चार महिने कालावधीचा छात्र सेवा काल पूर्ण केला आहे.

**परीक्षा विभाग : प्रा. भोये सी.एम.**

सन २०१५–१६ पासून विद्यापीठाने बी.एड.साठी नवीन अभ्यासक्रम सुरु केलेला आहे. दोन वर्ष बी.एड. या सातत्यपूर्ण मूल्यमापन व क्रेडिट सिस्टीम ही या अभ्यासक्रमाची वैशिष्ट्ये आहेत. सन २०२०–२२ वर्षाचा निकाल १०० % लागला असून गुणानुक्रमे पहिले तीन विद्यार्थी पुढील प्रमाणे–सोनाली बर्डे –८३.२५%, वेदिका गागरे –८१.२५%, आशा सिन्नारे–८०.५०% असे आहेत. वर्षभरामध्ये विद्यार्थ्यांचे कोर्स अंतर्गत प्रात्यक्षिके व उपक्रम सुरु आहेत. प्रात्यक्षिक कार्य व उपक्रमांचे वेळोवेळी मूल्यमापन पूर्ण झालेले आहे. अभ्यासक्रमासाठी प्रथम वर्ष ५२ द्वितीय वर्ष ३५ अशी विद्यार्थी संख्या आहे. अंतर्गत परीक्षेमध्ये सादरीकरण, पोष्टर सादरीकरण, क्षेत्रभेट, स्वाध्याय, पूर्व परीक्षा घेतली जाते.

**सांस्कृतिक कार्यक्रम विभाग : प्रा.डॉ. करवर ए.के.**

महाविद्यालयात सांस्कृतिक कार्यक्रम विभागाअंतर्गत नैमित्तिक व प्रासंगिक असे उपक्रम राबविले जातात. १५ ऑगष्ट स्वातंत्र्यदिन, स्वामी सहजानंद भारती पुण्यतिथी, २२ सप्टेंबर पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील जयंती, २६ जानेवारी प्रजासत्ताक दिन, रक्षाबंधन, जागतिक महिला दिन, डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम वाचन प्रेरणा दिन, राष्ट्रीय शिक्षण दिन, मा. खासदार शरदचंद्रजी पवार साहेब यांचे अभिष्टचिंतन, संविधान दिन, रक्तदान शिबीर, रांगोळी स्पर्धा, वक्तृत्वं स्पर्धा, निबंध स्पर्धा इ. चे आयोजन करण्यात आले असून अन्य प्रासंगिक उपक्रम राबवले गेले.

**बहि:शाल विभाग : प्रा.डॉ. करवर ए.के.** सन २०२१–२२ डॉ.बाबासाहेब जयकर व्याख्यानमालेचे आयोजन मार्च २०२२ मध्ये करण्यात आले.

**समाजसेवा विभाग : प्रा.डॉ. करवर ए.के.**

या विभागाच्या अंतर्गत ५२ विद्यार्थ्यांची ५ गटात विभागणी करुन प्रत्येक गटाने प्रौढशिक्षण, कुटूंबनियोजन, साक्षरता या विषयांवर काम केले आहे. तसेच राष्ट्रीय सण, कर्मवीर जयंती यांच्या निमित्ताने महाविद्यालय परिसर आणि वडाळा या गावात स्वच्छता मोहिम राबविण्यात आली. विद्यार्थी–शिक्षकांना पर्यावरण शिक्षण, श्रमप्रतिष्ठा, सामाजिक जाणीव जागृती व वैज्ञानिक दृष्टीकोनाचा विकास व्हावा या हेतूने अंधश्रद्धा निर्मूलन, प्रयोग दिग्दर्शन, श्रमप्रतिष्ठा दिन, रक्तदान समज–गैरसमज **HIV–AIDS** यावर मार्गदर्शन करण्यात आले होते.



Scanned with CamScanner

**रक्तदान व तपासणी शिबीर : प्रा.डॉ. करवर ए.के.**

या अंतर्गत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.पोंधे एम.एस. यांच्या मार्गदर्शनानुसार पात्र ३विद्यार्थ्यांनी रक्तदान केले. सर्वच विद्यार्थ्यांची रक्तगट तपासणी केली व व्दितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांचा सहभाग घेतला असून सदर शिबिर नित्यसेवा ब्लड बँक,श्रीरामपूर दि. २६ फेब्रुवारी २०२२ रोजी येथे घेतले आहे.

**विद्यार्थी कल्याण मंडळ – प्रा.डॉ. करवर ए.के.**

विद्यार्थी कल्याण मंडळ या विभागातील खालील योजनांची यशस्वीपणे कार्यवाही करण्यात आली.

**१. कमवा व शिका योजना :** या योजनेचा लाभ गरजू विद्यार्थ्यांना देण्यात येतो. या योजने अंतर्गत परिसर स्वच्छता, बागकाम, ग्रंथ देवाण घेवाण व संगणक यांच्याशी संबंधित कामे केली जातात. सन २०२१–२२ या वर्षी या योजनेत जुलै अखेर ५७६०/– रुपयांचा विद्यार्थ्यांना लाभ देण्यात आला. ४५ रुपये प्रति तासाप्रमाणे अनुदान देण्यात आले. ९ मुले व ११ मुली असे एकुण २० विद्यार्थी या योजनेत सहभागी होत.

**२. शासकीय वसतिगृह योजना** : डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय वसतिगृह व आदिवासी विकास महामंडळ वसतिगृह येथे प्रवेश मिळविण्यासंदर्भात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. सन २०२१–२२ या शैक्षणिक वर्षात एकूण ०४ विद्यार्थ्यांनी वसतिगृहात लाभ घेतलेला आहे.

**३. निर्भय कन्या अभियान : प्रा.डॉ. करवर ए.के.**

या योजने अंतर्गत दि.२५ ते २७ फेब्रुवारी २०२२ या दिवशी तीन व्याख्याने व स्वसंरक्षण प्रशिक्षण घेण्यात आले. यासाठी डॉ.पोर्णिमा गुजर डॉ.उज्वला भोर व श्री.नलगे संदिप यांनी मार्गदर्शन केले.

**४. विद्यार्थी परिषद: प्रा.डॉ. करवर ए.के.**

२०२१–२२ परिषदे अंतर्गत सर्वाधिक गुण पाप्त कु.वैशाली राहिंज हिची विद्यापीठ प्रतिनिधी म्हणून निवड करण्यात आली. तसेच सोनाली मिसाळ,गिता जितरवाल,दिव्या दाभाडे,धनश्री पडवळ,गिता चोखंडे,आश्विनी झोडगे,करिश्मा सय्यद,रोहित वाघमोडे,यांची वेगवेगळ्या पदावर निवड करण्यात आली.

**राष्ट्रीय सेवा योजना विभाग – प्रा. डॉ. शिंदे.बी.ए.**

शैक्षणिक वर्ष २०१७–१८ पासून महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेचे (N.S.S.) ५० विद्यार्थ्यांचे एक युनिट सुरु असून यामध्ये नियमित कार्यक्रमांतर्गत वर्षभरात विविध उपक्रम घेण्यात आले. तसेच विशेष श्रमसंस्कार शिबिर दि.१४/०२/२०२२ ते २०/०२/२०२२ या कालावधीत मौजे निमगाव खैरी ता.श्रीरामपूर जि. अहमदनगर याठिकाणी संपन्न झाले. यामध्ये समाजोपयोगी विविध उपक्रम घेण्यात आले.

**वार्षिक नियतकालिक विभाग – प्रा. डॉ. शिंदे.बी.ए.**

दरवर्षी महाविद्यालयाच्या **''सहजानंद''** या वार्षिक अंकातून विद्यार्थ्यांच्या लेखनाभिव्यक्तीला वाव दिला जातो. तसेच हा अंक विद्यापीठाच्या नियतकालिक स्पर्धेसाठी पाठवला जातो. याहीवर्षी महाविद्यालयाचा वार्षिक अंक प्रकाशित केला जाणार आहे.

**खेळ व क्रीडा विभाग – प्रा.डॉ.शिंदे.बी.ए.**

सन २०२१–२२ या शैक्षणिक वर्षात प्रथम व व्दितीय वर्ष विद्यार्थ्यांच्या महाविद्यालयांतर्गत संगीत खुर्ची, चमचा लिंबू, १०० मीटर धावणे, ४०० मीटर धावणे, ४X४ रिले, लांब उडी, गोळा फेक, थाळी फेक. इ. वैयक्तिक व सामुहिक क्रिडा



Scanned with CamScanner

स्पर्धांचे आयोजन ऑगस्ट २०२२ मध्ये करण्यात आले.

**महाविद्यालयातील विस्तार सेवा व शैक्षणिक उपक्रम :**

**१. शालेय व्यवस्थापन पदविका कोर्स: प्रा. भोये सी.एम.**

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक व महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने सन २००६-०७ पासून सदरच्या कोर्सचे आयोजन केले जात आहे. सदर कोर्स एक वर्षाचा आहे. सन २०२१-२२ या वर्षी ३४ प्रशिक्षणार्थींनी कोर्ससाठी प्रवेश घेतला आहे. त्यांच्या मौखिक परीक्षा माहे जुन-२०२२ मध्ये घेण्यात आली.

**२. एम.ए. (शिक्षणशास्त्र) प्रा.डॉ.शिंदे.बी.ए.**

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक व महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने सन २००८-०९ पासून सदर कोर्सचे आयोजन केले जात आहे. सदर अभ्यासक्रम दोन वर्षाचा आहे. प्रवेश क्षमता ५० आहे व गुणवत्तेनुसार चालू शैक्षणिक वर्षासाठी ५४ विद्यार्थ्यांनी प्रथम वर्षासाठी प्रवेश घेतलेला आहे. तसेच व्दितीय वर्षासाठी ४४ विद्यार्थी प्रवेशित होते. एम.ए.व्दितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या संशोधन अहवाल मौखिक परीक्षा माहे मे-२०२२ मध्ये घेण्यात आली.

**जनरल सुपरव्हिजन विभाग : प्रा.डॉ. नान्नर आर.के.**

महाविद्यालयातील सर्व विभागाच्या कामकाजाची नियोजने, मा. प्राचार्य आणि प्राध्यापक यांच्याशी चर्चा करुन तयार केलेला आहे. विद्यार्थी प्रवेश प्रक्रिया, विद्यार्थी हजेरी, महाविद्यालयीन शिस्त तसेच आरक्षण समिती, रँगिंग समिती, माहिती अधिकार समिती, महिला तक्रार निवारण समिती यांचेही कार्य पूर्ण केलेले आहे. .

**ग्रंथालय विभाग: प्रा. मेंगाळ एन.एच.**

नॅकच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण ग्रंथालय संगणकीकृत करण्यात आले असून ग्रंथालयाची स्वतंत्र गुगलसाईट निर्माण करुन विविध लिंक, माहिती उपलब्ध करण्यात आली आहे. ग्रंथालयामध्ये एकूण १५,४५२ इतकी ग्रंथसंपदा आहे. तसेच सन २०१२-१३ पासून ग्रंथालयामार्फत 'बेस्ट रिडर अॅवॉर्ड' सुरु करण्यात आले आहे.

**AAA समन्वयक - प्रा.पाटोळे व्ही.एस.**

रयत शिक्षण संस्थेने महाविद्यालयांच्या अंतर्गत गुणवत्ता व्यवस्थापनासाठी 'नॅक'च्या धर्तीवर ही प्रणाली विकसित केली आहे. या प्रणालीद्वारे महाविद्यालयाचे ११ विभागात १४०० गुणांसाठी मूल्यमापन केले. दि.६/८/२०२ रोजी मुल्यमापन समिती व्दारे पूर्णकरण्यात आले. या प्रणालीव्दारे महाविद्यायास एकुण- ११६२ गुण मिळाले गुणांची टक्केवारी ८३% इतकी होती.

**नॅक व IQAC विभाग : प्रा.पाटोळे व्ही.एस.**

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ साठी विभागवार वार्षिक शैक्षणिक दिनदर्शिका तयार करण्यात आली. त्यानुसार महाविदयालयाच्या स्तरावर विविध समित्यांचे वार्षिक नियोजनानुसार कामकाज करण्यात आले. तसेच शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१ चा AQAR NAAC पोर्टलवर २०-८-२०२२ रोजी ऑनलाईन सादर करण्यात आला. वर्षभरात वेळोवेळी IQAC च्या बैठका घेण्यात आलेल्या असून त्यामध्ये शैक्षणिक दर्जा सुधारण्यासाठी विविध उपक्रम, प्रकल्प, योजना यादृष्टीने नियोजन व कार्यवाही करण्यात आली

**गांधी विचारदर्शन समग्र चरित्र परीक्षा -प्रा. भोये सी.एम.**

सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षात गांधी रिसर्च फाऊंडेशन जळगांव यांच्यामार्फत घेण्यात येणाऱ्या परीक्षेमध्ये १९ विद्यार्थी प्रवेशित होते. जानेवारी -२०२२ मध्ये ही परीक्षा घेण्यात आली.

**विद्यार्थी वसतिगृह - प्रा. भोये सी.एम.**



Scanned with CamScanner

महाविद्यालयाच्या वसतिगृहामध्ये चालू शैक्षणिक वर्षात बी .एड. महाविद्यालयाच्या ०२ विद्यार्थी, बोरावके महाविद्यालयाचे १२ असे एकूण १४ अध्ययनार्थींना होस्टेलमध्ये प्रवेश दिला आहे. दिपावली व माहे मे महिन्याच्या सुटटी काळात एम.ए (एज्युकेशन), **IGNOU** चे विद्यार्थी प्रवेशित असतात.

**विद्यार्थीनी वसतिगृह – प्रा. मेंगाळ एन.एच.**

सन २०२१–२२ मध्ये बी.एड. महाविद्यालयाच्या ०४ विद्यार्थीनींनी होस्टेलमये प्रवेश घेतला होता. **R.B.N.B.** महाविद्यालयाच्या ५ मुलींनी प्रवेश घेतलेला आहे. तसेच दिपावली तथा मे महिन्याच्या सुटटी काळात एम.ए (एज्युकेशन), **IGNOU** चे विद्यार्थीनी प्रवेशित असतात.

*****



Scanned with CamScanner

# सन २०२० -२१ प्रथम वर्ष बी.एड.छात्रअध्यापक

| Sr.No. | Name of the Student | Mobile No. | Category | Method I | Method II |
|---|---|---|---|---|---|
| 1. | Salve Snehal Suranjan | 8208210669 | SC | Science | Math's |
| 2 | Jeetarwal Geeta Chhitarmal | 9822124522 | Open | Hindi | Geography |
| 3 | Dabhade Divya Narendra | 9146416268 | OBC | Hindi | History |
| 4 | Padwal Dhanashri Suryakant | 8380898810 | SC | Science | Math's |
| 5 | Kharat Sagar Ashok | 9049122232 | SC | Marathi | History |
| 6 | Misal Sonali Machhindra | 7058142273 | NT-C | Math's | Science |
| 7 | Gaikwad Pallavi Machhindra | 7387380246 | SC | Marathi | History |
| 8 | Katte Sonali Vijay | 7038532493 | NT | Geography | Marathi |
| 9 | Bambere Dipak Namdeo | 9921855774 | ST | Science | Math's |
| 10 | Dukre Shital Sopan | 9823719783 | Open | Science | Math's |
| 11 | Zodge Ashwini Satyaprem | 9021765820 | Open | Marathi | History |
| 12 | Sawant Sonali Machhindra | 7721942920 | Open | Cancel | Cancel |
| 13 | Shaikh Almas Akbar | 7066668318 | Open | English | History |
| 14 | Rahinj Vaishali Jagannath | 9307562625 | NT-C | History | Hindi |
| 15 | Tajane Pratiksha Bharat | 8010474776 | OBC | Science | Math's |
| 16 | Gaikwad Tejal Vijay | 9730468675 | SC | Science | Math's |
| 17 | Thorat Ajinkya Dagadu | 9130914158 | NT-C | Maths | Science |
| 18 | Ganage Shital Ambadas | 9970051284 | OBC | Marathi | History |
| 19 | Deshmukh Anushri Jitendra | 8459227213 | Open | Science | Maths |
| 20 | Bansode Akash Suresh | 8855033708 | SC | Cancel | Cancel |
| 21 | Shinde Shweta Balasaheb | 7773933235 | OBC | Science | Maths |
| 22 | Karde Ganesh Raghunath | 9511249848 | NT-C | Marathi | History |
| 23 | Lachore Ishwari Santosh | 7558372266 | NT-B | Science | Maths |
| 24 | Gupta Archana Shankar | 8177956166 | Open | Science | Maths |
| 25 | Jadhav Pallavi Bhagaji | 9021055054 | SC | Marathi | History |
| 26 | Chokhande Geeta Shivram | 9921435569 | NT-C | Science | Maths |



Scanned with CamScanner

## सन २०२० -२१ प्रथम वर्ष बी.एड.छात्रअध्यापक

| Sr.No. | Name of the Student | Mobile No. | Category | Method I | Method II |
|---|---|---|---|---|---|
| 27 | Shelke Komal Vijay | 8805421203 | OBC | Science | Maths |
| 28 | Mundhe Punaji Rama | 9762558119 | ST | Maths | Science |
| 29 | Waghmode Rohit Suryakant | 9822809806 | NT-C | Science | Maths |
| 30 | Sayyad Karishma Salim | 9067147762 | Open | Science | Maths |
| 31 | Sale Ashwini Rajendra | 8010193822 | NT-C | Maths | Science |
| 32 | Salkar Savita Laxman | 8999504675 | ST | Marathi | History |
| 33 | Gawde Sagar Dhanaji | 8275470148 | ST | History | Marathi |
| 34 | Madavi Jitendra Hanmantu | 9403389183 | ST | Cancel | Cancel |
| 35 | Yelwande Suvarna Bhaskar | 8605272010 | OBC | Marathi | Geography |
| 36 | Nannaware Sagar Bapusaheb | 8600965037 | SC | English | Geography |
| 37 | Ambhore Punam Haribhau | 9657298869 | Open | English | History |
| 38 | Sayyad Mubbashera Ayyub | 8237161021 | Open | -EWS | English,History |
| 39 | Unavane Ashvini Vasant | 8275272942 | OBC | History | Marathi |
| 40 | Pardeshi Asha Santosh | 9922615588 | NT-B | Marathi | History |
| 41 | Pardeshi Gauri Vijay | 7378565156 | NT-B | English | History |
| 42 | Gawali Kumar Somnath | 7588628639 | ST | Marathi | Maths |
| 43 | Sayyad Missba Ayyub | 8459591069 | Open | EWS | Science,Maths |
| 44 | Jadhav Pooja Sayram | 8767140501 | ST | English | Geography |
| 45 | Suryavanshi Komal Rohidas | 7020905483 | OBC | Geography | Marathi |
| 46 | Tawalarkar Hrutu Sudhir | 9503432623 | OBC | Marathi | History |
| 47 | Ghule Rupali Chhagan | 9503098487 | NT-D | Science | Maths |
| 48 | Chaudhari Mohan Motiram | 8275414968 | ST | Science | Maths |
| 49 | Nisal Bhagwan Ravji | 7218694240 | ST | Science | Maths |
| 50 | Gangurde Mahesh Jagannath | 9096105323 | ST | Cancel | Cancel |
| 51 | Pagi Sarika Kashinath | 7030661082 | ST | Geography | Marathi |
| 52 | Shirsath Ankush Bhimraj | 9527164625 | SC | Marathi | Maths |
| 53 | Bhawar Jayshri Namdev | 9766155517 | Open | History | Marathi |
| 54 | Valvi Yugal Rajendra | 9309785971 | ST | Science | Maths |



Scanned with CamScanner

# सन २०२० -२१ व्दितीय वर्ष बी.एड.छात्रअध्यापक

| Sr.No. | Name of the Student | Mobile No. | Method I | Method II |
|---|---|---|---|---|
| 1 | Wani Adesh Balasaheb | 8308898896 | Science | Maths |
| 2 | Wagh Madhusmita Akshay | 9168239569 | Science | Maths |
| 3 | Gaware Pranjal Subhash | 9359598907 | Science | Maths |
| 4 | Thorat Jijabai Pratap | 7028311615 | History | Marathi |
| 5 | Patel Heena Dastgir | 7972153576 | History | Marathi |
| 6 | Daund Ashwini Dattatray | 9271735373 | History | Marathi |
| 7 | Sinare Asha Gopinath | 9370667228 | Hindi | Geography |
| 8 | Thorat Sonali Raibhan | 9604172036 | History | Marathi |
| 9 | Sable Rahul Ramrao | 9595968433 | Science | Maths |
| 10 | Tambe Shraddha Dnyandeo | 7066288176 | Science | Maths |
| 11 | Jawale Avinash Madhukar | 8552810947 | English | History |
| 12 | Jejurkar Madhuri Rajendra | 9146077549 | Science | Maths |
| 13 | Lonari Siddheshwar Babasaheb | 9960802495 | Science | Maths |
| 14 | Bagwan Shyada Nijam | 7888007105 | Marathi | Geography |
| 15 | Sonawane Sonali Vijay | 9112927044 | Marathi | Geography |
| 16 | Chalukya Ketakee Dhairyashil | 9420745005 | Marathi | History |
| 17 | Mali Pankaj Dnyandeo | 9552770919 | Science | Maths |
| 18 | Datir Kiran Changdeo | 8975430614 | Marathi | Geography |
| 19 | Kurhe Vaishali Bapusaheb | 8550919682 | Science | Maths |
| 20 | Mapari Rajashri Bhaskar | 9322204646 | Science | Maths |
| 21 | Barde Akash Sunil | 9860724120 | Marathi | History |
| 22 | Rathod Ravina Deepak | 9860351080 | Maths | English |
| 23 | Kadam Rutuja Lawrence | 8551920972 | Science | Maths |
| 24 | Pinjari Kausar Chotulal | 8010735519 | English | Geography |
| 25 | Bare Ajay Kisanrao | 9511996654 | Science | Maths |
| 26 | Barde Sonali Janardan | 8806164424 | English | Maths |
| 27 | Korde Trupti Rajendra | 9579520241 | Hindi | Geography |
| 28 | Waje Archan Dattatraya | 9594945685 | Science | Maths |
| 29 | Gagare Vedika Raosaheb | 9850733863 | Science | Maths |
| 30 | Gaikwad Rituja Gautam | 7249371096 | English | Geography |
| 31 | Jadhav Priyanka Ashok | 7038372101 | Hindi | Geography |
| 32 | Bhambare Sakshi Ajay | 9529173264 | English | Geography |
| 33 | Patil Snehal Dilipkumar | 9923317785 | Science | Maths |
| 34 | Dushing Sujit Annasaheb | 7972428329 | English | History |
| 35 | Khamat Priyanka Balu | 8866446681 | Science | Math's |



Scanned with CamScanner

## मान्यवर व्याख्याने व इतर



कर्मवीर जयंती मार्गदर्शन प्रसंगी मा.मीनाताई जगधने



कर्मवीर जयंती मार्गदर्शन प्रसंगी मा.सचिव
प्रिं.डॉ.विठ्ठल शिवनकर



महिला मुक्ती दिन प्रसंगी यशवंत हायस्कूल,पढेगाव
छात्रासेवाकालीन गट



व्यवसाय मार्गदर्शन प्रसंगी प्रा.डॉ.भागवत शिंदे



करीअर कॉर्नर उद्घाटन प्रसंगी
मा.प्राचार्य डॉ.मुकुंद पोंधे व इतर




मतदान जागृती अभियान प्रसंगी छात्राध्यापक
व शालेय विद्यार्थी

Scanned with CamScanner

**संघर्ष यात्रा**

संघर्ष जीवन । संघर्षच बाणा ।।
संघर्षच कणा । लोक चळवळीचा ।।

न्यायासाठी लढा । आधार समता।।
असामान्य नेता। सर्वसामान्यांचा ।।

वक्तृत्व कर्तुत्वाचा । नेतृत्वास साज ।।
बुलंद आवाज। दबलेल्यांचा।।

ठरवला सार्थ। कर्मवीरांचा विश्वास ।।
श्रमसंस्कृतीचा ध्यास। घेतला आजीवन।।

नाहीरे गटाच्या। हक्कासाठी लढा।।
अभेद्य वेढा । लोकविरोधी धोरणांना ।।

संघर्ष यात्रांचा । संघर्षमय प्रवास ।।
संघर्षच श्वास । संघर्षरत नेत्याचा।।

शेतकऱ्यांचा वाली। सीमावासियांचा आधार ।।
कष्टकऱ्याचा कैवार। एन. डी. पाटील सर ।।

डॉ. कृष्णा पाटील
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर





